श्री ग्रंथ संग्रहालय
क्र. 8105 नं. ६८
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
अ.क्र. 9809
ठाणे

सत्कार्योत्तेजक सभा--धुळें

[ श्रीरामदास आणि रामदासी मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध झालेला ]

श्री

# रामदास आणि रामदासी

## भाग विसावा

REFBK-0001801

धर दुसरा ] गिरिधरकृत [ मणि नववा

# श्रीमत् दासबोधाची किल्ली

भांडारगृहें भरलीं । परी असतीं आडकिलीं ।
हातास न येतां किल्ली । सर्व हि अप्राप्त ॥

हा ग्रन्थ शंकर श्रीकृष्ण देव यांनीं धुळें येथें आपल्या
श्रीआत्माराम छापखान्यांत छापून
धुळें येथें प्रसिद्ध केला.

सर्व हक्क राखून ठेविले आहेत.

१८४२ चैत्र शुद्ध १

८

१९२०

किंमत आठ आणे

# श्रीमत् दासबोधाची किल्ली

## अनुक्रमणिका


**प्रस्तावना** — पृष्ठांक

(१) सद्गुरुकृपा

(२) श्रीसमर्थहृदय

**चार किल्ल्या**

(१) ग्रन्थभावार्थ ... ... ... १-१९

(२) ग्रन्थान्वय ... ... ... ...१९-२८

(३) ग्रन्थराजभावार्थ ... ... ...२८-३२

(४) आत्मानुभव ... ... ... ...३२-६४

॥ श्रीराम ॥

# श्रीमत् दासबोधाची किल्ली

९८०९

## प्रस्तावना

### सद्गुरुकृपा आणि श्रीसमर्थहृदय

सद्गुरुकृपा ते चि किल्ली ।
जेणें बुद्धि प्रकाशली ।
द्वैतकपाटें उघडलीं ।
येकसरीं ॥ ७-२-१५

श्रीमत् दासबोध म्हणजे च श्रीसमर्थहृदय होय. दासबोधांत श्रीसमर्थांनीं आपल्या ' जीवींचें गुज ' सांगितलेलें आहे. अर्थात् श्रीसमर्थहृदयाची ओळख व्हावी अशी ज्याला इच्छा असेल त्यानें श्रीमत् दासबोधग्रन्थाचा अखंड छंद घेतला पाहिजे. पण, दासबोधाचीं नुसतीं पारायणें करून किंवा गिरिधरासारख्यांचीं त्यावरील विवरणें वाचून किंवा दादामहाराजासारख्यांच्या मुखानें श्रवण करून दासबोध समजेल काय ? नाहीं, हीं सर्व साधनें पाहिजेत, अखंड श्रवण मनन पाहिजे हें सर्व खरें, पण केवळ एवढ्यानें कार्यभाग साधणें कठीण आहे. श्रीसमर्थहृदयाचा आपणांस ठाव लागावा ही आपली मनीषा ! पण, सामान्य मनुष्य हि आपलें हृद्गत सहसा कळूं देत नाहीं, तेथें खनाळामध्यें जाऊन राहणारे, बहुधा ध्यानस्थ असणारे, सर्वदा उदासवृत्तीनें वागणारे, पुरतें कोणाकडे न पाहणारे, पुरतें कोणाशीं न बोलणारे, पुरतें एके स्थळीं न राहणारे, अंतरीं नाना कळा असणारे, मौन धारण करणारे, आपली अंतर्बाह्य स्थिति दुसऱ्याच्या अनुमानाला न येऊं देणारे, त्रैलोक्याचें वैभव तृणतुच्छ करणारे, निस्पृहपणें सर्वत्र संचार करणारे, सर्व काळ नित्यनूतन हिंडणारे, सावधपणें ज्याला त्याला भेट देणारे, एक वेष न करणारे, अखंड विश्वाची चिंता करणारे,

बहुविध चाळणा करणारे, जाणायाचें न सांगणारे, असे महाराष्ट्रगुरु श्रीसमर्थ आपल्या हृदयाचा ठाव आपणांसारख्यांस पट्कन् लागूं देतील हें कसें संभवतें ? पण मग, श्रीसमर्थहृदयाचा ठाव घेण्याची आमची तळमळ कशी शांत व्हावी ? श्रीमत् दासबोधांतील गुज आपणांस कसें समजावें ? दासबोधरूपी भांडारगृहांत ज्या अपूर्व वस्तु भरल्या आहेत त्या आपल्या हातीं कशा याव्या ?

**भांडारगृहें भरलीं । परी असती आडकिलीं ।**
**हातास न येतां किल्ली । सर्व हि अप्राप्त ॥ ७-२-१३**

तरी अशी किल्ली कोणती, कीं जी हस्तगत झाली असतां आपणांस श्रीसमर्थहृदयांत शिरून तेथील प्रेमसर्वस्व लुटतां येईल ?

**सद्गुरुकृपा ते चि किल्ली ॥**

सद्गुरुकृपा ही च ती किल्ली होय ! या कुलुपाला दुसरी किल्ली चालत च नाहीं. श्रीसमर्थहृदयाचें कपाट इतर साधनांनीं उघडूं ह्मणाल, तर वृथा शीण मात्र होईल, पण कपाट म्हणून उघडलें जाणार नाहीं. श्रीसमर्थांची कृपा होईल तेव्हां च दासबोध समजेल.

ती कृपा केव्हां होईल? त्या कृपेवांचून जेव्हां आपणांस अन्नपाणी गोड लागणार नाहीं, झोंप येणार नाहीं, विषयांचा वीट येईल तेव्हां ! तेव्हां, आपण न म्हणतां, श्रीसमर्थ कृपा करतील ! आधीं आपण सच्छिष्य बनलें पाहिजे. सच्छिष्याचीं लक्षणें श्रीसमर्थांनीं दिलेलीं च आहेत. तीं लक्षणें आंगीं बाणलीं पाहिजेत. तीं लक्षणें काय थोडीं थोडकीं आहेत ? निर्मल, आचारशील, विरक्त, अनुतापी, निष्ठावंत, शुचिष्मंत, नेमस्त, साक्षपी, दक्ष, धीर, उदार, परमार्थविषयीं तत्पर, परोपकारी, निर्मत्सरी, परम शुद्ध, परम सावध, प्रज्ञावंत, प्रेमळ, नीतिवंत, मर्यादशील, युक्तिवंत, बुद्धिवंत, कुलशीलवान्, सात्विक, साधनकर्ता, कायाक्लेशी, स्वतंत्र, जगमित्र, विवेकी, संसारदुःखी, असा शिष्य असावा लागतो. त्याच्या हातून नेहमीं सत्कर्मं घडावीं. सत्संगाची त्याला आवड असावी. त्याची वासना चांगली आणि उपासना शुद्ध पाहिजे. तो अंतरापासून विषयीं पूर्ण विरक्त असावा व तसें पूर्ण वैराग्य बाणलें नाहीं तोंवर त्यानें आपली थोरवी सांडून साधनें केलीं पाहिजेत. नित्यनेमाला त्यानें प्राणांतीं हि विसंबतां कामा नये. अशा अनेक लक्षणांनीं युक्त तो च सच्छिष्य होय. त्याचें मुख्य लक्षण म्हणजे त्याचा

**सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण ॥**

असला पाहिजे. सद्गुरुवचनीं दृढ भाव असणें हें च सच्छिष्याचें मुख्य वैभव होय. तो दृढ भाव इतका असावा कीं,

**लागतां सद्गुरुवचनपंथें । जालें ब्रह्मांड पालथें ।**
**तरी जयाच्या शुद्ध भावार्थें । पालट न धरिजे ॥ ५-३-५२**

गुरुचे ठायीं शिष्याची इतकी अनन्यता असून हि गुरुकृपा झाली नाहीं, असें कधीं घडलें नाहीं. तात्पर्य, आपण हीं सारीं लक्षणें आंगीं बाणून घेऊं तर च आपण सच्छिष्य खरे आणि तर च आपणाकडे श्रीसद्गुरुकृपाघन वोळणार आहे! श्रीसमर्थकृपा होईल, तर च आपणांस श्रीसमर्थहृदयाचा म्हणजे ग्रन्थराजाचा पार कळणार आहे, एरव्हीं नाहीं. या च साधनाच्या बळावर दिवाकरकल्याणदिनकरादि शिष्य कृतकार्य झाले. गुरुकृपेवांचून इतर साधनें पंगु होत. इतर साधनें किती हि केलीं आणि गुरुकृपा न झाली तर तीं सारीं साधनें व्यर्थ होत. रामकृष्णादि अवतारांनीं गुरुदास्य केलें, तेथें इतरांची कथा काय? परमार्थाच्या विचारांतील हा भारतीयांचा सिद्धान्त आहे. त्याला अपवाद मुळीं च नाहीं. या सिद्धान्ताविषयीं जो शंका घेईल तो आपलें च नुकसान करून घेईल. असें कोणी हि करूं नये.

**जें वेदांचे अभ्यांतरीं । तें काढून अपत्यापरी ।**
**शिष्यश्रवणीं कवळ भरी । उद्धारवचनें ॥ ५-२-१७**

हा अधिकार एकट्या सद्गुरूचा. अर्थात् साधनांतलें साधन म्हणजे जेणें करून गुरुकृपा होईल तें करणें होय. नुसतीं पारायणें करून जें साधणार नाहीं, श्रवणमननानें जें प्राप्त होणार नाहीं, तें गुरुकृपेनें कळणार आहे. गुरुकृपा ही च दासबोधाची किल्ली, कीं जी हातीं येतां च दासबोधांत अवघड असें कांहीं राहणार नाहीं. तेव्हां आतां दुसऱ्या कोणत्या हि साधनाच्या नादीं न लागतां सद्गुरुकृपेसाठीं आपण चकोराप्रमाणें अनन्य सद्गुरुसेवा चालविली पाहिजे.

१८४२ चैत्र शुद्ध १

॥ श्रीरामदासार्पणमस्तु ॥

# श्रीसद्गुरुस्तवन

पतित मी होतों पावन चि केलें । लागतां पाउलें स्वामीयाचीं ॥ १ ॥
स्वामीयाचें रूप देखतां नयनीं । जालें जनीं वनीं समाधान ॥ २ ॥
समाधान घडे बहुतां सुकृतीं । सज्जनाचे चित्तीं मिळों जातां ॥ ३ ॥
मिळतां मिळणी ऐक्यरूप होतां । वेगळे पडतां पतन चि ॥ ४ ॥
पतनीं पडिले शब्दज्ञानी जाले । चाउटीचे बोले वाउगें चि ॥ ५ ॥
वाउगीं बोलिले वेष पालटीले । हिंडों चि लागले दारोदारीं ॥ ६ ॥
दारोदारीं जैसें श्वान हिंडतसे । कामक्रोधवळसे हृदयामाजी ॥ ७ ॥
हृदयामाजी काळकूट हे कल्पना । दिसे वृंदावना बाह्याकारें ॥ ८ ॥
बाह्याकारें स्नान बाह्याकारें संध्या । बाह्याकारें विद्या दावितसे ॥९॥
दावितसे जना नानापरी भाव । बुडतयाचा भाव खोलाकडे ॥ १०॥
खोल हा संसार तयांत बुडाला । धोका हा लागला रात्रंदिवस ॥११॥
रात्रंदिवस धोका वाहत चि गेला । काष्ठवत जाला वाळोनियां ॥१२॥
वाळला आपण बोलतसे पण । पोरें वणवण करिताती ॥ १३ ॥
करिताती चिंता लग्नाची सर्वदा । मागुती वेवादा उठताती ॥ १४ ॥
उठतां बैसतां करी नाना चिंता । सज्जनाच्या चित्ता कानकोंडे ॥१५॥
कानकोंडे जाले तया मुक्ति कैची । जिता चि पावती नर्कपात ॥१६॥
नर्कपात चुके सज्जन सेवितां । सर्व शास्त्र गीता बोलतसे ॥ १७ ॥
बोलतसे माझ्या स्वामीचें वचन । सर्व हि सज्जन समाधान ॥ १८ ॥
समाधान जालें सज्जन सेवितां । मुक्ति सायोज्यता घर रीघे ॥ १९ ॥
घर रीघे रीधी सीधी हे पाहातां । मन हें तत्त्वता रामरूप ॥ २० ॥
रामरूप सर्व कल्याण अंतरीं । कीर्ति निरंतरीं जगामाजी ॥ २१ ॥

श्री

# रामदास आणि रामदासी

## भाग विसावा

# श्रीमत् दासबोधाची किल्ली

### ॥ श्रीरामसमर्थ ॥

वेदांतसंमतीचा काव्य सिंधु भरला । श्रुति शास्त्रग्रन्थ गीता साक्ष संगम केला ।
महानुभाव संतजनीं अनुभव चाखीला । अज्ञान जड जीवा मार्ग सुगम जाला ॥१॥
जय जया दासबोधा ग्रन्थराज प्रसिद्धा । आरति वोवाळीन विमळ ज्ञान बाळबोधा ॥ध्रु०॥
नवविधा भक्तिपंथें रामरूप अनुभवी । चातुर्यनिधी मोठा मायाचक्र उगवी ।
हरिहरहृदयीचें गुह्य प्रगट दावी । बद्ध चि सिद्ध जाले असंख्यात मानवी ॥ २ ॥
वीस हि दशकीचा अनुभव जो पाहे । नित्य नेम विवरितां स्वयें [1] ब्रह्म चि होये ।
अपार पुण्य गांठीं तरी श्रवण लाहे । कल्याण लेखकाचें भावगर्भ हृदय ॥ ३ ॥

### ॥ श्लोक मंगळाचरण ॥

सांगस्सन्निगमो महोदधिरयं बुद्धिर्नगो मंदरः ।
सर्पः काधिपतिर्विवेकचलितः श्रीदासबोधोऽमृतं ।
संसारानलतप्तसज्जनजगज्जन्मादिविच्छित्तये ।
संपूर्णैकदयानिधिः प्रमथिता श्रीदासबोधो हरिः ॥ १ ॥

### ॥ श्रीगुरुमेखळाध्यान ॥

सुवास वास दाटला । नदिप्रवाह खुंटला ।
विचित्र वेणि पाहतां । मयंक मेखळी धुतां ॥ १ ॥

---

१ या बाडाचें येथपर्यंतचें एक पान फाटलेलें आहे.

॥ श्रीराम कर्ता ॥

( १ )

# ग्रंथभावार्थ

नमूं सद्गुरुस्वामि अनाथबंधु । दिनानाथ जी नाथ कारुण्यसिंधु ।
नमस्कार माझा तुझ्या पावनाला । मनोभावना जाहली या मनाला ॥१॥
लिळेनें तुझ्या ग्रंथ निर्माण जाला । अनुर्वाच्य तूं स्वामि ब्रह्मादिकाला ।
अनुर्वाच्य वाचेसि तां बोलवीलें । पुढें शिष्यपारंपरें चालवीलें ॥ २ ॥
मला ग्रंथभावार्थ तो आकळेना । समुद्रामधें काय कोठें कळेना ।
समासामधें बोलिलें कैसकैसें । समर्थें मला सांगणें ऐसऐसें ॥ ३ ॥
प्रभु मुख्य ग्रंथाविणें साध्य नाहीं । परी दर्शवीं हेत भावार्थ कांहीं ।
मला ग्रंथपारायणु नित्य व्हावें । दयेनें तुझ्या म्या जनीं मुक्त व्हावें ॥४॥
सुखें बोलिजे स्वामि देवाधिदेवें । भला निर्मिला ग्रंथ हा बोधनावें ।
जनीं सज्जनीं बोलती दासबोधु । समर्थें चि केला चि दासांसि बोधु ॥५॥
शतें दोनि समास हे वीस योगु । दाहाचे दाहाचे अति दशक भागु ।
तदर्थामध्यें सज्जनीं चित्त द्यावें । वदों ग्रंथभावार्थ हा अर्थभावें ॥ ६ ॥
समर्थें मुळारंभ आरंभ केला । समासामध्यें ग्रंथ हा दर्शवीला ।
पुढें देव लंबोदरु सुंदरु तो । तथा शारदा वंदिला सद्गुरु तो ॥ ७ ॥
पाहा शारदा ते असे मूळमाया । लया जातसे सद्गुरुस्वामिपाया ।
पुढें संत ते सद्गुरूच्या प्रसादें । भले बैसले दिव्य श्रोते प्रबोधें ॥ ८ ॥
धराआपतेजादि शेषादि मेरु । सुधा काम कल्पतरु क्षारक्षीरु ।
गुरुनाथजीलागि हे ऊपमीतां । श्रुती पर्तल्या मौन्यमुद्रा रहातां ॥ ९ ॥
रविचंद्रतेजें परब्रह्म कांहीं । कळा द्वादशी षोडषी दृश्य नाहीं ।
करी वेदवेदांत सिद्धांत सारा । परी संत ते दाविती निर्विकारा ॥ १० ॥
जयाच्या मनें लक्षिलें सर्व कांहीं । बहुश्रुत म्याई परत्री उपाई ।
प्रसंगें मुखें वक्तयालागि वक्ते । नमस्कारिले आदरें संत श्रोते ॥ ११ ॥

कवीच्या मुखें सर्व ही अर्थ जाले । जसे कश्यपी द्वादशादित्य आले ।
जगाच्या तिमीरांधकारा निवारा । सदा ग्रंथ भाग्योदयो हे विचारा ॥१२
सभे बैसल्या सर्व ही पुण्यमूर्ति । तयामाजि तो नांदतो विश्वमूर्ति ।
उभा देव वैकुंठ सांडूनि जेथें । नमस्कार माझा अति नम्र तेथें ॥ १३ ॥
अति गुप्त गुह्यार्थ परमार्थ जो कां । सभानायकीं निश्चयो तूर्त हो कां ।
जुनी जर्जरी निस्तरी सर्व माया । धरी अंतरीं वीवरी देवराया ॥ १४ ॥
तनु मानुषी मुख्य अवतार येथें । वदूं काय मी सर्व ही साध्य जेथें ।
करावा अति आदरें सर्व लाहो । धरावा मनीं तूर्त परमार्थभावो ॥ १५ ॥
गुरु संत श्रोते कवि पारमार्थि । सभानायकु बोलिके सुखस्वार्थि ।
जया देखतां दोष कोठें उरेना । गति संगति हांव पोटीं पुरेना ॥ १६ ॥
समासा नवामाजि गुह्यार्थ देवें । जगीं मानवाला दिल्हा देवदेवें ।
देह गेह मिथ्या दहावे समासीं । समर्थे चि निरोपिलेंसे अह्मासी ॥ १७ ॥
जनीं मूर्ख ते त्यासि गुह्यार्थ कैंचे । निरोपी पुढें स्वामि ते गुण त्याचे ।
तयाला गुणी उत्तमी बोधवीलें । कुविद्या गुणी दुर्गणी शोधवीलें ॥ १८ ॥
सुखें तीन हे योग जाले तयांचे । पुढें भक्ति निरोपितां सार्थकाचे ।
रजोगुण भक्तीकडे जाउं देना । तमोगुण सत्वाकडे पाहुं देना ॥ १९ ॥
समर्थे तमोगुण तो सांडवीला । पुढें सत्वसीरोमणी मांडवीला ।
समासा आठामाजि तो योग केला । सुविद्येचिया भूवना जीव नेला ॥ २० ॥
स्वयें सत्वसीरोमणी पूर्ण होतां । समासां नवामाजि विरक्त आतां ।
विरक्तें बरीं लक्षणें नेघतां हो । दाहाव्या समासीं भली मूर्खता हो ॥ २१ ॥
असो दोनि हे योग जाले विसांचे । दाहाचे दाहाचे अतिउत्तमाचे ।
असें जाणजाणोनि जे मूर्ख होती । पुढें गर्भवासासि ते सीघ्र येती ॥ २२ ॥
धरीती मनीं विषई वासना ते । ह्मणोनी पुढें भोगिती यातनाते ।
माहादुःख भोगूनि बाहेरि आलें । पुढें वाढलें बाळ तारुण्य जालें ॥ २३ ॥
तया प्राणियाचें पुढें लग्न केलें । नवी नोवरी देखतां मग्न जालें ।
करीं अंतरीं ध्यान तें अंतुरीचें । नसे मानसीं ध्यान तें श्रीहरीचें ॥ २४ ॥
पुढें स्त्रीसि घेऊनि नाचे कडे हो । बहु वोढला साधुन्याचे कडे हो ।
पिता जन्मनी देखतां चर्फडे हो । पुढें कामिनी मृत्य जाल्यां रडे हो ॥ २५

पुन्हा लग्न जालें बहु रीण जालें। नवी नोवरी तें अकर्तव्य केलें।
मुलें जाहलीं चालिलीं मृत्यपंथीं। सदां सर्वदां लागली हे चि खंती॥२६॥
विदेशासि गेला घरीं घात जाला। पुढें वार्धिकीं तो वधुशोक केला।
परचक्र आलें वधूलागि नेलें। तेणें प्राणियातें बहु दुःख जालें॥ २७॥
तया वेगळें घातलें कुमरानीं। पुढें वेष्टिलें वार्धिकीं त्या जरानी।
जरामृत्य आला पुन्हा जन्म जाला। समर्थें तयाचा इतिहास केला॥२८
पुढें साहसाताआठामाजि प्राणी। त्रिविधें बहु पोळला घोरवाणी।
पुढें मृत्य तो देखतां धाकताहे। भयें भीत तो थर्थरां कांपताहे॥ २९॥
दाहावे समासीं पुसे देव कोठें। मला कोण योगें जि कैसेनि भेटे।
पुढें सद्गुरुस्वामिपादारविंदीं। मिठी घातली तो श्रवे अश्रुबिंदीं॥ ३०॥
पुढें सद्गुरु बोळला स्वामि माझा। नवां भक्तिचा योग त्या भक्तराजा।
समासां नवांमाजि स्वामीसमर्थें। नऊ भक्ति नीरोपिल्या अर्थअर्थें॥ ३१
ह्मणे ग्रंथ हे ऐकणें भक्ति येकु। तयामाजि ते अर्थ येकु अनेकु।
सगुणीं चरित्रे दुजीं तत्वयंत्रें। धरीं अंतरीं आवडीनें पवित्रें॥ ३२॥
दुजी भक्ति ते कीर्तनीं देव गावा। अरे नित्य हव्यास पोटीं धरावा।
आधीं पूर्ण अभ्यास पाठांतराचा। प्रसंगें पुढें शोध सर्वांतराचा॥ ३३॥
जगीं कर्म उपासना ज्ञान रक्षीं। घडीनें घडी शोधणें पूर्वपक्षीं।
पुढें सत्य सिद्धांत तो निर्मळात्मा। बहु आवडी गाइजे राम आत्मा॥
तिजी भक्ति हें नाम आखंड घ्यावें। पुढें सद्गुरुपादसेवेसि जावें।
बरें अर्चनीं देवभक्तां पुजावें। तुला हें घडेना तरी ऐक भावें॥ ३५॥
बरीसी मनीं मूर्ति सर्वोत्तमाची। तथा सद्गुरुस्वामिया उत्तमाची।
तयालागि तां कल्पकल्पीं पुजावें। पराअंतरा जाणता तो स्वभावें॥
नमस्कारिजे आवडी संतमाळा। गरु देव आदित्य त्या मारुताला।
पुढें दास्यभक्तिकडे देह न्यावें। तनेसीं मनेसीं धनेसीं भजावें॥ ३७॥
सखा देव तो जाहला भक्तियोगें। पुढें आत्मनिवेदनु स्वामियोगें।
देहतत्व हें निर्शनीं मी च आत्मा। पुढें स्वामिसिद्धांत तो निर्मळात्मा॥
असो मुक्ति सायोजयता प्राप्त जाली। तिही मुक्तिची भावना तुछ केली।
विधिगोळस्वर्गादि देवादिकाला। नमस्कार माझा दुरूनी च त्याला॥३९

समासां नवा भक्ति साकल्य जाली । दाहाव्यामधें मुक्ति सायोज्य दीली
पुढें सद्गुरु पांचवा योग सांगे । गिरि स्वामिपाईं निजज्ञान मागे ॥ ४० ॥

इति श्रीग्रन्थभावार्थ श्लोकबद्ध नवविधाभक्तिदशकपर्यंत निरूपण संपूर्णमस्तु
दशक चवथा अभंग पहिला ॥ १ ॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥ ५ ॥

---

॥ श्री ॥

पहा मूर्ख संसारिकु हे समर्थें । जगीं धन्य केले चि ते पारमार्थें ।
हरिभक्तयोगें पुढें सद्गुरूला । कसे शरण गेले तया स्वामियाला ॥ १ ॥
गुरुलक्षणें सद्गुरुराज सांगे । विजातीगुरूच्या गुणें दोष लागे ।
ह्मणोनी तया ब्राह्मणालागि देवें । स्वयातीगुरु स्थापिला शुद्ध भावें ॥२
पुढें शिष्य सत्शिष्य सांगे समासीं । समर्थें बहु बोध केले तयांसी ।
तेथें शोधिल्या त्या बहु मंत्रमाळा । ह्मणे शैवशक्त्यादि भ्रांती जिवाला
तयालागि सर्वोत्तमु सांगताहे । अरे ज्ञान हें तूं विचारूनि पाहे ।
कितीयेक ते लोकिकी ज्ञान जालें । परी मुख्यज्ञानें चि तें वेर्थ गेलें॥४॥
स्वयें मुख्य तें ज्ञान कैसें पहावें । पुढें पाहतां तें चि होऊनि जावें ।
जनीं ज्ञान हें साक्षिणीरूप तुर्या । वृथा ते पदार्थीक लोकीकचर्या ॥५॥
समासा सहाव्यात तीं पूर्णवाक्यें । समर्थें कृपें बोधिलीं पूर्णऐक्यें ।
महावाक्य त्याचें गुज सांगताहे । तयाच्या जपें तो श्रमु होत आहे ॥६॥
अहं ब्रह्म ब्रह्मास्मि हें बोधियेलें । वरी भक्ति वैराग्य प्रबोधियेलें ।
जरी शब्दज्ञानें पुढें बद्ध जाला । तरी त्या समर्थें पुढें बोध केला ॥ ७ ॥
ह्मणे सृष्टिभावामधें च्यारि लोकु । तयामाजि ते दीसती बद्ध लोकु ।
तयालागि काळांतरें दुःख होतां । मुमुक्षु पुढें लागतो मोक्षपंथा ॥ ८ ॥
जगीं सद्गुरूच्या कृपें शुद्ध जाला । पुढें गुप्त गुह्यार्थ साधीत गेला ।
तया बोलिजे साधकु निजभावें । निसंदेह होऊनियां सिद्ध व्हावें ॥ ९ ॥
असो मंत्रगुह्यार्थ देवाधिदेवें । परिपूर्ण हा योग केला स्वभावें ।
समासामधें सिद्ध होऊनि ठेला । सुखें पांचवा योग येथूनि जाला ॥१०॥
पुढें ऐकिजे साहवा योग श्रोतां । समर्थें कसा शोधिला देव आतां ।
जगीं भूपती नृपती थोर राजे । तया निर्मिता तो प्रभु कोण साजे ॥११॥
मुळीं निर्मिता देव सर्वेश्वरु तो । तया दर्शनें मुक्त होतो नरु तो ।
देहतत्वग्रंथीसि तें सोडवीलें । जिवालागि मायोद्भवातीत केलें ॥ १२ ॥

म्हणे ब्रह्मज्ञानेविणे उपदेशु । कदां ही नव्हे हीत जीवा विशेषु ।
पुढें स्वामिबोधें परब्रह्म जाला । देहगेह प्रारब्धयोगें निमाला ॥ १३ ॥
समासामध्यें मुख्यब्रह्मा निरोपी । पुढें कौतुकें ब्रह्म माया निरोपी ।
निरोपी प्रभु सृष्टि मिथ्या म्हणूनी । गितावाक्य श्रोत्यासि सर्वै जिणूनी ॥
पुढें येक श्रोता ह्मणे फावलें हो । जनीं भक्ति वैराग्य कां लाविलें हो ।
अरे देहबुद्धीसि दास्यत्व आहे । देहातीत तें हीत होऊनि राहे ॥ १५ ॥
स्वयें शिष्य पूसोनि स्वामीस भावें । भजों लागला तो जनीं निजभावें ॥
रघुनाथ तो आमुचा साहकारी । लिळाविग्रही राम कोदंडधारी ॥१६॥
अरे दृश्य हें सर्व अदृश्य होतें । रघुराज हा सेवितां दृश्य होतें ।
ह्मणोनी समर्थें चि दृष्टांतद्वारें । भलें दृश्य हें निर्शिलें ग्रंथकारें ॥ १७ ॥
ह्मणे रे अविद्यागुणें देह जालें । तुवां देखतां दृश्य हें सत्य केलें ।
तया कारणें देहबुद्धि नसावी । विवेकें तुवां सर्व ही नीरसावी ॥ १८ ॥
स्वयें सार शोधूनि योगेश्वरानें । अजन्मा बरा वीवरीला तयानें ।
ह्मणे सर्व संसार स्वप्नामध्यें हो । पुढें सद्गुरुशरण त्याहीमध्यें हो ॥ १९ ॥
सुखें स्वप्न सारावया शरण गेलों । पुढें बोलतां स्वप्न होऊनि ठेलों ।
अजन्मा अजन्मा ह्मणे वेळवेळां । समर्थें कृपें पाहिलें निजडोळां ॥ २० ॥
तयाचे कृपें मी अनुर्वाच्य होई । घडे बोलणें शब्द माईक तो ही ।
समाधान पावोनि निशब्द खूणें । मनीं मानिलें पिंड ब्रह्मांड ऊणें ॥ २१ ॥
अजन्मारुपें मी अनुर्वाच्य जालों । समासामध्यें मुक्त होऊनि ठेलों ।
समर्थें असा ग्रंथभावार्थ केला । परिपूर्ण हा साहवा योग जाला ॥ २२ ॥
असो साहव्याचा समाचार जाला । पुढें सातव्याचा कसा योग आला ।
गणाधीश तो पूर्वजु स्वामिरूपें । निरोपी पुढें ब्रह्ममायानिरोपें ॥ २३ ।
भलीं बोलिलीं ब्रह्म चौदा समर्थें । पुढें मांडिलीं सांडिलीं अर्थअर्थें ।
तयामाजि तें राहिलें येकनावें । अनुर्वाच्य तेरा पुढें तें स्वभावें ॥ २४ ॥
समासीं तिहीं पूर्णसाक्षेप केला । विधिगोळ हा सर्व ही तुच्छ जाला ।
पुढें विमळें विमळें ब्रह्म केलें । तया कल्पितां कल्पनाभान जालें ॥ २५ ॥
पुढें कल्पना द्वैत ते निर्शिली हो ! समुदावसृष्टी सुखें हर्षिली हो ।
असें ऐकुनी श्रोतयाला गुमानें । शुको मुक्त वा वेद बोले प्रमाणें ॥ २६ ॥

तयाला ह्मणे स्वामि माझा समर्थु । अरे बोलसी वेदवाक्यें यथार्थु ।
तरी व्रेद कोणास ही उद्धरीना । रुषीदेवब्रह्मादिकां मोक्ष देना ॥ २७ ॥
विदेहादिकें मुक्तरत्नें अपारें । शुका बोधिले शेवकाचेन द्वारें ।
प्रतिउत्तरें मौन्य श्रोता न बोले। तयालागि तो स्वामि तो काय बोले ॥२८
अरें बद्धमुक्तीक माया विनोदु । गुरुमूख होऊनि घे पूर्ण शोधु ॥
अर्धी ग्रंथ ऐकें चि अध्यात्मभावें । समाधान होईल तुझें स्वभावें ॥ २९॥
ह्मणोनी तया श्रोतयालागि देवें । भले ग्रंथ काढूनि दिल्हे स्वभावें ॥
पुढें साधना स्छापिलें साध्य केलें । पुन्हा ग्रंथअर्थाकडे घालवीलें॥३०॥
पुढें तो देहातीत राहो आरण्यीं । तथा या जनीं वीजनीं ब्रह्मरण्यीं ।
उठो कां पळो जीत ना मृत्य त्याला। असा सद्गुरूच्या कृपें मुक्त जाला॥
जगीं सद्गुरुभक्ति सोडूं नये रे । गुरुभक्ति पूर्वापरु चालते रे ।
महादेव गिर्जापती अंबिकेला । गुरूची गिता बोलिला मानि बोला॥३२
स्वयें सद्गुरुस्वामि देवाधिदेवें । मला लाविली आपुली भक्ति भावें ।
जिवा हीत कर्णें नसे आपुलें हो । समर्थें चि हें हीत वीचारिलें हो॥३३
दाहावे समासीं गुरुभक्ति केली । अतिश्रेष्ठ हे पष्ठ बोलूनि ठेली ।
कळों सातवा योग हा श्रोतयाला । पुढें आठवा चित्त द्यावें तयाला ॥
सुखें आठवा ऐकणें योग आतां । पुढें देइजे आवडी चित्त श्रोतां ।
करी बाळका बोध तो दीनबंधु । खरें ज्ञान शोधीतसे सुखसिंधु ॥ ३५ ॥
पहिले समासीं ह्मणे ऐकणें रे । किती हिंडसी फिरसी आटणें रे ॥
बहु साधनें देव भेटावयाला । न भेटे तेह्रां नाश जाला वयाला ॥ ३६ ॥
तया बोलतां चित्त उद्विग्न जालें । अति आदरें स्वामिला वीनवीलें ।
समर्थें पुढें देवमायाअशंका । समासीं तिहीं वारिली सर्वशंका ॥ ३७ ॥
निरावेव ब्रह्मीं करी कोण माया । जनीं निर्गुणीं लाविती लोक थाया ।
निराकार ब्रह्मासि कर्तुत्व नाहीं । दिसे सर्व हें ईश्वराचे चि ठाईं ॥ ३८ ॥
तेथें पंचभूतिक माया हरूनी । स्वयें दाविला देव कृपेकरूनी ।
पुढें स्वामि येकेक भुताच पोटीं । निरोपी पाहा पंचभूतीकदाटी ॥ ३९ ॥
पुढें देव स्छूळ भूतें परीक्षी । प्रभु नेणत्याजाणत्यांला नुपेक्षी ।
तेथें श्रोतयानें नभ ब्रह्म केलें । समर्थें पुढें शून्य मानूनि ठेलें ॥ ४० ॥

अरे शून्य आकाश हें ब्रह्म कैसें । कळेना तुला मानवा ब्रह्म ऐसें ।
स्थुळामाजि सातागुणें वेष्टिलें रे । तुवां ब्रह्म वेडेपणें श्रेष्टिलें रे ॥४१॥
पुढें चित्त दुश्चित्त त्या श्रोतयाचें । तयालागि पाषाण हें नाम साचें ।
तरी देवपाषाण पूजाधिकारी । परी तो नरु सर्व अनाधिकारी ॥ ४२ ॥
असें ऐकिलें वाक्य हें स्वामियाचें । तथा तें पुराणीं च व्यासादिकांचें ।
गुरु कर्णधारी महासुख साचें । देहदुर्लभीं साध्य सर्वोत्तमाचें ॥ ४३ ॥
अविद्यागुणें बोलिजे जीव ऐसा । दिसे विश्व मायागुणें शिव तैसा ।
पहा मूळमायागुणें देवधीशु । निरोपाधि तो निर्मळात्मा परेशु ॥ ४४ ॥
घटाकार आकाशअंशें जिवात्मा । मठाकार आकाशअंशें शिवात्मा ।
महद्रूप आकाश तो परमात्मा । चिदाकाश व्यापूनि तो निर्मळात्मा ॥
स्वयें तत्पदीं स्वामिनें मोक्ष दिला । आठामाजि आत्मा चि होऊन ठेला ।
पुढें सिद्ध तीं लक्षणें बाणलीं हो । समर्थें यथासांग तीं वर्णिलीं हो॥४६
पुढें स्वामिसमर्थ ते पाहताती । सभानायकु बोलिके बोलताती ।
बहुतां मुखें शब्दकल्लोळ जाला । गिरिस्वामि शून्यातितु बोध केला ४७

इति श्रीग्रंथभावार्थ श्लोकबध्ध । आत्मज्ञानदशकपर्यंत निरूपण । संपूर्णमस्तु
दशक आठवा अभंग दुसरा ॥ २ ॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥ ७ ॥

---

॥ श्री ॥

सुखें ऐकिला आठवा योग श्रोतां । पुढें ऐकिजे हा नवा योग आतां ।
समासीं आधीं ब्रह्मनामें आशंका । हरी स्वामि वोवीमधें सर्व शंका ॥ १ ॥
आशंकानिरासें परब्रह्म होतां । अहंता ह्मणे मी स्वयें ब्रह्म आतां ।
तया मीपणा मिथ्य केलें समर्थें । पुढें मौन्य हा बोलतो सुखस्वार्थें ॥२॥
कसा मौन्य हा जाहला बोलताहे । जनामाजि हा भोग हा भोगिताहे ।
कसा भोग भोगूनि जाला अभोक्ता । कसा कर्म होऊनि जाला अकर्ता ॥३॥
सभानायकीं रान हें घेतलेंसे । तयाला समर्थें बरें बोधिलेंसे ।
अहो झडपला तो दिसे देहधारी । पुढें तो चि पंचाक्षरी देहधारी ॥ ४ ॥
देहधारकातें देह दिसताहे । देहातीत योगेश्वरु कोण पाहे ।
तया पहतां विश्व कोठें उरेना । समर्थासि जैसा करंटा स्मरेना ॥ ५ ॥
तया बोलतां तें निसंदेह जालें । पुढें जाणणें हें चि सदृढ केलें ।
करी पिंडब्रह्मांड हें ऐक्य तेथें । ह्मणे स्वामि दोहींकडे पंचभूतें ॥ ६ ॥

साहावे समासीं भलीं गुणरूपें । तया भूत आकाश हें शब्दरूपें ।
निरोपी प्रभु जाणिवेची आशंका । भुतीं व्यापलीं सूक्ष्मरूपें अहे कां ॥७
आधीं स्थूळ कीं सूक्ष्म निर्माण जालें । तयाचे आशंकेसि निर्मूळ केलें ।
पुढें तो ह्मणे कोण जन्मास घाली । तयाची समशा बरी पुरवीली ॥ ८ ॥
आहे जन्म बद्धासि हेतुपरत्वें । जनीं ज्ञानिया सुटला ज्ञानमत्तें ।
मुळीं कल्पना चालिली बीजरूपें । पुढें जन्मली बद्धरूपें स्वरूपें ॥ ९ ॥
भुगोळें परब्रह्म हें भेदिलेंसे । तयाचे आशंकेसि ही शोधिलेंसे ।
आकाशामधें लाविला दीप जैसा । विधिगोळ ब्रह्मीं दिसे भास तैसा ॥१०॥
अरे वृत्ति होऊनि पाहें विशाळु । न दिसे तुला पाहतां ब्रह्मगोळु ।
पुढें स्थिति ते जाहली कैसकैसी । दाहाव्या समासीं पाहा ऐसऐसी ॥
तेथें निर्गुणालागि निर्गुण केलें । अनंतासि अनंत मानूनि ठेलें ॥
कितीं कौतुकें बोलिलें त्या समर्थें । नवा योग हा पूर्ण केला यथार्थें॥१२
नवा योग जाला पुढें दाहवा तो । समासांत श्रोतेजनीं पाहावा तो ।
ह्मणे स्वामि सर्वत्र जाणीव येकु । देहभावनें भिन्न भासे अनेकु ॥१३॥
पुढें येक श्रोता ह्मणे स्वामियातें । विरंची हरी कोण कर्ता तयातें ।
जगीं रुद्र संव्हारितो बोलताती । पुढें त्यासि संव्हार हें सांगताती॥१४
आरे मूळमाया मुळीं जन्मलीसे । पुढें गुण घेऊनि ते चालिलीसे ।
पुढें देहधारी हरि शिव जाले । विरंचीमुखें जीव हे निर्मियेले ॥ १५ ॥
द्विविधा भुतांचीं रुपें जाण जालीं । पुढें ब्रह्मयानें सुखें सृष्टि केली ।
मनीं कल्पकल्पोनि बीजोद्भवाला । करूं लागला जीव लोकोद्भवाला ॥१६
पुढें विष्णुनें पाळिलें निजरूपें । तमोगुण संव्हारितो रुद्ररूपें ।
स्वयें सर्व सर्वेश्वर तो चि कर्ता । विवेकें तयाचे विचारीं प्रवर्ता ॥ १७ ॥
भ्रमाचे परी सर्व संसार माया । कळों लागली सद्गुरूच्या उपायां ।
अतिप्रांजळें लक्षणें त्या भ्रमाचीं । समर्थें भलीं बोलिलीं संभ्रमाचीं ॥१८॥
भ्रमें संभ्रमें लोक दुश्चीत होती । पुढें कर्मउपासना सांडिताती ।
तयाला दृढीकर्ण केलें समर्थें । सगुणीं समाधान निरोपीलें तें ॥ १९ ॥
प्रचीतीविणे सीण हा सर्व आहे । ह्मणे सत्य सर्वोत्तमा तूं चि पाहें ।
म्हणोनी पुढें स्वामि मायोद्भवाला । समासामधें सांगती उद्भवाला ॥२०॥

आकाशीं जसा वात निर्माण जाला । तयाचे परी ब्रह्म मायोद्भवाला ।
तया वायुनें काय आकाश हाले । पुढें गुण घेऊनि हा वात चाले ॥ २१ ॥
तयामाजि जाणीव तो ईश्वरु हो । प्रकृतीवरु देव सर्वेश्वरु हो ।
तया अंशमात्रें चि त्रैयलोक्य चाले । गितावाक्य हें अर्जुना कृष्ण बोले ॥२२
क्षरः सर्वभूतानि हें बोलिलेंसे । कुटस्थोक्षर ज्ञान निरोपिलेंसे ।
तया वेगळा उत्तमु पुरुष आहे । नभाचे परी लेश त्याला न साहे ॥२३॥
मुळीं निश्चळीं चंचळ येक जालें । जगज्जोतिनें चंचळा चालवीलें ।
किर्तीं नाममाळा त्रिविधा प्रकारीं । पुढें ब्रह्म पैलीकडे निर्विकारी ॥२४॥
त्रिधा नाममाळासि सिद्धांत जाले । तयातीत ते स्वामि होऊनि ठेले ।
सुखें ग्रंथगर्भार्थ श्रोतीं पाहावा । परिपूर्ण हा योग जाला दाहावा ॥ २५ ॥
असो दाहवा योग मायोद्भवाचा । पुढें ऐकणें भीम हा उद्भवाचा ।
अहो भीम नामें महाथोर आहे । विचारें चि हा येथिचा अर्थ लाहे ॥२६॥
पहिल्या समासांत सिद्धांत आत्मा । मुळीं उद्भवें बोलिला अंतरात्मा ।
विकारी तया बोलती निर्विकारी । तयाला समर्थु ह्मणे हे भिकारी ॥२७॥
पुढें मागुती उद्भव बोलिलासे । जसा लोक हा दंडकें चालिलासे ।
तयालागि स्थापूनि देवाधिदेवें । जगोद्धार केला पुढें च्यारि देवें ॥ २८ ॥
समासा तिहींमाजि कौतूक केलें । प्रभाते धरूनि बरें सीकवीलें ।
दिसांमाजि जें जें करावें निरोपी । प्रभु कर्मउपासनाज्ञान रोपी ॥ २९ ॥
समासा चहुं सारविवेक केला । स्थुळापासुनी देह मोवीत गेला ।
स्वयें आठवा देह तो अंतरात्मा । तया वेगळा स्वामि तो निर्मळात्मा ॥३०
पुढें राजकार्णास तें वीवरीलें । बहुतापरी सेवका सीकवीलें ।
साहाव्यामधें स्वामि महंतलीळा । निरोपीतसे साधना वेळवेळां ॥३१॥
पुढें स्वामि गुप्तेश्वरू सांगताहे । पाहा अंतरात्मा चि तो होत आहे ।
तयाचे पुढें देव तो निर्मळात्मा । हरीभक्तियोगें कळे तो महीमा ॥ ३२ ॥
मुळीं निश्चळीं चंचळ गुप्तगंगा । निरोपी प्रभु दिसते ज्ञानगंगा ।
करी ज्ञान विज्ञान उग्मासि जातां । तेथें वृत्ति निवृत्ति तें ब्रह्म होतां ॥ ३३ ॥
आधीं कर्म हें स्थापिलें स्वामियानें । हरीभक्ति ते लाविलीसे तयानें ।
हरीच्यीं रुपें पाहतां उपदेशु । पुढें जाहाला मोक्ष जीवा विशेषु ॥ ३४ ॥

समासा व्दहामाजि त्या निस्पृहाला । बहुतापरी बोधिलेंसे तयाला ।
महंतें महंतासि तें सीकवीलें । समर्थें तया भीमयोगासि केलें ॥ ३५ ॥
सुखें द्वादशी योग ऐका पुढें हो । समासामधें चित्त घाला पुढें हो ।
तेथें स्वामि विवेकवैराग्य सांगे । प्रपंचीं हरीभक्तिचा योग लागे ॥ ३६ ॥
ह्मणे स्वामि ऐका विवेकी जनाला । घडीनें घडी रे भजा पावनाला ।
समासामधें लोकिकी बोध केला । बहुतापरी सीकवी निस्पृहाला ॥३७॥
समासा तिहींमाजि त्या दोनि गोष्टी । निरोपीतसे मुख्य त्या गुज गोष्टी ।
आधीं देव येकु पुढें भक्त येकु । करी वीवरी मीपणाचा विवेकु ॥ ३८ ॥
विवेकें चि वैराग्य सांगोनि ज्ञानें । महद्भाग्य तें दीधलें स्वामियानें ।
जगीं जो मिळाला जगीं धन्य जाला । जनीं विजनीं काय उणें तयाला ॥३९
पुढें च्यारिवाचारुपें बोध केले । त्रिधा भक्तनिवेदनु स्वामि बोले ।
सुखें साहव्यामाजि सृष्टिक्रमु तो । क्रमाच्या निरासें पुढें संभ्रमु तो ॥ ४० ॥
समासीं पुढें विषयोत्याग कैसा । निरोपी प्रभु शुद्ध सारांश ऐसा ।
बहु लालुचीचीं जनें फार लोकीं । तया न्यायनिष्ठूर हें बोलणें कीं ॥४१
बहुतापरी काळरूपें करूनी । ह्मणे काळ हा रे प्रसंगावरूनी ।
मुळीं मूळमायेंत हा काळ आला । भयातीत तें हीत शोधा तयाला ॥
पुढें सीकवीलें तया दुर्बळासी । बहुतापरी बोध केले तयांसी ।
दाहाव्यामधें उत्तमु पुरुष सांगे । समर्थापदीं तो गिरी भक्ति मागे ॥ ४३ ॥

इति श्रीग्रंथभावार्थ श्लोकबद्ध विवेकवैराग्यदशकपर्यंत निरूपण दशक बारावा
अभंग तिसरा संपूर्णमस्तु श्रीरामार्पणमस्तु । श्रीराम जयराम जयजयराम ।।५३।।

---

॥ श्री ॥

सुखें ऐकिला द्वादशी योग मागें । पुढें पावला तो त्रयोदस्य वेगें ।
आधीं स्वामि आत्मा आनात्मा निरोपी । पुढें वृत्ति ते बैसली मूळरूपीं ॥
मुळीं वृत्ति जे राहिली ईश्वरीं हो । तया ज्ञानविज्ञानबोधें हरी हो ।
ह्मणे चंचळात्मा तया नाश आहे । पुढें निश्चळात्मा चि होऊनि राहे ॥
करी सारविचार दुज्या समासीं । पुढें तिसऱ्यामाजि सृष्टिक्रमासी ।
कसा निश्चळीं जाहला हा भुगोळु । प्रचीती बरा आणिला ब्रह्मगोळु ॥३

उभारूनि संव्हारिलें स्वामियानें । समासांत कल्पांत केला त्यानें ।
कसा सांग तो वर्णिला ब्रह्मकल्पु । पुढें देव तो राहिला निर्विकल्पु ॥४॥
पुढें काहणी श्रोतयांवक्तयांची । प्रकृतीवरा कुमरांची तयांची ।
किती काय विस्तारले ते निमाले । विरंची हरी शिव ते ब्रह्म जाले ॥५॥
लघुबोध आरंभिला स्वामियानें । भुतें पांच तीं वारिलीं कौतुकानें ।
भुतामाजि आकाश हें वेर्थ नावें । महद्भूत आत्मा भुतातीत व्हावें ॥६॥
अविद्या पुढें बोलिली स्थूळरूपें । तया चेतवी वायु आत्मस्वरूपें ।
पुढें ब्रह्म आकाश तो निश्चळात्मा । भरे तेथ निरूपणें अंतरात्मा ॥ ७ ॥
असा प्रत्ययो सातव्यामाजि आला । पुढें येक श्रोता ह्मणे स्वामियांला ।
अहो कोण कर्ता भुगोळास आहे । पुसे तों सभानायकाला न साहे ॥८
अहो कोण कर्ता पुसा काय त्यांसी । कळेना कसा अर्थ याचा तुह्मासी ।
जगीं देव कर्तें हे कोट्यानकोटी । सभानायकु बोलती वीरजेठी ॥ ९ ॥
ह्मणे स्वामि ऐका स्वभावें चि जालें । नसे दृश्य मिथ्या चि होऊनि ठेलें
खरा देव तो तों अकर्ता स्वभावें । तुह्मी पूर्वपक्षासि सांडीत जावें ॥१०॥
पुसे वाक्य श्रोता ह्मणे कोण भोक्ता । ह्मणे स्वामि आत्मा शरीरासि धर्ता ।
करी वीवरी जाणजाणों अपेक्षी । प्रवृत्तिनिवृत्तिकडे हा चि लक्षी ॥ ११ ॥
पाहा तंतु आत्मा जगीं दाटलासे । दाहाव्या समासांत नीरोपिलासे ।
समर्थें पुढें निस्पृहां सीकवीलें । बहुतापरीचें समाधान केलें ॥ १२ ॥
असो हा त्रयोदस्य येथूनि जाला । चतुर्दस्य वेगें पुढें प्राप्त जाला ।
जयामाजि आखंडध्यानें समर्थें । भलीं बोलिलीं निस्पृहाला यथार्थें ॥१३॥
पुढें ऐकणें निस्पृहा बुद्धियोगु । चतुर्दस्य आखंडध्यानीक भागु ।
समासामधें निस्पृहां वर्तवीलें । पुढें भव्यभिक्षेसि नीरोपियेलें ॥ १४ ॥
जगीं दत्त गोरक्षआदीकरूनी । बहु सिद्ध जाले चि भिक्षेवरूनि ।
पहा रे महादेव तो शुद्धभावें । निरापेक्ष भिक्षा करितो स्वभावें ॥ १५ ॥
ह्मणोनी मुठीधान्य मागोनि खावें । जनीं वीजनीं निस्पृहे ख्यात व्हावें ।
सुखें ग्रंथगर्भास तें वीवरावें । विवेकें बळें त्या जना उद्धरावें ॥ १६ ॥
स्वयें तीसऱ्यामाजि स्वामीसमर्थें । त्रिविधा कवित्वासि निरोपिलें तें ।
धिटी पाठ किं भव्य प्रासादिकाला । बहुतापरी वीवरीलें तयाला ॥ १७ ॥

कलौ कीर्तनीं रूप अद्भूत केलें। कवी मातृका अक्षरा दर्शवीलें।
तथा आगुती पांचव्यामाजि देवें। कथा सांग संपादिली देवदेवें ॥१८॥
कितियेक चातुर्य निरोपिलेंसे। कलौ धर्म सातामधें बोलिलासे।
पुढें आठव्यामाजि अखंडध्यानें। समाधान केलें असे स्वामियानें॥१९॥
रघुनाथउपासना ध्यानमूर्ति। तथा अंतरात्म्याकडे चित्तवृत्ति।
स्वभावें चि तो राम आत्मा जगाचा। घडीनें घडी लाभ घ्या दर्शनाचा॥
समासा नवामाजि त्या शाश्वताला। बहुतापरी शोधिलेंसे तयाला।
ह्मणे पिंडब्रह्मांड थोतांड आहे। पुढें अंतरात्म्यासि शोधून पाहें॥२१॥
समासा दाहामाजि माया निरोपी। कितियेक दृष्टांतद्वारें अरोपी।
असो ध्यान अखंड हें स्वामियाचें। सदा ग्रंथरूपें जिणें सार्थकाचें॥२२
पुढें ऐकणें योग हा पंधरावा। अति आदरें दृढ चित्तीं धरावा।
पहिल्या समासांत चातुर्य मोठें। कितियेक अर्थांतरीं सौख्य वाटे॥२३
ह्मणे निस्पृहें येकदेसी नसावें। जनीं वीजनीं सर्वदेसीं असावें।
जगीं भेटिभेटोनि ते ऊरि राखा। कथाकीर्तनीं सोख्य उदंड देखा॥२४॥
पुढें दुसऱ्यामाजि सृष्टिस्वभावो। निरोपी प्रभु सर्व लोकप्रवाहो।
तयामाजि तो निस्पृहु राजमार्गें। करी व्याप आटोप तो भक्तिमार्गें॥२५
पुढें श्रेष्ठ तो अंतरात्मा चि केला। मुळापासुनी पंचिकर्णांत आला।
परी पाहतां त्या गुणा पार नाहीं। तयावीण कांहीं च होणार नाहीं॥
पदार्थीक मोडूनि पृथ्वी च जाली। पुढें ते जळीं मूळरूपें निमाली।
भुतें सर्व ही ग्रासिलीं पंचभूतें। नभाकार हे वृत्ति निवृत्ति तेथें ॥२७॥
स्वयें ब्रह्म हें शाश्वती बोलिलेंसे। पुढें निश्चळीं चंचळ चालिलेंसे।
मुलें मारिती बाप आधीं विवंचा। चुकाऱ्या निघे भूप चौघां जणांचा॥
कुटें बोलिलीं त्या समासांत देवें। पाहा कौतुकें लेखनाच्या स्वभावें।
पितापासुनी कृष्ण जालें लेहाया। पुढें ग्रंथगर्भार्थ तो वीवराया॥ २९॥
अधोर्धीक संवाद तो सृष्टिरूपें। मुळीं मूळमाया निरोपी स्वरूपें।
दिसे भेद सृष्टींत अभेद कैंचा। ह्मणे स्वामि आधीं अभेदा विवंचा॥३०
अणुहूनि लाहान हे जीव येथें। बहुतापरी वीवरीले समर्थें।
तयामाजि ही देव तो अंतरात्मा। भुतें पिंड ब्रह्मांड व्यापून आत्मा॥३१॥

नवांमाजि पिंडोत्पत्ति सांगताहे । तया पिंडिचा चाळकु कोण आहे ।
पुढें पाहतां रामउपासना ते । तेथें गुतली भक्तिची वासना ते ॥ ३२ ॥
दाहाव्या समासांत सिद्धांत केला । पुढें जीव हा मूळ शोधीत गेला ।
मनोभावना रामउपासनेला । यथाशक्ति उत्तीर्ण व्हावें तयेला ॥ ३३ ॥
ह्मणोनी समर्थें रघुनाथभक्ति । अति दृढ केली अति वाढ कीर्ति ।
निवृत्तिपदीं बैसवीलें जिवाला । परिपूर्ण हा योग येथून जाला ॥ ३४ ॥
असो बोलिला पंधरावां समासीं । पुढें षोडशी योग तत्वान्वयासी ।
वदों तेथ श्रोतेजनीं चित्त द्यावें । सुखें ग्रंथगर्भाकडे चित्त न्यावें ॥ ३५ ॥
समासामधें वाल्मिकाला स्तवीलें । रघुराजउपासकां दर्शवीलें ।
पुढें सूर्य हा वंश श्रीराघवाचा । ह्मणोनी तया वर्णितो स्वामि साचा ॥३६
स्वयें दोनि हे बोलिले दों समासीं । निरोपी पुढें पंचभूतान्वयासी ।
उभारूनि ही वारिलीं स्वामियानें । वदों तो चि संकेत हा कौतुकानें ॥३७
मही थोर छपन्नकोटी धरा हे । जिच्या आश्रयें मेरुमांदार राहे ।
अवर्णोदकें आणि सिंधोदकें तें । इच्या आश्रयें राहिलीं उदकें तें ॥ ३८ ॥
किती वाढती मोडती च्यारि खाणी । किती उत्पति लक्ष चौऱ्यासि योनी
किती धातुपाषाणरत्नें महीं हो । किती भार विस्तार हा सर्व ही हो ॥३९
पुढें आप विस्तारलें तीन लोकीं । भुमीगर्भ आणीक आवर्णलोकीं ।
तयावीण हें शुष्क सर्वत्र होतें । आपापासुनी सर्व निर्माण होतें ॥ ४० ॥
कितीं अमृतें स्वर्गलोकीं सुराला । कितीं उदकें मृत्यलोकीं नराला ।
किती भूपति नृपति थोर राजे । जनीं उदकाच्या गुणें सर्व साजे ॥४१॥
पुढें अग्नि हा जानकीचा पिता हो । असे सर्व वैश्वानरु सर्वथा हो ।
रविचंद्रतारादि नानाप्रकाशें । बहु व्याप केला आहे या हुताशें ॥ ४२ ॥
अवर्णामधें आणि सिंधूमधें हो । शरीरामधें आणि सर्वांमधें हो ।
पाहा मंद होतां चि तो मृत्य देतो । चितारूढ होऊनि कार्यास येतो ॥
स्वयें अग्निनारायणु विश्वधर्ता । पुढें वायु हा सर्व ब्रह्मांडकर्ता ।
करी वीवरी हा हरीरूप वायु । तिन्ही लोक व्यापूनि जाला उपायु॥४४
रविचंद्रतारा नभीं सर्व सत्ता । घनें वर्षिजे सौख्य वायु चि कर्ता ।
किती बोलणें चालणें सर्व वायो । अवर्णें परी हा धरी मुख्य वायो॥४५

पुढें पुत्र हा निर्मिला मारुतानें । कसें रावणा गांजिलें मारुतीनें ।
तया बायुदेवांतरीं राम आत्मा । ह्मणोनी भिमाअंतरीं राम आत्मा ॥४६
स्वयें सातव्यामाजि तो अंतरात्मा । समर्थें बरा वीवरीला भुतात्मा ।
धराआपतेजास वायूस धर्ता । तिन्हीलोक कर्ता चि कर्ता अकर्ता ॥४७
तेथें येक साक्षेप केला समर्थें । प्रकृतिवरा रूप केलें यथार्थें ।
देह येक असोनियां दोनि भावो । मुळीं सूक्षमीं हा प्रकृतिस्वभावो ॥४८
पुन्हा मागुती बोलिला अंतरात्मा । बहुतापरी वीवरीला देहात्मा ।
कितीयेक कर्णें कितीयेक धर्णें । कितीयेक हर्णें किती तें विवर्णें ॥४९॥
जनीं बोलती देव निर्गुण माझा । तयाचा करी निश्चयो योगिराजा ।
ह्मणे गुण निर्गुण तो अंतरात्मा । महद्भूत उपासना सर्व आत्मा ॥ ५० ॥
जसें तुळसीचे वरी पात्र न्यावें । मुळीं आप येतें चि तेथें स्वभावें ।
तयाकारणें मूळ सर्वत्र आत्मा । गुणातीत निर्गुण तो निर्मळात्मा ॥ ५१ ॥
भुतें बोलिलीं गुण हे काय जाले । पुसे श्रोतया स्वामि तो काय बोले ।
त्रिगुणें महद्भूत वेष्ठून आलें । ह्मणोनी समर्थें निसंदेह केलें ॥ ५२ ॥
असो षोडशी योग येथुनि जाला । भुतातीत आत्मा प्रचीतीस आला ।
गुणातीत केलें गुणारूप केलें । गिरि स्वामियोगें समाधान जालें ॥ ५३ ॥

इति श्रीग्रंथभावार्थ श्लोकबद्ध तत्वान्वयदशकपर्यंत निरूपण संपूर्णमस्तु श्रीरामार्पणमस्तु दशक सोळावा अभंग चवथा ॥ ४ ॥

---

॥ श्री ॥

सुखें बोलिलें पूर्ण तत्वान्वयाला । पुढें पेकिलें पाहिजे अन्वयाला ।
देह देउळें दीसती देव कोठें । देहातीतयोगें पुढें देव भेटे ॥ १ ॥
मुळीं शिवशक्ति पुढें भेद जाला । बिजें फोडितां काय दिसे तुम्हाला ।
पुढें वाढतां वृक्ष माथोद्भवाचा । अधो डाहळ्या चालिल्या उद्भवाच्या ॥
प्रचीतीविणें ग्रंथ सोडों नका रे । धरा अंतरीं अर्थ अर्थानुसारें ।
धराआपतेजावरी वायु आत्मा । हरिरूप संकल्प तो निर्मळात्मा ॥ ३ ॥
ह्मणे चंचळ निश्चळ येकसारें । रुपें वेगळालीं करीना विचारें ।
भ्रमाला ह्मणे हें परब्रह्म माझें । अनुमान हा वारिला योगिराजें ॥ ४ ॥

समासीं जपा अजपारूप केलें । पुढें देह आत्म्यास तें वीवरीलें ।
सिव्या दीधल्या लागल्या आत्मयासि । परब्रह्म तें काय लागेल त्यासी ॥
जगाचें असे जीवन या जगांतु । निरोपी प्रभु सातव्यामाजि मातु ।
पुढें आठव्यामाजि तत्वें निरोपी । गुणें गुण हि कर्दमे हि निरोपी ॥ ६ ॥
नवामाजि त्या मागुती तत्वमाळा । तनु च्यारि निवेदिल्या वेळवेळां ।
देह भोग मात्रा अवस्था गुणाला । अभीमान शक्ति निरोपी स्थळाला ॥
आवर्णोदकीं ईश्वरु येक आहे । तया दर्शना जीव हा केंवि जाये ।
ह्मणोनी तया ज्ञान आधीं असावें । विवेकें चि हें दर्शनु घेत जावें ॥८॥
जनीं टोणप्याला कळे काय येथें । बहुतापरी बोलिलें हें समर्थें ।
आरे नेमकातें मने आकळेना । तेथें बाष्कळातें कदां ही कळेना ॥ ९ ॥
असो योग हा सतरावां समर्थें । परिपूर्ण केला असे अर्थअर्थें ।
प्रकृतिवरा रूप केलें स्वभावें । पुढें सज्जनीं आवडी चित्त द्यावें ॥१०॥
सुखें ऐकिले योग सत्रा यदर्थीं । पुढें सज्जनीं चित्त द्यावें तदर्थीं ।
बहु जीनसी योग हा आठरावां । सुखें ग्रंथगर्भार्थ पोटीं धरावा ॥ ११ ॥
बहु देव नीरोपिले त्या समासीं । मुळीं देव तो अंतरात्मा च त्यासी ।
समस्तामध्यें येक आत्मा च देखा । विरंचीहरीशिवपर्यंत लेखा ॥ १२ ॥
जगीं जाणता अंतरात्मा प्रसंगें । करा सार्थकें आजि सर्वज्ञसंगें ।
पुढें ध्यान धर्ता पुढें ध्येय व्हावें । भुतातीत आत्मा चि होऊन जावें ॥१३॥
पुढें तिसऱ्यामाजि त्या निस्पृहाला । बहुतापरी सीकवीलें तयाला ।
देहदुल्लभीं नाश होतो वयाचा । धरा नित्य हव्यास अभ्यास याचा ॥१४॥
समासा चहूंमाजि त्या स्वामियानें । देह श्रेष्ठ केलें असे कौतुकानें ।
हरीभक्ति वीरक्ति हे देहयोगें । घडे भोगणें त्यागणें याचयोगें ॥ १५ ॥
जगीं देह ते पूज्य पूज्याधिकारी । कितीयेक ते दीसती दुःखकारी ।
तया दुर्जना राखराखों असावें । जनीं सज्जनीं साधुसंगें वसावें ॥१६॥
पुढें पांचवा सर्वकष्टापहारी । समासामधें अर्थ अर्थानुसारी ।
कितीयेक गोवे तया वक्तयाचे । समर्थें बहु काढिले हो तयाचे ॥ १७ ॥
बहु भूषणें देह श्रृंगारवीलें । विचारेंविणे सर्व ही वेर्थ गेलें ।
तयाला गुणी उत्तमी बोध केला । असे बुद्धि देणें तया ईश्वराला ॥१८॥

पुढें सातव्यामाजि लोकीकभावो । बरा वीवरी हा जनाचा प्रवाहो ।
जने बोलती देव कांहीं आह्माला । पुढें देव तो खेव होतो तयाला ॥१९
तयालागि आठामधें सांगताहे । अरे अंतरीं देव शोधूनि पाहें ।
देह चाळकु पाळकु अंतरात्मा । तयाचेनि योगें पुढें निर्मळात्मा ॥ २० ॥
बहुतापरी वीवरीलें समर्थें । परि झोंप येते तया श्रोतयातें ।
कितीयेक विक्षेप कार्यास येती । जनीं सुकृती त्यासि कांहीं न येती ॥२१॥
किती वादवेवाद जाले अनर्थें । बहुतापरी सीकवीलें समर्थें ।
बहु तापले नीववीले तयानें । दिल्हे सारविचार त्या स्वामियानें ॥ २२ ॥
असो ऐकिले आठरा योग श्रोतां । पुढे उरले दोनि हे योग आतां ।
तयामाजि हा सीकवीला समर्थें । सुखें ऐकिजे आवडी सुखस्वार्थें ॥२३॥
आधीं लेखनीरूप अद्भूत केलें । समासा दुज्यामाजि विवर्ण जालें ।
पुढें वर्तणें निस्पृहें या जनातु । समस्तैक सांगोनि देती समर्थु ॥ २४ ॥
समर्थाकडे हा न पाहे करंटा । म्हणोनी च हा जाहलासे करंटा ।
तयाच्या गुणा वीवरीलें समासीं । कितीयेक ते बोध केले तयासी ॥ २५ ॥
तयाचे पुढें दैव कैसें उदेलें । समासा चहूंमाजि तें भाग्य आलें ।
हरिभक्ति वीरक्ति बोधें तयाला । बहुतापरी बोधितां स्वामि जाला ॥२६॥
पुढें देव नीरोपिले स्वामियानें । बहु देव सांगीतलें कौतुकानें ।
मुळीं देव येकु तयाचे अनेकु । जगीं दाविला तो खरा देव येकु ॥ २७ ॥
पुढें साहव्यामाजि तो बुद्धिवादु । बहुतांपरीचा बहुसाल बोधु ।
देहाचा भरोसा नसे याचलागीं । महंतें करावी हरिभक्ति वेगीं ॥ २८ ॥
समासीं पुढें यत्न तो सीकवीला । कितीयेक लोकीक हा दर्शवीला ।
तेथें व्याप होतां चि संताप येति । तयामाजि तें दक्ष साहूनि नेती ॥ २९
उपाधीस विस्तारिलें वीवरीलें । पुढें शुद्ध विश्रांतीला पाववीलें ।
देह साधनीं घातलें ज्ञानियानें । देहातीत केलें असे स्वामियानें ॥ ३० ॥
पुढें राजकाणीस विस्तारिलेंसे । कितीयेक नानापरी वारिलेंसे ।
समुदावहव्यास सांगे उदासां । बरें वीवरी आपुल्या निजदासां ॥३१॥
दाहाव्या समासांत विवेक केला । बहुतापरीचा बहु बोध जाला ।
किती निस्पृहाला दिला बुद्धियोगु । परिपूर्ण येकोणिसी हा प्रयोगु ॥३२

पुढें ऐकणें योग आतां विसांवा । जया ऐकतां होत जीवां विसांवा ।
समासामध्यें सार्थकें पारमार्थें । परिपूर्ण हा योग केला समर्थें ॥३२॥
आधीं पूर्ण अपूर्ण हें वीवरीलें । नभासारिखें ब्रह्म तें पूर्ण केलें ।
ह्मणे स्वामि निरंजनु येक आत्मा । दुजा अंतरात्मा चि तो चंचळात्मा॥
पुढें ज्ञान अज्ञान विपरीतज्ञानें । बरीं वीवरीलीं तया स्वामियानें ।
जिवात्मा शिवात्मा पुढें जन्म घेतो । निवृत्तीपदीं पावतां मोक्ष होतो ॥
त्रिधासृष्टि आतां कसी बोलिलीसे । मुळीं मूळमाया पुढें चालिलीसे ।
पुढें दुसरा भाग पांचा भुतांचा । दिसे तिसरा भाग हा उत्पतीचा ॥
पुढें सूक्ष्म नामासि सिद्धांत केला । वदों हेतसंकेत हा श्रोतयाला ।
पुढें बोलिलीं सर्व तेवीस नामें । धरा अंतरीं वीवरा दृढ नेमें ॥ ३७ ॥
मुळीं मूळमाया तथा शिवशक्ति । प्रकृत्तिवरु ईश्वरु अर्धशक्ति ।
महत्तत्व चैतन्य तें गुणसाम्या । गुणक्षोभिणी गुण जीवांतरात्म्या ॥३८
मनेसीं चतुर्दस्य तीं पांचभूतें । पुढें च्यारि खाणी तया उत्पतीतें ।
समस्तैक तेवीस नामें पहावीं । पुढें नीर्गुणीं सर्व ही नीरसावीं ॥३९॥
जनीं बोलिलीसे पुढें आत्मसत्ता । कळे तें करूं रामकर्ता चि भोक्ता ।
जगीं सर्व वीभागला ज्ञानरूपें । पुढें ज्ञान विज्ञान ध्यानस्वरूपें ॥ ४० ॥
पुढें पांचव्यामाजि चत्वार भागु । परब्रह्म आणीक माया विभागु ।
दिसे तिसरा भाग पांचाभुतांचा । चहूखाणिचा भाग हा उत्पतीचा ॥
परब्रह्म माया भुतें च्यारि खाणी । समर्थें भलीं बोलिलीं रम्यवाणीं ।
स्वयें पाहणें तें चि येथें पाहावें । ह्मणे स्वामिसिद्धांत तेथें राहावें ॥४२
पुढें साहव्यामाजि अत्मा विवर्णें । तथा सातवीं तें समाधान कर्णें ।
नव्हे सांडिजेसें नव्हे मांडिजेसें । नभाचे परी हें परब्रह्म तैसें ॥ ४३ ॥
अनुर्वाच्य ऐसें समाधान जालें । पुढें आत्मयाच्या गुणा दर्शवीलें ।
विधीच्या प्रपंच्यासि नीरोपिलेंसे । देहयंत्र ही कौतुकें बोलिलेंसे ॥४४॥
पुढें मागुती सूक्ष्म नामाभिधानें । बरीं वारिलीं सारिलीं कौतुकानें ।
समासीं पुढें तें परब्रह्म केलें । नभासारिखें येक सर्वत्र जालें ॥ ४५ ॥
असो ग्रंथभावार्थ मी काय जाणे । स्तुतीवादसंवाद कांहीं च नेणे ।
जळामाजि असोनि नेणे जळासी । समर्थें मला बोलवीलें दिनासी ॥

सुखें जाहले योग हे स्वामियाचे । वदों काय मी गुण सर्वोत्तमाचे ।
जनीं द्वोनिशें तीस श्लोकार्थ केला । वेणीस्वामिपाईं गिरी लीन जाला ॥

इति श्रीग्रंथभावार्थ श्लोकबद्ध पूर्णदशकपर्यंत निरूपण संपूर्णमस्तु

श्रीरामचंद्रार्पणमस्तु दशक विसांवा अभंग पांचवा ॥ ५ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

( २ )

# ग्रंथान्वय

समर्थाच्या मुखें ग्रंथारंभ जाला । लोकीं विस्तारला दासबोध ॥ १ ॥
दासबोध वीस दशक तयास । दोनिशें समास ग्रंथामध्यें ॥ २ ॥
ग्रंथामध्यें ऐका समासाचीं नांवें । श्रोतीं चित्त द्यावें ग्रंथगर्भी ॥ ३ ॥
ग्रंथगर्भी सांगों स्तवनदशक । ग्रंथारंभ येक समास हा ॥ ४ ॥
समास हा दुजा गणेशस्तवन । शारदावंदन तिसऱ्यामध्यें ॥ ५ ॥
तिसऱ्यामध्यें माये शारदेचें रूप । चौथ्यामध्यें रूप सद्गुरूचें ॥ ६ ॥
सद्गुरूचें रूप चौथ्यामध्यें केलें । संताला स्तविलें पांचव्यांत ॥ ७ ॥
पांचव्यांत जालीं संतांचीं स्तवनें । साहवीं वंदनें श्रोतयांचीं ॥ ८ ॥
श्रोतयांचीं रूपें साहावे समासीं । सातवे समासीं कवीश्वर ॥ ९ ॥
कवीश्वर जाले सातवे समासीं । आठवे समासीं सभा जाली ॥ १० ॥
सभा जाली आतां समासांत पाहा । नवामध्यें तो हा परमार्थ ॥ ११ ॥
परमार्थ नवा समासांत केला । नरदेह स्तविला दाहव्यांत ॥ १२ ॥
दाहाव्यांत जाले नरदेहस्तवन । एवं वर्तमान दशकाचें ॥ १३ ॥
दशकाचें एवं जालें वर्तमान । मूर्खांचें लक्षण स्वामी सांगे ॥ १४ ॥
स्वामी सांगे आतां दुसरा दशक । पहिल्यामध्यें मूर्ख सिकविला ॥१५॥
सिकविला मूर्ख पहिल्या समासीं । उत्तमगुणासी सांगताहे ॥ १६ ॥

सांगताहे गुण उत्तम समर्थ । दुसरा यथार्थ समास हा ॥ १७ ॥
समास तिसरा कुविद्यालक्षण । भक्तिप्रबोधन चौथ्यामध्यें ॥ १८ ॥
चौथ्यामध्यें भक्ति कांहीं यथाशक्ति । पांचवा निश्चिती ऐका पुढें ॥१९॥
ऐका पुढें रजोगुणाचें वर्णन । साहावें लक्षण तमाचें तें ॥ २० ॥
तमाचें लक्षण साहावे समासीं । सातवे समासीं सत्वगुण ॥ २१ ॥
सत्वगुणरूप सातवे समासीं । आठवे समासीं सद्विद्येचें ॥ २२ ॥
सद्विद्येचें रूप आठवे समासीं । पुढें विरक्तासी सिकविलें ॥ २३ ॥
सिकाविलें विरक्तासि नवामध्यें । पुढें दाहामध्यें पढतमूर्ख ॥ २४ ॥
पढतमूर्ख केला दाहावे समासीं । दुसऱ्या दशकासी निवेदिलें ॥ २५ ॥
निवेदितों आतां स्वगुणपरीक्षा । सज्जनीं उपेक्षा करूं नये ॥ २६ ॥
करूं नये आतां सज्जनीं उदास । आधीं गर्भवास बोलिलासे ॥ २७ ॥
बोलिलासे बाळतारुण्यसमंध । द्वितीय समंध तिसऱ्यामध्यें ॥ २८ ॥
तिसऱ्यामध्यें मुलें जालीं मेलीं गेलीं । पुन्हा स्त्री हि केली गुंडाळला ॥
गुंडाळला प्राणी तिसऱ्या समंधीं । संसाराचे बंदीं पडिलासे ॥ ३० ॥
पडिलासे घोर नित्य संसारीचा । वृद्धापीं दारेचा शोक जाला ॥ ३१ ॥
शोक जाला थोर पांचवे समासीं । वृद्धपण त्यासी प्राप्त जालें ॥ ३२ ॥
प्राप्त जालें पुढें तापाचें लक्षण । आध्यामिक जाण बोलिलासे ॥ ३३ ॥
बोलिला आध्यातम साहावे समासीं । आधिभौतिकासी सातामध्यें ॥
सातामधें दुःख्र आधिभौतिकाचें । आधिदैविकाचें आठामध्यें ॥ ३५ ॥
आठामध्यें जाली यमाची यातना । नवामध्यें जाणा मृत्यु आला ॥३६ ॥
मृत्यु आला येथें नववे समासीं । दाहावे समासीं वैराग्य तें ॥ ३७ ॥
वैराग्य तें आलें दाहावे समासीं । तिसऱ्या दशकासी निवेदिलें ॥३८॥
निवेदितों पुढें नवविधा भक्ति । श्रोतीं व्हावें चित्तीं सावधान ॥ ३९ ॥
सावधान श्रवण करावें समासीं । पुढें कीर्तनासी बोलिलेंसे ॥ ४० ॥
बोलिलेंसे येथें श्रवण कीर्तन । तिसरें स्मरण निरोपिलें ॥ ४१ ॥
निरूपिलें चौथें पायाचें सेवन । पांचवें लक्षण अर्चनाचें ॥ ४२ ॥
अर्चनलक्षण पांचवे समासीं । साहावे समासीं नमस्कार ॥ ४३ ॥
नमस्कारापुढें दास्य सातामधें । पुढें आठामधें सखा देव ॥ ४४ ॥
सखा देव जाला आठवे समासीं । नववे समासीं निवेदन ॥ ४५ ॥

निवेदन जालें नववे समासीं । दाहावे समासीं च्यारि मुक्ति ॥ ४६ ॥
च्यारि मुक्ति भक्ति निरूपिल्या शक्ति । निर्गुणाची भक्ति साच केली ॥
सार केली भक्ति येर नाशवंत । चौथ्या दशका प्रांत जाला येथें ॥४८॥
जाला येथें गिरिधर धन्य धन्य । शरण अनन्य स्वामियासी ॥ ४९ ॥

इति श्रीग्रंथान्वयकथन नवविधाभक्तिपर्यंत निरूपण दशक चवथा
अभंग प्रथम ॥ १ ॥ ४ ॥

---

॥ श्रीराम ॥

भक्तीचा दशक ऐकिलासे संतीं । मंत्रदशक श्रोतीं आइकावा ॥ १ ॥
आइकावा श्रोतीं दशकाचा अन्वय । पहिल्यांत निश्चय सद्गुरूचा ॥ २ ॥
सद्गुरूचा केला पहिल्यांत निश्चय । दुसऱ्यांत अन्वय लक्षणाचा ॥ ३ ॥
लक्षणें गुरूचीं दुसऱ्या समासीं । तिसऱ्या समासीं शिष्य जाले ॥ ४ ॥
शिष्य जाले सर्व तिसऱ्या समासीं । चवथ्या समासीं उपदेश ॥ ५ ॥
उपदेशलक्षणें चौथ्यामध्यें केलीं । बहुधाज्ञानें जालीं पांचव्यांत ॥ ६ ॥
पांचव्यांत बहुधाज्ञानाचीं लक्षणें । साहव्यांत पूर्ण समाधानें ॥ ७ ॥
समाधानें जालीं साहव्याच्या योगें । समास हा वेगें निरोपिला ॥ ८ ॥
निरोपिला पुढें सातवा समास । बध्धलक्षणास विवरिलें ॥ ९ ॥
विवरिलें सातामध्यें हें लक्षण । आठामध्यें जाण मुमुक्षु हा ॥ १० ॥
मुमुक्षु हा जाला आठवे समासीं । नववे समासीं साधकु तो ॥ ११ ॥
साधकु तो जाला नववे समासीं । दाहावे समासीं सिध्ध आतां ॥१२॥
सिद्ध आतां जाला दाहावे समासीं । पांचा दशकासी विवेदिलें ॥ १३ ॥
निवेदितों आतां दशक साहवा । सज्जनीं ऐकावा येकाचित्तें ॥ १४ ॥
येकाचित्तें देवशोधन ऐकावा । पहिल्यामध्यें देवा शोधिलेंसे ॥ १५ ॥
शोधिलेंसे देवा पहिले समासीं । दुसऱ्या समासीं ब्रह्मीं पावे ॥ १६ ॥
ब्रह्मीं प्रविष्ट हा समास दुसरा । जाणावा तिसरा मायोद्भव ॥ १७ ॥
मायोद्भव जाला तिसऱ्या समासीं । चवथ्या समासीं ब्रह्म केलें ॥ १८ ॥
ब्रह्म केलें चौथ्या समासांत देवें । पांचवीं स्वभावें मायाब्रह्म ॥ १९ ॥
मायाब्रह्म जालें पाचव्या समासीं । साहव्या समासीं सृष्टि मिथ्या ॥२०॥

सृष्टि मिथ्या ऐसें साहव्याचें ज्ञान । सातवीं भजन सगुणाचें ॥ २१ ॥
सगुणाचें केलें सातवीं भजन । आठवीं निर्शन दृश्य सारें ॥ २२ ॥
दृश्य सारें सरे आठवे समासीं । नववे समासीं सार शोधा ॥ २३ ॥
सार शोधुनियां नववे समासीं । दाहावे समासीं समाधान ॥ २४ ॥
समाधान अनिर्वाच्य जालें तेथें । दशक श्रोतयातें निवेदिला ॥ २५ ॥
निवेदितों चौदा ब्रह्माचा दशक । स्तवनाचा येक समास हा ॥ २६ ॥
समास हा दुजा ब्रह्मनिरूपण । तिसऱ्यामध्यें जाण चौदा ब्रह्में ॥ २७ ॥
चौदा ब्रह्में केलीं तिसऱ्या समासीं । चौथ्या समासीं विमळब्रह्म ॥२८॥
विमळब्रह्म चौथ्या समासांत केलें । पांचवीं वारिलें कल्पनेसी ॥ २९ ॥
कल्पनेचे पोटीं बद्ध मुक्त जाले । साहावीं बोलिलें शोधुनियां ॥ ३० ॥
शोधुनियां साहा समासीं वरिष्ठा । साधनंप्रतिष्ठा सातामध्यें ॥ ३१ ॥
सातामध्यें केलें प्रतिष्ठासाधन । श्रवणमहिमान आठामधें ॥ ३२ ॥
आठामधें जालें श्रवणमहिमान । श्रवणलक्षण नवामध्यें ॥ ३३ ॥
नवामध्यें जाला ग्रंथाचा निश्चय । दाहव्यांत अन्वय देहातीत ॥ ३४ ॥
देहातीत जाला निश्चय दाहवीं । दशक सातवी पूर्ण जाला ॥ ३५ ॥
पूर्ण जालो पुढें आठवा ऐकिजे । उदास नव्हिजे श्रोतेजनीं ॥ ३६ ॥
श्रोतेजनीं पहिला समास पाहावा । तयामध्यें देवा देखिलेंसे ॥ ३७ ॥
देखिलेंसे देवा समासांत येका । सूक्ष्म आशंका दुसऱ्यामध्यें ॥ ३८ ॥
दुसऱ्यामध्यें मायासुक्षम आशंका । तिसऱ्यांत हि देखा आशंका चि ॥३९॥
आशंकानिर्शन पुढें पंचभूतें । चौथ्यामध्यें येथें निरोपिलीं ॥ ४० ॥
निरोपिलीं स्थूळ भूतें पांचामध्यें । पुढें साहामध्यें निरूपण ॥ ४१ ॥
निरूपण साहां समासांत केलें । दुश्चीत देखिलें श्रोतयांसी ॥ ४२ ॥
श्रोतयांसी सातां समासांत मोक्ष । आठव्यामध्यें दक्ष आत्मदर्शी ॥४३॥
आत्मदर्शन तें आठवें समासीं । नववे समासीं सिद्धरूपें ॥ ४४ ॥
सिद्धरूपें केलीं नववे समासीं । दाहावे समासीं शून्य सरे ॥ ४५ ॥
शून्य सरे सर्व दाहावे समासीं । ज्ञानदशकासी निवेदिलें ॥ ४६ ॥
निवेदिलें आतां ज्ञानदशकासी । गिरिधर त्यासी शोधिताहे ॥ ४७ ॥

इति श्रीग्रंथान्वयकथन आत्मज्ञानपर्यंत निरूपण दशक अष्टम अभंग द्वितीय ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

आठवा दशक ऐकिला सज्जनीं । नववा सुजनीं आइकावा ॥ १ ॥
आइकावा गुणरूप हा नववा । पहिल्यामध्यें यावा आशंकेचा ॥ २ ॥
आशंकानिरास पहिला समास । दुसरा समास ब्रह्मरूप ॥ ३ ॥
ब्रह्मरूप जाला समास दुसरा । आइका तिसरा निसंदेह ॥ ४ ॥
निसंदेह केलें तिसऱ्या समासीं । चवथ्या समासीं जाणपण ॥ ५ ॥
जाणपण जालें चवथ्या समासीं । पुढें अनुमानासी निरसिलेंसे ॥ ६ ॥
निर्शिलासे पांचव्यांत अनुमान । गुणरूपज्ञान साहव्यांत ॥ ७ ॥
साहव्यांत गुणरूप पूर्ण केलें । विकल्पा निर्शिलें सातव्यांत ॥ ८ ॥
सातव्यांत जालें विकल्पनिर्शन । बद्धाचें जनन आठामध्यें ॥ ९ ॥
आठामध्यें जालें बद्धाचें जनन । संदेहवारण नवामध्यें ॥ १० ॥
नवामध्यें जालें संदेहवारण । स्थितिनिरूपण दाहव्यांत ॥ ११ ॥
दाहाव्यांत जालें स्थितीचें लक्षण । गुणरूप पूर्ण जाला येथें ॥ १२ ॥
जाला येथें गुणरूप हा दशक । बीजोद्भव येक आइकावा ॥ १३ ॥
आइकावा अंतःकर्णाचा समास । देहउत्पन्नास दुसरा हा ॥ १४ ॥
दुसरा हा देह उत्पन्न स्वभावें । आशंकेच्या भावें तिसरा हा ॥ १५ ॥
तिसरा हा जाला आशंकाशोधन । बीजाचें लक्षण चौथ्यामध्यें ॥ १६ ॥
चौथ्यामध्यें जालें बीजाचें लक्षण । पांचवीं वर्णन प्रळयाचें ॥ १७ ॥
प्रळयाचें रूप पांचवे समासीं । भ्रमलक्षणासी साहवा हा ॥ १८ ॥
साहावा हा भ्रमलक्षणसमास । सगुणभजनास सातवा हा ॥ १९ ॥
सातवा हा जाला सगुणभजन । पुढें निरूपण प्रचीतीचें ॥ २० ॥
प्रचीतीचें निरूपण दों समासीं । आठव्यानव्यासि निवेदिलें ।
निवेदिले आठ नउ हे समास । दाहावा समास सांगताहे ॥२२॥
सांगताहे चळाचळाचें लक्षण । दाहावा संपूर्ण जाला येथें ॥ २१ ॥
जाला येथें पूर्ण बीजोद्भव नावें । भीमदशक भावें आइकावा ॥ २४ ॥
आइकावा श्रोतीं पहिला समास । सिद्धांत सर्वांस केला तेथें ॥ २५ ॥
केलें तेथें सिद्धांताचें निरूपण । दुसऱ्यामध्यें पूर्ण च्यारि देव ॥ २६ ॥
च्यारि देव सांगे दुसऱ्या समासीं । तिसऱ्या समासीं सिकवण ॥ २७ ॥
सिकवण जाली तिसऱ्या समासीं । चवथ्या समासीं विवेक हा ॥ २८ ॥

विवेक हा सार चवथ्या समासीं । राजकारणासी पांचव्यांत ॥ २९ ॥
पांचव्यांत जालीं राजकार्णरूपें । महंतांचीं रूपें साहव्यांत ॥ ३० ॥
साहव्यांत जालें महंतलक्षण । सातव्यांत पूर्ण गुप्तेश्वर ॥ ३१ ॥
गुप्तेश्वर सातामध्यें बोलिलासे । आठामध्यें असे गुप्तगंगा ॥ ३२ ॥
गुप्तगंगा बोलिलिसे आठामधें । पुढें नवामध्यें उपदेशु ॥ ३३ ॥
उपदेशलक्षण नवामधें जालें । दाहवीं वर्तविलें निस्पृहाला ॥ ३४ ॥
निस्पृहाला वर्तणुक सांगताहे । भीमदशक राहे येथुनिया ॥ ३५ ॥
येथुनियां आतां विवेकवैराग्य । बारावा हा योग्य आइकावा ॥ ३६ ॥
आइकावें आधीं विमळलक्षण । प्रत्ययलक्षण दुसऱ्यामधें ॥ ३७ ॥
दुसऱ्यामध्यें जालें प्रत्ययलक्षण । तिसऱ्यामध्यें पूर्ण देवभक्त ॥ ३८ ॥
देवभक्त जाले तिसऱ्या समासीं । पुढें वैराग्यासी निरोपिलें ॥ ३९ ॥
निरोपिलें चौथ्या समासीं वैराग्य । पांचवा हा योग्य निवेदनी ॥ ४० ॥
निवेदन त्रिधा जालें पांचव्यांत । पुढें साहव्यांत सृष्टिक्रम ॥ ४१ ॥
सृष्टिक्रम साहव्यांत बोलिलासे । सातवीं केलासे विषयत्याग ॥ ४२ ॥
विषयत्याग केला सातवे समासीं । आठवे समासीं काळरूपें ॥ ४३ ॥
काळरूपें केलीं आठवे समासीं । नवम समासीं यत्नरूपें ॥ ४४ ॥
यत्नरूपें जाला नववा समास । दाहावा समास पुरुषोत्तम ॥ ४५ ॥
पुरुषोत्तम जाला दाहवे समासीं । गिरिधर त्यासीं शरण गेला ॥ ४६ ॥
इति श्रीग्रंथान्वयकथन विवेकवैराग्यपर्यंत निरूपण दशक द्वादश अभंग तृतीय ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

विवेकवैराग्य ऐकिला दशक । नामरूप येक आइकावा ॥ १ ॥
आइकावा नामरूप हा तेरावा । ग्रंथ विवरावा श्रोतेजनीं ॥ २ ॥
श्रोतेजनीं आत्माअनात्माविवेक । पाहावा तो येक समास हा ॥ ३ ॥
समास हा सारासाराचा दुसरा । जाणाया तिसरा उभारणी ॥ ४ ॥
उभारणी केली तिसऱ्या समासीं । चवथ्या समासीं संव्हारणी ॥ ५ ॥
संव्हारणी ब्रह्मप्रळय चवथा । काहाणीची कथा पांचव्यांत ॥ ६ ॥
पाचव्यांत जाली कहाणीची कथा । लघुबोध आतां साहाव्यांत ॥ ७ ॥

साहव्यांत लघुबोध निरूपिला । प्रळय बोलिला सातव्यांत ॥ ८ ॥
सातव्यांत केलें प्रत्ययाचें रूप । कर्तव्याचें रूप आठामध्यें ॥ ९ ॥
आठव्यांत जालें कर्तव्याचें रूप । नवामध्यें रूप आत्मयाचें ॥ १० ॥
आत्मयाचें रूप नववे समासीं । दाहावे समासीं सिकवण ॥ ११ ॥
सिकवण जाली दाहावे समासीं । तेराव्या दशकासी निवेदिलें ॥ १२ ॥
निवेदिला पुढें चौदावा दशक । अखंडध्यानिक आइकावा ॥ १३ ॥
आइकावा आतां पहिला समास । देवें निस्पृहांस सिकाविलें ॥ १४ ॥
सिकवण जाली पहिल्या समासीं । दुसऱ्या समासीं भिक्षारूप ॥ १५ ॥
भिक्षारूप केलें दुसऱ्या समासीं । तिसऱ्या समासीं कवित्व हें ॥ १६ ॥
कवित्व हें त्रिधा बोलिलेंसे तेथें । चौथ्यामध्यें येथें कीर्तन हें ॥ १७ ॥
कीर्तन हें चौथ्या समासांत केलें । कथे निरोपिलें पांचव्यांत ॥ १८ ॥
पांचव्यांत कथा बोलिली संपूर्ण । चातुर्यलक्षण साहामध्यें ॥ १९ ॥
साहामध्यें जालें चातुर्यलक्षण । सातवीं संपूर्ण युगधर्म ॥ २० ॥
युगधर्म सातामध्यें निरूपिला । अखंडध्यानी जाला आठामधें ॥ २१ ॥
आठामधें जाला अखंड ध्यानस्छ । नववीं शाश्वत बोलिलेंसे ॥ २२ ॥
बोलिलें शाश्वत नववे समासीं । दाहवे समासीं मायारूप ॥ २३ ॥
मायारूप जालें दाहावे समासीं । चौदाव्या दशकासी निरोपिलें ॥२४॥
निरोपितों आतां दशक पंधावा । आत्मदशकभावा आइकावें ॥ २५ ॥
आइकावें श्रोतेजनीं येकचित्तें । आधीं चातुर्य तें निरोपिलें ॥ २६ ॥
निरोपिलें आधीं चातुर्यलक्षण । निस्पृह लक्षण दुसऱ्यामधें ॥ २७ ॥
दुसऱ्यामध्यें निस्पृहाचें हें लक्षण । तिसरें निरूपण अंतरात्मा ॥ २८ ॥
अंतरात्मा निरूपण तिसऱ्यामधें । पुढें चौथ्यामध्यें शाश्वत हें ॥ २९ ॥
शाश्वत हें ब्रह्म चौथ्यामधें केलें । पांचवीं बोलिलें चंचळ हें ॥ ३० ॥
चंचळ हें सांगे पांचवे समासीं । साहावे समासीं चातुर्य तें ॥ ३१ ॥
चातुर्य तें जालें साहवे समासीं । सातवे समासीं अधोर्ध्व हें ॥ ३२ ॥
अधोर्ध्व हें निरूपण सातामधें । पुढें आठामधें जीव सांगे ॥ ३३ ॥
जीव सांगे अतिसूक्ष्म समासीं । नववे समासीं पिंडोत्पत्ति ॥ ३४ ॥
पिंडोत्पतिनिरूपण नवामध्यें । पुढें दाहामध्यें सिद्धांत हा ॥ ३५ ॥
सिद्धांत हा केला दाहावे समासीं । पंध्रावे दशकासी निवेदिलें ॥३६॥

निवेदिलें पुढें तत्वअन्वयाला । श्रोतीं अन्वयाला सांभाळावें ॥ ३७ ॥
सांभाळावें श्रोतेजनीं अन्वयातें । सांगों सोळाव्यातें आवडीनें ॥ ३८ ॥
आवडीनें आधीं वाल्मिक स्तविला । दुसऱ्यांत वंदिला सूर्यराज ॥३९॥
सूर्यराज जाला दुसऱ्या समासीं । तिसऱ्या समासीं पृथ्वी जाली ॥४०॥
पृथ्वी जाली पुढें आपाचें स्तवन । अग्निनारायण पांचव्यांत ॥ ४१ ॥
पांचव्यांत जालें अग्नीचें स्वरूप । पुढें वायुरूप निरोपिलें ॥ ४२ ॥
निरोपिला वायु साहव्या समासीं । सातवे समासीं महद्भूत ॥ ४३ ॥
महद्भूतनिरूपण सातामध्यें । पुढें आठामध्यें अंतरात्मा ॥ ४४ ॥
अंतरात्मानिरूपण आठामधें । पुढें नवामध्यें उपासना ॥ ४५ ॥
उपासनारूप नववे समासीं । दाहावे समासीं गुणभूत ॥ ४६ ॥
गुणभूतरूप केलें दाहव्यांत । सोळावा समाप्त जाला येथें ॥ ४७ ॥
जाला येथें गिरिधर हा अनन्य । पंचभूतें अन्य वोसरलीं ॥ ४८ ॥

इति श्रीग्रंथान्वयकथन तत्वान्वयपर्यंत निरूपण दशक सोळावा
अभंग चतुर्थ ॥ ४ ॥ ॥ ७ ॥

---

॥ श्रीराम ॥

प्रकृतिपुरुषाचा दशक एकावा । अन्वय पाहावा श्रोतेजनीं ॥ १ ॥
श्रोतेजनीं शोध घ्यावा समासाचा । अन्वय येथीचा बोलों आतां ॥ २ ॥
बोलों आतां आधीं देवसाक्षात्कार । दुसऱ्यामध्यें सार शिवशक्ति ॥ ३ ॥
शिवशक्तिरूप दुसऱ्या समासीं । तिसऱ्या समासीं श्रवण हें ॥ ४ ॥
श्रवण हें केलें तिसऱ्या समासीं । चौथीं अनुमानासी वारिलेंसे ॥ ५ ॥
वारिलेंसे चौथीं अनुमानाचें रूप । पांचव्यांत रूप अजपेचें ॥ ६ ॥
अजपाचें रूप पांचव्यांत जालें । साहवीं वर्तविलें देहात्मया ॥ ७ ॥
देहात्मया वर्तविलें साहव्यांत । पुढें सातव्यांत जगजीवन ॥ ८ ॥
जगजीवनरूप सातव्यांत जालें । आठव्यांत केलें तत्वरूप ॥ ९ ॥
तत्वरूप आठामध्यें हें सपूर्ण । नवामध्यें तनुचतुष्टय ॥ १० ॥
चतुष्टयतनु नववे समासीं । दाहावे समासीं आइकावें ॥ ११ ॥
आइकावें रूप टोणपसिद्धांचें । सत्राव्या दशकाचें रूप जालें ॥ १२ ॥
रूप जालें सर्व सत्राव्या दशकाचें । अठराव्या दशकाचें आइकावें ॥१३॥

आइकावें अठरा दशकाचें वर्णन । बहुदेवस्थान पहिल्यामधें ॥ १४ ॥
पहिल्यामध्यें बहुदेवाचें स्वरूप । सर्वज्ञाचें रूप दुसऱ्यामध्यें ॥ १५ ॥
दुसऱ्यमध्यें जाला सर्वज्ञाचा संग । निस्पृहांचा योग तिसऱ्यामधें ॥१६॥
तिसऱ्यामधें निस्पृहांला सिकविलें । चौथीं देह केलें दुल्लभ हें ॥ १७ ॥
दुल्लभ हें देह चवथ्या समासीं । कष्टपरिहारासी सांगताहे ॥ १८ ॥
सांगताहे कष्टपरिहार पांचवा । साहवा ऐकावा पुरुषोत्तम ॥ १९ ॥
पुरुषोत्तम जाला साहवे समासीं । जनस्वभावासी सातवा हा ॥ २० ॥
सातवा हा जनस्वभाववर्णन । अंतर्देवध्यान आठामध्यें ॥ २१ ॥
आठामध्यें अंतर्देवध्यानरूपें । नवामध्यें रूपें निद्रेचीं हि ॥ २२ ॥
निद्रेचीं स्वरूपें नववे समासीं । दाहावे समासीं काय बोलों ॥ २३ ॥
काय बोलों आतां श्रोता अवलक्षणी । अठरावां लक्षणी निरोपिला ॥२४॥
निरोपिला बहुजिनसी हा दशक । येकोणिसी येक आइकावा ॥ २५ ॥
आइकावा आधीं लेखनसमास । दुसरा विवर्णास अइकावा ॥ २६ ॥
आइकावें पुढें करंटलक्षण । तिसऱ्यामधें पूर्ण निरोपिलें ॥ २७ ॥
निरोपिलें चौथीं सदेवलक्षण । पांचवीं सपूर्ण देहमान्य ॥ २८ ॥
देहमान्य जालें पांचव्या समासीं । साहव्या समासीं बुद्धिवादु ॥ २९ ॥
बुद्धिवादु जाला साहव्या समासीं । सातव्या समासीं यत्न सांगे॥३०॥
यत्न सांगे स्वामि सातवे समासीं । आठव्या समासीं उपाधीते ॥ ३१ ॥
उपाधीलक्षणें आठवे समासीं । राजकारणासी सांगताहे ॥ ३२ ॥
सांगताहे राजकार्ण नवामधें । पुढें दाहामध्यें विवेक हा ॥ ३३ ॥
विवेक हा सांगे दाहावे समासीं । दशक येकोणिसी पूर्ण जाला ॥ ३४ ॥
पूर्ण जाला आतां दशक येकोणिसी । पूर्ण दशकासी आइकावें ॥ ३५ ॥
आइकावें आतां विसाव्याचें रूप । पहिल्यामधें रूप पूर्णापूर्ण ॥ ३६ ॥
पूर्णापूर्ण पहिल्या समासांत केलें । दुसऱ्यांत बोलिलें त्रिविध सृष्टि ॥ ३७ ॥
त्रिविध सृष्टि दुसऱ्यामधें सांगितली । तिसऱ्यांत बोलिलीं सूक्ष्मनामें ॥३८॥
सूक्ष्मनामाचा सिद्धांत तिसरा । चौथा जाण बरा शिवशक्ति ॥ ३९ ॥
शिवशक्तिरूप चौथ्यामधें केलें । पांचवीं बोलिलें काय देवें ॥ ४० ॥
काय देवें केलें पांचवे समासीं । चत्वारजिनसासी निरोपिलें ॥ ४१ ॥
निरोपिले च्यारिजिनसी कौतुक । साहव्यांत सम्यक आत्मरूप ॥ ४२ ॥

आत्मरूपनिरुपण साहव्यांत । पुढें सातव्यांत तें चि सांगे ॥ ४३ ॥
तें चि सांगे सर्व आत्मनिरूपण । आत्म्याचें लक्षण विवरिलें ॥ ४४ ॥
विवरिलें देहयंत्र आठामध्यें । पुढें नवामधें सूक्षम हें ॥ ४५ ॥
सूक्षम हें सांगे नववे समासीं । दाहावे समासीं विमळब्रह्म ॥ ४६ ॥
विमळब्रह्म दाहा समासांत केलें । येकत्र हें जालें नभापरी ॥ ४७ ॥
नभापरी येकत्र हें सर्व जालें । रूप त्या देखिलें स्वामियांचें ॥ ४८ ॥
स्वामियाचें रूप मीपणें नातुडे । परि शब्द घडे बोलावया ॥ ४९ ॥
बोलावया मात्र आहे अंतरात्मा । निरंजन आत्मा वेगळा चि ॥ ५० ॥
वेगळा चि निरंजन आत्माराम । जीव हा आराम जाला येथें ॥ ५१ ॥
जाला येथें ऐक्य जीव हा ब्रह्मांश । हेतूचा वाच्यांश पैलिकडे ॥ ५२ ॥
पैलिकडे शब्द वाच्यांशें बोलावे । लक्षांश लक्षावे श्रोतेजनीं ॥ ५३ ॥
श्रोतेजनीं पूर्वपक्ष उपेक्षावे । ग्रंथ विवरावे सावकाश ॥ ५४ ॥
सावकाश गिरिधरस्वामि तेथें । ग्रंथान्वय येथें पूर्ण जाला ॥ ५५ ॥

इति श्रीग्रंथान्वयकथन पूर्णदशकनिरूपण दशक
विसांवा अभंग पंचम ॥ ५ ॥ ॥ ७ ॥

---

॥ श्रीराम कर्ता ॥

( ३ )

# श्रीदासबोधग्रंथराजभावार्थ

आधीं मंगळमूर्ति बोधस्वरुपें अज्ञानभ्रांति हरी ।
मुळमाया कुळदेवता गुरु कृपा वागेश्वरी सुंदरी ॥
श्रीमत्सद्गुरुनाथपाद नमुनी संपूर्ण परमार्थ हो ।
श्रोते संत महंत ग्रंथश्रवणीं श्रीदासबोधार्थ हो ॥ १ ॥

चौथें यूग तयांत लोक बहुधा दुःखार्णवीं कष्टती ।
लोकोद्धारणकारणास्तव दिना श्रीस्वामि ते तुष्टती ॥
बाळांला उमजे बुझूनि समजे ऐसा चि अर्थु भला ।
आम्हा मंदमतीसि ग्रंथ करुनी हा पावनीं दीधला ॥ २ ॥

स्तवनदशक तेथें स्वामि सारांश बोले ।
परि मतिहिन येथें स्वामिपाईं न मीळे ॥
म्हणउनि करुणाब्धि पूर्णमूर्खत्व लावी ।
द्वितियदशक तेथें योग दीना बळावी ॥ ३ ॥

आरंभीं मूर्खरूपा वदुनि गुण भले उत्तमी वृत्ति आणी ।
नेघे दुर्बुद्धि प्राणि मग रजतम या सारुनी सत्वबाणी ॥
सद्विद्यारूप सांगे मग मन निवळे थोर वीरक्ति लागे ।
तेथें हि ज्ञानयोगें पढतमुरखता येतसे त्यास सांगे ॥ ४ ॥

स्वगुण सुख ह्मणोनी मूर्ख हा दृढ जाला ।
त्रिविध अनळतापें ताविला दीप्त केला ॥
वदुनि गुणपरीक्षा आणिला भक्तिमार्गें ।
सुगम नवविधा ते लाविली स्वामिभर्गें ॥ ५ ॥

भक्तीची मुळदेवता श्रवणता सारांश घेणें बरा ।
आतां कीर्तन या युगीं अधिक हें नामामृतें हो तरा ॥
चौथें सेवन पाइचें मग पुढें देवार्चनु मूर्तिचें ।
सर्वां वंदन दास्य (सख्य) बहुसें हें साधनु नौमिचें ॥ ६ ॥

नौमी ते नुमजे कदां न समजे यालागि स्वामी वदे ।
बा रे सद्गुरु सेविं तूं ह्मणुनियां त्या निश्चयाला वदे ॥
नाना ज्ञान गुरु अनुग्रह बहु त्या मंत्रमाळा खुणा ।
दावी बद्धमुमुक्षुसाधकगुणा सिद्धाचिया लक्षणा ॥ ७ ॥

सिद्धाचें रुप ना कळे मग ह्मणे शोधीं आधीं देव रे ।
शोधायासि अनेक बोध करुनी तें ब्रह्म दावी खरें ॥
ज्ञानें दृश्य सरे सरूनि न सरे दीसे तया नूरवी ।
षष्ठावे दशकीं अजन्म जिव हा याला पदीं बैसवी ॥ ८ ॥

ब्रह्मिच्या विधि चतुर्दश भावना ।
शास्त्रिच्या धरुनि हिंडत दुर्वना ॥
त्यासि निश्चय करूनि दयाळजी ।
सातवा दशक तेथ चि ऊमजी ॥ ९ ॥

खं ब्रह्मादि अनिर्वचेय समजी तीन्ही समासामधें ।
आधीं मंगळपद्यभाव बहुसा लौकीक भावामधें ॥
पुढें द्वैतविकल्प जे नुरविले सत्शास्त्रसें शोधिलें ।
मुक्तां मुक्तविलें देहातित दिल्हें हें सप्तमीं साधिलें ॥ १० ॥

मायाब्रह्म कसें ह्मणूनि नमुनी स्वामीसि वीचारिलें ।
माया पंचभुतीक सूक्ष्म सदयें सज्ञान नीरूपिलें ॥
भेदाकाशभ्रमीतदुश्चितनरु मोक्षाधिकारी करी ।
आत्मन्दर्शन शून्यनिर्शन करी मतांत सिद्धांतरी ॥ ११ ॥

गुण बहू बहु फार विकारले । बहुत रंग तया नर गुंतले ॥
ह्मणुनि रूप करूनि विसांविले। दशक भक्ति अनंत ठसाविले ॥१२

आशंका निरसूनि ब्रह्म सदयें योगीजना दाविलें ।
निःसंदेह करूनि जाणपण हें हेतूतिता भाविलें ॥
पिंडादी अनुमान वारुनि प्रभू गुणातिता दावितो ।
बद्धा जन्मवितो विकल्प नुरितो संदेह तो वारितो ॥ १३ ॥

अंतःकर्ण अनेक येक समजी नाना आशंका हरी ।
आधीं देह अगाध कल्पितबिजें जालें तया वीवरी ॥
अंतीं पंचरुपें विवेकप्रळयें दावी भ्रमाचे परी ।
नाना रूप प्रचीत पूर्ण भजनें नामारुपा वीवरी ॥ १४ ॥

सिद्धांतीं च चतुर्थ देव विवरी हातीं च देवासि दे ।
अज्ञानासि विवेकसार सिकवी त्या राजकार्णी वदे ॥
गंगा गुप्त महंत स्वामि मजला गुप्तेश्वरा भेटवी ।
अज्ञाना उपदेश लक्षण बरें त्या निस्पृहां सीकवी ॥ १५ ॥

वैराग्यासि विवेक अंकुश प्रभु न्यायें चि घाली बरा ।
नाना बोध प्रबोधुनी सिकउनी आणी सुखाच्या घरा ॥
नाना सृष्टि उभारुनी नुरउनी नीवेदनीं वीवरी ।
नाना काळ रुपें चि यत्न पुरुषा त्यागा बरें थावरी ॥ १६ ॥

नित्यानित्य त्रयोदशीं विवरुनी निशेष सारी जडां ।
सारासारविचार सृष्टिप्रळयें झाडा निरोपी पुढां ॥

काह्मणी सृष्टिलघुप्रबोध प्रचिती कर्तव्यरूपा वदे ।
देहात्मा चळ चंचळा विवरुनी त्या निस्पृहां सुख दे ॥ १७ ॥
नानाबोधवशें चि निस्पृह कळे आला तया बुद्धि हे ।
भिक्षावृत्ति कवित्व युक्ति सिकवी गीतादि गानादि हे ॥
ध्यानाची खुण दाउनी मग पुढें आखंडतंतु करी ।
चातुर्यें युगधर्म सारुनि प्रभू मायातिता थावरी ॥ १८ ॥
पंध्रावे दशकीं समर्थ वदती चातुर्य या निस्पृहां ।
श्रेष्ठात्मा चळचंचळें विवरणें आधोर्ध ने जीव हा ॥
शिष्या शाश्वत ब्रह्म दाउनि करी निर्मूळ हें केवळें ।
पिंडोत्पत्ति अनेक सूक्ष्म जिव त्या सिद्धांत केला बळें ॥ १९ ॥
सोळावे दशकीं अपूर्व स्तवनें आरंभिलीं तें खुणें ।
आधीं वालिमकसूर्यराज स्तविला उपासनेच्या गुणें ॥
पुढें प्रांजळ वेगळीं भुतभुतें नीरोपिलीं उमजा ।
नाना देवउपासना गुणभुता दावी बुझा ऊमजा ॥ २० ॥
सत्रावे दशकीं निरूपण बहु सांगों किती मी मुखें ।
देवाचें शिवशक्तिरूप श्रवणीं अनुमान नाशी सुखें ॥
देहात्मा जगजीवनु अजप हा सोहं करी जाणत्यां ।
देहीं तत्वतनुचतुष्टयखुणा दावी तयां नेणत्यां ॥ २१ ॥
नाना टोणपसिद्ध त्यांसि उभजी अष्टादशीं सुख दे ।
नाना देव निरूपणें करुनियां सर्वज्ञसंगा वदे ॥
कष्टांचा परिहार दुर्लभ तनुमध्यें चि गुणें करी ।
सांगे लोकस्वभावअंतर प्रभु श्रोत्यांसि निद्रा वरी ॥ २२ ॥
श्रोता नष्ट कुलक्षणी समजुनी त्याला करंटें करी ।
पुढें देव गुणासि लेखनक्रिया वीवर्ण तें वीवरी ॥
धातु आदि समस्त देव चि भजी यत्न बळावी कसा ।
बुद्धिवाद उपाधि राजकरणी विवेकसा सारसा ॥ २३ ॥
जाला येक उणा विसास ह्मणुनी विसांवियांला करी ।
पूर्णापूर्ण विचारुनी विमळसें संपूर्ण ब्रह्मा भरी ॥

श्रोत्याला बुझणें असेल तरि हा शोधा विसांवा पुरा ।
आतां स्वामिपदीं उराल तरि त्या आत्मा अरामी मुरा ॥ २४ ॥

आत्मारामपदीं उरोनि आपदीं होसी पदीं वेगळा ।
अंतीं कोण गति उरोनि म्हणसी वस्तुरुपा केवळा ॥
तुझा अंत अनंत व्यापुनि प्रभु आनंत तूं अंत रे ।
आतां मीपण मांडिसी तरि तुला श्रीमुख विन्मुख रे ॥ २५ ॥

इति निगदित देवें बोधितां चित्त धालें ।
स्वरुपिं गळित जालें स्वामिपाइं मिळालें ॥
विस हि दशक बोधीं ऐक्य संपूर्ण केलें ।
श्रवणमननयोगें प्रत्यया पूर्ण आलें ॥ २६ ॥

इति विस दशकाचे श्लोक श्रोतीं पहावे ।
विवरत सुखस्वार्थं ग्रंथभावार्थ फावे ॥
निजबिज मुनियोगी ग्रंथ बोलोनि ठेला ।
गिरिधरवरस्वामिबोध संपूर्ण जाला ॥ २७ ॥

इति श्रीदासबोधग्रंथराजभावार्थ संपूर्णमस्तु श्रीसद्गुरु-
रामचंद्रार्पणमस्तु श्रीभक्तिरस्तु ॥ ७ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

( ४ )

# आत्मानुभव

आधीं वंदीन मंगळमूर्ति । देवी शारदा मतिस्फूर्ति ।
सद्गुरुनाथ पावनकीर्ति । आत्माराम जगद्गुरु ॥ १ ॥

आत्माराम उपासना । बोधें पाववी निरंजना ।
श्रीरामपदीं निर्मुक्त वासना । श्रीरामरामरामेति ॥ २ ॥

अभिवंदन संतसज्जना । संतसंगें श्रवणमनना ।
मननध्यासें शुद्ध सुमना । साक्षात्कार स्वरूपीं ॥ ३ ॥
स्वरूप ह्मणिजे आत्मरूप । आत्मरूप तें ब्रह्मस्वरूप ।
श्रोते वक्ते भगवद्रूप । कवि ज्ञानी सभेसी ॥ ४ ॥
संतसभेसी परमार्थविवरण । नर ते चि होती नारायण ।
कितेक नरदेह मूर्ख आपण । उत्तमगुणश्रवणार्थीं ॥ ५ ॥
उत्तमगुण अधमगुण । अखंड लोकीं विद्यमान ।
त्रिगुणगुणाची सृष्टि जाण । सत्वगुण परमार्थी ॥ ६ ॥
सत्वगुणें सद्विद्या पुरुष । विरक्त योगी माहापुरुष ।
पढतमूर्ख ज्ञानी विशेष । जन्मबंधन अज्ञाना ॥ ७ ॥
जन्मदुःख जरादुःख । नित्यदुःख पुनःपुना दुःख ।
तस्मात् जागृति जागृति देख । पापसंतापमृत्यु वारी ॥ ८ ॥
मृत्युमार्गें सर्व हि गेले । स्वरूपाकार साधु राहिले ।
साधुसंगें लोक लागले । भगवंताचे सद्भक्ति ॥ ९ ॥
श्रवणभक्ति कीर्तनभक्ति । स्मरणभक्ति पादसेवनभक्ति ।
अर्चनभक्ति वंदनभक्ति । दास्यभक्ति देवाची ॥ १० ॥
सख्यभक्ति निवेदनभक्ति । भक्तियोगें लाभती मुक्ति ।
सलोकतामुक्ति समीपतामुक्ति । स्वरूपतामुक्ति सायोज्यता ॥११॥
सायोज्यतामुक्ति सद्गुरुचरणीं । श्रीगुरुशिष्यज्ञानविवरणीं ।
मंत्रविचारें अंतःकरणीं । शुद्धज्ञान संपादिलें ॥ १२ ॥
बद्धदशा संपूर्ण गेली । मुमुक्षदशा गुरुपदीं ठेली ।
साधकदशा स्वरूपीं निमाली । सिद्धदशा निरंजन ॥ १३ ॥
निरंजनरूप साधुजन । साधुसंगें देवशोधन ।
पूर्णज्ञाते करिती विवरण । गुरुपदीं शरण रिघावें ॥ १४ ॥
आतां शरण सद्गुरुस्वामी । संतसज्जन गुरुरूपें तुह्मी ।
गुरुकृपें प्रश्न करूं आह्मी । कृपा करूनि परिसावें ॥ १५ ॥
जय जया जी सद्गुरुराजा । विश्वंभरा विश्वबीजा ।
परमपुरुषा मोक्षध्वजा । दीनबंधु जगद्गुरु ॥ १६ ॥

सद्गुरु केवळ ब्रह्म निज । विश्वंभर कां हो विश्वबीज ।
परमपुरुष कां जी मोक्षध्वज । संतसज्जनीं सांगावें ॥ १७ ॥
सद्गुरुनाथ केवळ ब्रह्म । विश्वबीज हे ईश्वरवर्म ।
परमपुरुष मोक्षधर्म । मोक्षदाता जीवासी ॥ १८ ॥
जीव येकदेशी बापुडें । तयासी ब्रह्म चि केलें रोकडें ।
जीव केवळ अज्ञान वेडें । ब्रह्म कैसें केलें जी ॥ १९ ॥
जीव उपाधि देवें निरसिला । ब्रह्मीं ब्रह्मांश ब्रह्म केला ।
साधक आटोनि सिद्ध जाला । आपण येकला निरंजन ॥ २० ॥
येक मुख्य परमेश्वर । दुसरी प्रकृती जगदाकार ।
तिसरा आपण कैंचा चोर । प्रकृतिपुरुषें सर्वत्र हीं ॥ २१ ॥
प्रकृतिपुरुषें परब्रह्मीं । लीन होती स्वानंदधामीं ।
सहज चि आपण आत्मारामीं । आत्माराम तुझा तूं ॥ २२ ॥
आत्माराम निर्गुण आत्मा । तत्वरूप हा कोण आत्मा ।
तत्वातीत तो निर्मळात्मा । देवें निरोपावा ॥ २३ ॥
पांचवें भूत अंतरात्मा । चैतन्य चंचळ चंचळात्मा ।
तत्वातीत तो निश्चळात्मा । निर्गुण आत्मा ब्रह्म चि ॥ २४ ॥
निर्गुण आत्मा निर्गुण ब्रह्म । सगुण आत्मा सगुण ब्रह्म ।
शबळब्रह्म शुद्धब्रह्म । मायाब्रह्म हें कैसें जी ॥ २५ ॥
मायाब्रह्म हें ईश्वररूप । विमळब्रह्म तें शुद्ध स्वरूप ।
शुद्धस्वरूपीं सृष्टिरूप । मायाभान वोसरलें ॥ २६ ॥
मायादृश्य अवघें गेलें । मायातीत तें ब्रह्म ठेलें ।
सगुणीं सगुण भजन केलें । निर्गुणभजन कैसें जी ॥ २७ ॥
निर्गुणभजन अनन्यभावें । सार शोधूनि ब्रह्म चि व्हावें ।
देहीं च विदेही होऊनि राहावें । आत्माराम निरंजनीं ॥ २८ ॥
आत्माराम निरंजन । निर्गुणब्रह्म पुरातन ।
तुर्या उन्मनी विलक्षण । आत्मा साक्षी कैसा जी ॥ २९ ॥
अंतरात्मा बोलिजे सर्वसाक्षी । अवस्थारूपें पूर्वपक्षीं ।
सिद्धांतवस्तु लक्षितां लक्षीं । आत्मा अद्वैत निरंजन ॥ ३० ॥

आत्मा अद्वैत निरंजन । अजन्मा तो सांगा कवण ।
सद्गुरूसी गेला जो शरण । आत्मा ब्रह्म कीं जीव स्वामि ॥ ३१ ॥
जीवदशा हे शरण आली । जीवदशा हे मुक्त जाली ।
दीर्घस्वप्नीं स्वप्नदशा हरली । जागृतितीत परब्रह्म ॥ ३२ ॥
जागृतितीत ब्रह्म पूर्ण । अनिर्वाच्य हें समाधान ।
सद्गुरुकृपेचें महिमान । सत्शिष्यासी बाणलें ॥ ३३ ॥
संतीं हृदयग्रंथीसी भेदिलें । सर्वसंशयातें छेदिलें ।
सर्वकर्म क्षयासी नेलें । परावर दृष्टि करूनियां ॥ ३४ ॥
श्रीरामदास श्रीगुरुसमर्थस्वामी । सद्गुरुनाथ स्वानंदधामी ।
वेणीपरंपरा आत्मयारामी । गिरिधर सदां श्रवणार्थी ॥ ३५ ॥
इति श्री आत्मानुभव । वेदशास्त्रीचा स्वानुभव ।
सद्गुरुमुखें ब्रह्मानुभव । संतसज्जनीं विस्तारिला ॥ ३६ ॥
समास प्रथम ॥ १ ॥ ॥ छ ॥

---

॥ श्रीराम ॥

सकळकर्तुत्वासी आरंभ । मूळपुरुष मुळारंभ ।
जो परात्पर स्वयंभ । आदिअंतीं निर्धारें ॥ १ ॥
आदिअंतीं ब्रह्म निर्गुण । कर्तापुरुष बोलिला सगुण ।
सगुण निर्गुण निरूपण । देवें निरोपावें ॥ २ ॥
निर्गुण निरंजन गुणरहित । मायागुण तेथें अरोपित ।
ईश्वरत्व मायाकल्पित । निमित्त कारण सान्निध्यें ॥ ३ ॥
ब्रह्मसान्निध्यें ईश्वरमाया । तरी ब्रह्मीं च इछारूप मूळमाया ।
मरीचमृगांब हे दुरत्यया । परब्रह्मीं इछा कैसी जी ॥ ४ ॥
ईश्वरापासूनि मायाप्रमदा । इछाकुमारी विशारदा ।
आदित्यापासूनि गोदा । मृगजळें वाहे ॥ ५ ॥
आदित्यसर्वेश्वरीं मायामृगजळ । गगन निर्मळ निवांत निश्चळ ।
परब्रह्म निरोपाधी केवळ । ईश्वर उपाधी कैसा जी ॥ ६ ॥
विद्या अविद्या ईश्वरशक्ति । मुळा विद्या तुळा अविद्या ह्मणती ।
मरीचमृगांबु उखरभूतीं । इश्वरत्वें आभासलें ॥ ७ ॥

ईश्वर परब्रह्मीं ऐक्य अभेद। तरी जीवशिवास कां जी ब्रह्मी भेद।
चिदाकाश ब्रह्म विशुद्ध। त्रिविध कैसें जालें जी ॥ ८ ॥
घटमठ मांडिले सावकाश। त्रिविध भासलें आकाश।
जीवशिवईश्वर आभास। निराभास परब्रह्मीं ॥ ९ ॥
परब्रह्म येकजिनसी। द्दष्टत्व साक्षत्व कोणासी।
चैतन्यत्व सत्तारूपत्व ब्रह्मासी। कैसें निरोपावें ॥ १० ॥
द्रष्टा साक्षी चैतन्य सत्ता। हे गुण ब्रह्माचिया माथां।
अरोपिले जाण वृथा। मायागुणें निर्धारें ॥ ११ ॥
जव खरेपण मायेसी। तव चि साक्षत्व ब्रह्मासी।
साक्षत्व ब्रह्मासी किं ईश्वरासी। देवें निरोपावें ॥ १२ ॥
साक्षत्व ब्रह्मीं कल्पिलें। अनादि ईश्वरत्व भाविलें।
मायानिरासें सर्व हि गेलें। द्रष्टा साक्षी चैतन्य हें ॥ १३ ॥
चैतन्य ह्मणती परब्रह्म। चैतन्य ह्मणती ईश्वरधर्म।
वाक्यविरुद्ध शास्त्रधर्म। सत्शास्त्र देवें सांगावें ॥ १४ ॥
शास्त्रपरिभाषा चैतन्य ब्रह्म। शबल ब्रह्म शुद्ध ब्रह्म।
मायावछिन्न ईश्वरधर्म। अविद्यावछिन्न जीवभाव ॥ १५ ॥
जीवभावासि ब्रह्म ह्मणती। जीव चौऱ्यासीं लक्ष योनी भोगिती।
येक जीव किं दोनि स्थिति। देवें निरोपावें ॥ १६ ॥
जीव नाम हे दोहिकडे। ऐक्य जीव तो ब्रह्म चि घडे।
भिन्न जीव तो मायेंत पडे। चैतन्य चंचळरूपी हा ॥ १७ ॥
दोनि जीवाचीं रूपें केलीं। द्वैतबुद्धि किं ब्रह्मीं जाली।
निद्रिस्थ जीवासी जागृति आली। ब्रह्मीं जागृति कैसी जी ॥ १८ ॥
परब्रह्मीं निद्रा नाहीं। परब्रह्मीं जागृति नाहीं।
गुरु शिष्य ब्रह्म चि पाहीं। आत्माराम निरंजन ॥ १९ ॥
आत्माराम निरंजन। परब्रह्म किं चैतन्यघन।
चेतना चैतन्य ईश्वरगुण। किंवा ब्रह्मीं सांगा जी ॥ २० ॥
ब्रह्म निर्विकार निर्गुण। तेथें कैचे गुणागुण।
मायोपाधि हे ईश्वरगुण। नाना शास्त्रीं बोलिले ॥ २१ ॥

पंचभूतादि मायेतें । चैतन्य जें चेतवितें ।
चतुर्दशब्रह्मीं चैतन्यातें । सिद्धांत कैसा केला जी ॥ २२ ॥
चतुर्दश ब्रह्में शास्त्राधारें । श्रुतिसंमति ब्रह्मविचारें ।
अनिर्वाच्यब्रह्मीं सिद्धांतउत्तरें । शबल ब्रह्म चैतन्य हें ॥ २३ ॥
द्रष्टा साक्षी चैतन्यसत्तेचे । सद्गुण गुण हे मायेचे ।
किंवा ब्रह्मीचे ईश्वराचे । देवें निरोपावें ॥ २४ ॥
जगदीश्वराचे समस्त गुण । वस्तु ठाईंची निर्गुण ।
परब्रह्मप्रतिभा माया जाण । मायागुण सर्वेश्वरीं ॥ २५ ॥
माया परब्रह्मसूर्यप्रभा । माया लावण्यस्वरूपशोभा ।
स्वरूपशोभा परब्रह्मप्रभा । माया अंगसंगा कैसी जी ॥ २६ ॥
परब्रह्मसूर्य ईश्वर । लावण्यस्वरूप सर्वेश्वर ।
सर्वेश्वरीं माया ज्ञानशक्ति विचार । अज्ञानतिमिरनाशिनी ॥२७॥
अज्ञाननाशन ज्ञानशक्ति । निवांत निर्मळ स्वरूपस्थिति ।
तरि कां माया मिथ्या ह्मणती । देवें निरोपावें ॥ २८ ॥
अद्वैतकल्पना माया शुद्ध । द्वैतकल्पना माया अशुद्ध ।
द्वैताद्वैत शुद्धाशुद्ध । परब्रह्मीं मिथ्या हें ॥ २९ ॥
परब्रह्मीं ब्रह्मांश मिळाले । जन्मबंध हे कोण पावले ।
बध्ध मुक्त हे कोण कल्पिले । देवें निरोपावें ॥ ३० ॥
बद्ध मुक्त जाला कोण । तो तरि नव्हे किं आपण ।
बद्ध जाणावें मीपण । धर्त्यासी बाधी ॥ ३१ ॥
बद्ध मुक्त माया आख्यान । गुणेंकरूनि मातें जाण ।
वस्तुता नाहीं मजला मीपण । अहं ब्रह्म हें कैसें जी ॥ ३२ ॥
अहं ब्रह्म हें येकदेशी । ह्मणणें लागलें जीवेश्वरासी ।
ईश्वर सोडी ईश्वरत्वासी । परब्रह्मासी पावावया ॥ ३३ ॥
परब्रह्मीचें कैसें साधन । परब्रह्मीचें कैसें भजन ।
परब्रह्मीचें कैसें दर्शन । मज निरोपावें ॥ ३४ ॥
परब्रह्मीचें साधन श्रवण । परब्रह्मीचें अनन्य भजन ।
परब्रह्म होणें हें च दर्शन । निरोपिलें तुज निःसंगता ॥ ३५ ॥

निःसंगासी आहे संग । किंवा केवळ राहावें निःसंग ।
देवें आपुलें अंतरंग । सांगोनि द्यावें ॥ ३६ ॥
सद्गुरुभजनें संतसंगें । अखंड राहावें अंतरंगें ।
आत्मारामी निजात्मरंगें । येक ब्रह्म द्वितीय नास्ति ॥ ३७ ॥
जो विश्रांतीचा विश्राम । आदिपुरुष आत्माराम ।
तें येक चि परब्रह्म । दुसरें नाहीं ॥ ३८ ॥
श्रीरामदास श्रीगुरुसमर्थस्वामी । सद्गुरुनाथ स्वानंदधामी ।
वेणीपरंपरा आत्मयारामी । गिरिधर सपन्न भावार्थें ॥ ३९ ॥

इति श्रीआत्मानुभव । वेदशास्त्रींचा स्वानुभव ।
सद्गुरुमुखें ब्रह्मानुभव । संतसज्जनीं विस्तारिला ॥ ४० ॥
समास द्वितीय ॥ २ ॥ ॥ ७ ॥

---

॥ श्रीराम ॥

देव निर्मळ निश्चळ । शास्त्रें बोलती सकळ ।
तया निश्चळासी चंचळ । कैसें ह्मणावें ॥ १ ॥
निश्चळासी चंचळ ह्मणों नये । चंचळ देव सर्वेश्वर आहे ।
मायोपाधि ईश्वर पाहे । गुणमद्द माया कर्तारु ॥ २ ॥
सर्वकर्ता तो चि देव । पाहों जातां निरावयव ।
कोण कर्ता कोण देव । निरावयव कैसा जी ॥ ३ ॥
कर्ता देव ईश्वररुप । निरावयव तें ब्रह्मस्वरूप ।
मायाकर्तुत्वें कर्ताररूप । अकर्ता अरूप निरंजन ॥ ४ ॥
निरंजन तें परब्रह्म । तेथें नाहीं मन माया विभ्रम ।
पंचभूत हा गुणकर्दम । आत्माराम येथें कैसा जी ॥ ५ ॥
पंचभूताचा कर्दम । यासी अलिप्त आत्माराम ।
अविद्यागुणें मायाभ्रम । सत्य चि वाटे सर्वेश्वरीं ॥ ६ ॥
येक ब्रह्म येक माया । ईश्वर उत्पन्न कोठूनियां ।
इश्वरउत्पत्ति स्वामिराया । सर्वज्ञदेवें सांगावी ॥ ७ ॥
ब्रह्म नपुंसक वंध्या माया । असंग संग अनादि वायां ।
ईश्वर उत्पन्न तेथुनियां । माता कुमारी भर्तारु ॥ ८ ॥

सर्वेश्वराची सगर्भकुमारी । विलय शोकें उभी अंतरीं ।
मायोपाधि हे सर्वेश्वरीं । ईश्वर ब्रह्मीं कैसें जी ॥ ९ ॥

येक ब्रह्म अद्वैत पाहीं । ईश्वरमाया दोन्ही नाहीं ।
यावन्माया तावत्कांहीं । ईश्वरत्व ब्रह्मीं कल्पिलें ॥ १० ॥

ब्रह्मीं सर्वेश्वर कल्पी माया । ईश्वरें कल्पिली मूळमाया ।
मायाकल्पित ईश्वर वायां । किंवा ईश्वर अनादि ॥ ११ ॥

ब्रह्म जैसें अनादिसिद्ध । माया जैसी अनादिसिद्ध ।
ईश्वर तैसा अनादिसिद्ध । आपुलाल्या स्वरूपें ॥ १२ ॥

ब्रह्ममायाईश्वरें अनादिसिद्धें । तरि अनाशवंतें हें त्रिविधें ।
मायानिर्शन श्रीगुरुप्रबुद्धें । केलें किंवा नाहीं जी ॥ १३ ॥

माया माईकपणें असोनि नाहीं । ईश्वर साक्षित्वें तूं पाहीं ।
परब्रह्म तें परिपूर्ण कांहीं । जैसें तैसें सर्वदा ॥ १४ ॥

येक ब्रह्म निराकार । मुक्त अक्रिय निर्विकार ।
तेथें मायावोडंबर । कोठूनि जालें सांगावें ॥ १५ ॥

ब्रह्मीं मायावोडंबर जालें चि नाहीं । त्याची वार्ता पुससी काइ ।
तथापी सांगों जेणें कांहीं । संशयो तुटे ॥ १६ ॥

दोरीकरितां भुजंग । ईश्वरीं विवर्तमान माया संग ।
परब्रह्म तें निःसंग । निर्विकल्प निरंजन ॥ १७ ॥

कल्पनेविरहित हेत । दृश्यावेगळा दृष्टांत ।
द्वैतेंविण द्वैत । कैसें जालें सांगा जी ॥ १८ ॥

विचित्र भगवंताची करणि । वर्णवेना सहस्रफणी ।
तेणें केली हे उभवणी । ब्रह्मांडाची संकल्पें ॥ १९ ॥

निर्विकल्प कल्पनेरहित । तया नांव भगवंत ।
देवपणाची हि मात । तेथें नाहीं भगवंतीं ॥ २० ॥

भागवत्स्वस्वरूप निर्विकार संचलें । भगवंतें ब्रह्मांड कैसें केलें ।
कर्तेपणें कारण पडलें । कार्यामध्यें कैसें जी ॥ २१ ॥

द्रष्टेपणें द्रष्टा दृश्यीं । जैसा पडे अनायासीं ।
कर्तेपणें निर्गुणासीं । गुण तैसें अनायासें ॥ २२ ॥

अनायासें निर्गुणीं गुण । तरि ईश्वरमायेचे कां जी गुण ।
निर्गुणब्रह्मीं च अवघे गुण । कां न ह्मणावे ॥ २३ ॥
परब्रह्म निर्विकार निर्गुण । ईश्वर मायोपाधि सगुण ।
कार्य कारण कर्तुत्व गुण । कर्ता अधिपत्तीं आभासले ॥ २४ ॥
ब्रह्मांडकर्ता तो कवण । कैसी त्याची वोळखण ।
देव सगुण किं निर्गुण । कोणापासुनि विस्तार हा ॥ २५ ॥
परमात्मा परमेश्वर । सकळकर्ता जो ईश्वर ।
तयापासुनि विस्तार । सकळ जाला ॥ २६ ॥
ऐसीं अनंतनामें धरी । अनंत शक्ति निर्माण करी ।
तो चि जाणावा चतुरीं । मुळपुरुष ॥ २७ ॥
त्या मुळपुरुषाची वोळखण । ते मुळमाया चि आपण ।
सकळ कांहीं कर्तेपण । तेथें चि आलें ॥ २८ ॥
कार्य कारण कर्तुत्व ईश्वरीं । प्रकृति हेतु सर्वेश्वरीं ।
मिथ्या माया बाजीगारी । परब्रह्मविचारें ॥ २९ ॥
मायारूप उघड बोलतां नये । माडों पाहतो साधनउपाये ।
मायेकरितां देव भक्त होय । देवाकरितां सकळ हें ॥ ३० ॥
देवाकरितां सकळ जालें । हें सकळांसी मानलें ।
परि त्या देवासी वोळखिलें । पाहिजे किं स्वामी ॥ ३१ ॥
सिद्धाचें जें निरूपण । ते साधकासी न कळे जाण ।
पक्क नाहीं अंतःकर्ण । ह्मणोनियां ॥ ३२ ॥
सिद्धाचें निरूपण कोण । साधकांसी कां जी न कळे जाण ।
पक्क अंतःकरणाचें लक्षण । देवें निरोपावें ॥ ३३ ॥
सिद्धनिरूपण अद्वैतब्रह्म । साधकां मनीं द्वैताद्वैतधर्म ।
पक्क अंतःकरणाचें वर्म । येक परब्रह्म निर्धारें ॥ ३४ ॥
येक परब्रह्म निर्धारिलें । ब्रह्मीं ईश्वरत्व कैसें जालें ।
जीवपद शिवपद नाम ठेविलें । कोण्या गुणें कोणासी ॥ ३५ ॥
अविद्यागुणें बोलिजे जीव । मायागुणें बोलिजे शिव ।
मूळमायागुणें देव । बोलिजेतें ब्रह्मासी ॥ ३६ ॥

ब्रह्मासि जीवशिवत्व कल्पिलें। कल्पनाभान कल्पनेसी गमलें।
अखंडमंडळीं तमचिन्ह लाविलें। जीवपदा आणिलें परब्रह्म॥३७

ब्रह्म निरोपाधि निर्गुण। अखंडमंडळाकार पूर्ण।
पूर्णा अपूर्णातीत परिपूर्ण। सर्वेश्वर कल्पी मूळमाया॥ ३८॥

अनादि ईश्वर कारण माया। अनंत शक्ति धरावया।
येथीचा अर्थ जाणावया। अनुभवी पाहिजे॥ ३९॥

मायाकांत मूळपुरुष। तो चि सकळाचा ईश।
अनंतनामी जगदीश। तयासी च म्हणावें॥ ४०॥

अकळ माया हे विस्तारली। परि हे निशेष नाथिली।
ऐसीया वचनाची खोली। विरुळा जाणे॥ ४१॥

ऐसें अनिर्वाच्य बोलिजे। परि हें स्वानुभवें जाणिजे।
अनिर्वाच्य ब्रह्म ह्मणिजे। अनिर्वचनीया मूळमाया॥ ४२॥

मूळमाया तो चि पुरुष। साधकां न मने निशेष।
तरि अनंतनामी जगदीश। कोणासी ह्मणावें॥ ४३॥

मायेसी निर्मिता मूळपुरुष। साधकांसी मानलें विशेष।
अनंतनामी जगदीश। नाम रूप मायेचें॥ ४४॥

नाम रूप माये लागलें। आतां बोलणें नीट उमजलें।
तुकियावरि हि अनुमानिलें। कासयासी॥ ४५॥

आतां अनुमान कासयाचा। नाम रूप विस्तार मायेचा।
मायानियंता ईश्वर साचा। ब्रह्माकार अंतरीं॥ ४६॥

ब्रह्माकार सर्वेश्वर आहे। सर्व मायेचा ईश्वर पाहे।
सर्वज्ञपणें ऐश्वर्य लाहे। सर्व सामर्थ्य सर्वेश्वरीं॥ ४७॥

कर्ता भोक्ता सर्वेश्वर देव। निजरूप पाहतां निरावयव।
निरावयवीं सचराचर सर्व। कोणपरी सांगा जी॥ ४८॥

परब्रह्म निरावयव गगन। तेथें अनादि माया चंचळ पवन।
अष्टधा प्रकृति चराचर जाण। जीवशिवबंडें करितसे॥ ४९॥

मूळमायेचीं अहंस्फूर्तिबंडें। अनंत निर्मिलीं ब्रह्मांडें।
पंचभौतिकें उदंडें। जीवशिवाचीं स्थानें हीं॥ ५०॥

साधुसंगतीं जीवशिवा मोक्ष । तत्वातीत तो अंतरसाक्ष ।
अंतरसाक्ष पूर्वपक्ष । सिद्धांत आत्मा परब्रह्म ॥ ५१ ॥
पाहों जातां आत्मे च्यारी । जीव शिव ईश्वर भाव निर्धारीं ।
घट मठ महद् चिदाकारीं । आकाश ब्रह्म सर्वत्र ॥ ५२ ॥
शून्यातीत जें शुध्ध बुद्ध । आपण ब्रह्म तूं स्वतसिद्ध ।
मीपण जीवपण जीवासी बद्ध । बद्धता मुक्तता स्वप्नमाया ॥५३॥
दुष्टस्वप्नें जाजावला । ब्राह्मण नीचयातीस गेला ।
शबलजीव जन्मभ्रांति पावला । किंवा शुद्धांश आत्मा जी ॥५४॥
आत्मयाचे ठाईं कांहीं । जन्ममृत्यु लागणार नाहीं ।
जीवपण जन्ममृत्यु भोगी पाहीं । आपण आत्मा निजवस्तु ॥५५॥
आपण वस्तु मुळीं च येक । ऐसा ज्ञानाचा विवेक ।
आपण मीपणावेगळें देख । आपण स्वरूप देवाचें ॥ ५६ ॥
ऐसें वरदान सद्गुरूचें । सद्गुरुपद देखिलें साचें ।
गगनसदृशं ध्यान स्वामीचें । शिव सांगे पार्वतीप्रति ॥ ५७ ॥
अस्ति भाति प्रियरूप । परब्रह्म तें सद्गुरुस्वरूप ।
प्रकृतिपुरुष नामरूप । सिद्धांत शास्त्रें वाखाणिती ॥ ५८ ॥
श्रीरामदास श्रीगुरुसमर्थस्वामी । सद्गुरुनाथ स्वानंदधामी ।
वेणीपरंपरा आत्मयारामीं । गिरिधर संपन्न परमार्थें ॥ ५९ ॥

इति श्रीआत्मानुभव । वेदशास्त्रींचा स्वानुभव ।
सद्गुरुमुखें ब्रह्मानुभव । संतसज्जनीं विस्तारिला ॥ ६० ॥
समास तृतीय ॥ ३ ॥ ॥ ७ ॥

---

॥ श्रीराम ॥

भगवंताचें निजरूप । यासी बोलिजे स्वरूप ।
ब्रह्मस्वरूप किं ईश्वररूप । मज निरोपावें ॥ १ ॥
भगवंताचें द्विविधा रूप । निजरूप तें ब्रह्मस्वरूप ।
सगुणरूप तें ईश्वररूप । गुणमई माया उपाधि ॥ २ ॥
गुणमई माया कोणें केली । ब्रह्में केली किं ईश्वरें केली ।
लया गेली किं अनाशवंत राहिली । देवें निरोपावें ॥ ३ ॥

गुणमई माया ईश्वरें केली । परब्रह्में नाहीं केली ।
ब्रह्मीं माया नाहीं च देखिली । ईश्वरीं उरली मिथ्यत्वें ॥ ४ ॥
ईश्वरीं माया मिथ्यत्वें आहे । तरि ईश्वर मायाकर्तार पाहें ।
परब्रह्म कैसेनि तो लाहे । देवें निरोपावें ॥ ५ ॥
ईश्वरासी ब्रह्मीं अखंड दृष्टि । मिथ्या माया सृजि तो सृष्टि ।
कार्यकारणकर्तृत्वगोष्टी । कर्ताराच्या ऐकिल्या ॥ ६ ॥
कर्तार चंचळ किं निश्चळ । शुद्ध ब्रह्म किं शबळ केवळ ।
सगुण किं निर्गुण निवळ । देवें उमजवावें ॥ ७ ॥
ईश्वर चंचळ मायावशें । ब्रह्म निश्चळ अंतरंग असे ।
सगुण निर्गुण बहुगुणि दिसे । करूनि अकर्ता कर्तारु ॥ ८ ॥
करूनि अकर्ता ब्रह्म कां नोहे । परब्रह्म तों अंतरीं आहे ।
ईश्वरब्रह्मीं द्वैत कां पाहे । देवें निरोपावें ॥ ९ ॥
ईश्वरब्रह्मीं द्वैत ऐसें । द्वैतभान हें मायावशें ।
मायाद्वैत हें ईश्वरीं वसे । ब्रह्म अद्वैत निरंजन ॥ १० ॥
परब्रह्मी स्थिति संचली । तेथें अहं ऐसी स्फूर्ति जाली ।
अहंस्फूर्ति कोणासी उठिली । देवें निरोपावें ॥ ११ ॥
अहं ब्रह्म स्फूर्ति मायालक्षण । परब्रह्मीं कैंचें अहंपण ।
अद्वैतीं कैंचें द्वैतभान । दुजेविण तें सर्वत्र ॥ १२ ॥
दुजेविण निर्गुणब्रह्म । अहंता मायाभास भ्रम ।
ईश्वरतुरीय तुर्यासंभ्रम । अवस्थानिरास कैसा जी ॥ १३ ॥
तुर्या उन्मनी ब्रह्म महिषी । परब्रह्मज्ञप्ति जाण ऐसि ।
अवस्थानिरास ब्रह्मसुखासी । अद्वैत ब्रह्म सनातन ॥ १४ ॥
येक ब्रह्म द्वितिय नास्ति । अनादि ब्रह्म येक अस्ति ।
अनादि मायाभान समस्तीं । निरसुनि देवें टाकावें ॥ १५ ॥
अनादि माया नास्ति स्वभावें । निरसुनि काय हें टाकावें ।
माया आहे नाहीं ह्मणतां अभावें । ब्रह्मसुखासी अंतरिजे ॥ १६ ॥
ब्रह्मीं माया जाली च नाहीं । ईश्वरीं माया दिसे कांहीं ।
ईश्वरभान ब्रह्मीं नाहीं । ईश्वरध्यान सांगावें ॥ १७ ॥

ईश्वरध्यान परब्रह्म । अवस्था मायानिरास वर्म ।
धर्मामध्यें मुख्यधर्म । स्वरूपधर्म सर्वदा ॥ १८ ॥
स्वरूपधर्म सत्यवार्ता । मिथ्यामायेचा कोण कर्ता ।
समस्त निरसुनि विवर्ता । ब्रह्म सनातन दावा जी ॥ १९ ॥
ब्रह्म सनातन दावितां नये । समजणें हा चि उपाय ।
श्रीगुरुकृपा सन्मुख होय । ब्रह्म सनातन स्वयें चि तूं ॥ २०
ब्रह्म सनातन मी आहें । सर्वेश्वर हि तैसा चि पाहें ।
ईश्वरस्वरूप मजला हें । समजुनि द्यावें अभेद ॥ २१ ॥
ईश्वरब्रह्मीं भेद कांहीं । ईश्वरब्रह्मीं भेद नाहीं ।
ईश्वरब्रह्म अभेद पाहीं । मायोपाधिनिर्शनें ॥ २२ ॥
मूळमायागुणें देव । परब्रह्मीचा ईश्वरभाव ।
तरि ईश्वरभाव कां जि वाव । देवें निरोपावा ॥ २३ ॥
ईश्वरभाव वाव ब्रह्मीं । ईश्वर अभेद परब्रह्मीं ।
मायागुण निर्गुणब्रह्मीं । ईश्वरऐक्यें वारले ॥ २४ ॥
ईश्वरब्रह्म ऐक्यस्वरूप । ईश्वरीं मायेचा आरोप ।
प्रकृतिपुरुषाचें कैसें रूप । देवें निरोपावें ॥ २५ ॥
वायो प्रकृति जाणीव ईश्वर । अर्धनारीनटेश्वर ।
आत्मा जगजोति सर्वज्ञ प्रकार । मूळप्रकृति सर्वेश्वरीं ॥ २६ ॥
सर्वेश्वर हा जाणिवरूप । जाणीव मायेचें स्वरूप ।
ईश्वर कैसा जि मायारूप । मज निरोपावें ॥ २७ ॥
सर्वज्ञईश्वराची येक कळा । मूळमाया जाणीव सकळा ।
स्वतंत्र नाहीं ईश्वरीं लीळा । ईश्वराधीन मूळमाया ॥ २८ ॥
मूळमाया ईश्वरशक्ति । मायेकरितां ईश्वर ह्मणती ।
ईश्वरब्रह्म ऐक्यस्थिति । देवें निरोपावी ॥ २९ ॥
ऐक्य ईश्वर परब्रह्म । माया तुर्या निरसला भ्रम ।
भ्रमें चि केला ज्ञानसंभ्रम । ईश्वरब्रह्म अनुभविलें ॥ ३० ॥
ईश्वर कर्तार माया साक्षी । निरंजन साक्षी ना असाक्षी ।
मायानिरासें निर्गुणपक्षीं । सगुण देव कैसा जि ॥ ३१ ॥

देव सगुण मायागुणें । मायेचीं हें चंचळलक्षणें ।
मायानिरासें पूर्णपणें । आत्मा ब्रह्मस्वरूप ॥ ३२ ॥
आत्मा आहे आत्मपणें । जीव आहे जीवपणें ।
माया कैसी मायापणें । विस्तारली ॥ ३३ ॥
माया अनादि नास्तिपणें । ब्रह्म अनादि अस्तिपणें ।
जीवशिव ईश्वर कर्तेपणें । आपण आत्मा निजवस्तु ॥ ३४ ॥
अंतरात्मा वर्तविता देहाचा । देह हा पांचा भूतांचा ।
ऐक्यजिव हा अंश ब्रह्मीचा । भिन्न जीव तो कैसा जि ॥ ३५ ॥
भिन्न जीव तो मायाअंश । क्षराक्षर दोनि पुरुष ।
तयावेगळा उत्तमपुरुष । चराचर व्यापुनि परमात्मा ॥ ३६ ॥
चराचराचें काय जि रूप । स्थावर जंगम कोण स्वरूप ।
जड चंचळ विश्वरूप । देवें निरोपावें ॥ ३७ ॥
जड प्रकृति चंचळ पुरुष । जडासी चेतवी प्रकृति पुरुष ।
प्रकृतिपुरुषां जेथें निरास । तेथें मी आपण विशेष केविं घडे ॥३८॥
विवेकें करूनि प्रकृतिनिरास । अनन्यभावें भजावा परमपुरुष ।
प्रकृतिपुरुषांचा ब्रह्मीं निरास । कैसा स्वामि बोलिला ॥ ३९ ॥
अहं ब्रह्म ईश्वरधर्म । प्रकृतिपुरुषनिरासवर्म ।
अनन्य मिळणी परब्रह्म । ब्रह्मीं अहंपण बोलों नये ॥ ४० ॥
अहंपणें गर्जती शास्त्रें सकळें । मतमतांतरें जाहालीं बहुळें ।
सृष्टीमध्यें चालिलीं केवळें । येक निश्चय सांगा जि ॥ ४१ ॥
आतां बहु नलगे खळखळ । येक चंचळ येक निश्चळ ।
चंचळाचा कर्ता केवळ । चंचळ चैतन्य निर्धारें ॥ ४२ ॥
चंचळाचा कर्ता ईश्वर । किं चंचळ चि वास्तव सर्वेश्वर ।
सर्वेश्वर ब्रह्म निश्चळ निर्धार । देवें निरोपावा ॥ ४३ ॥
चंचळमायेचा चाळक ईश्वर । चैतन्य ब्रह्म सर्वेश्वर ।
निर्मळ निश्चळ निर्विकार । मायातीत परब्रह्म ॥ ४४ ॥
निर्मळ तें तूं परब्रह्म । गुरुकृपेचें मुख्य वर्म ।
अहं ब्रह्मास्मि मुख्य धर्म । श्रुति गर्जती स्वानंदें ॥ ४५ ॥

आत्माराम स्वानंदघन । निर्गुण वस्तु पुरातन ।
मीपणाचें करून निर्शन । सद्गुरुपदीं मिळावें ॥ ४६ ॥
श्रीरामदास श्रीगुरुसमर्थस्वामी । सद्गुरुनाथ स्वानंदधामी ।
वेणीपरंपरा आत्मयारामी । गिरिधर पदीं मिळाला ॥ ४७ ॥

इति श्री आत्मानुभव । वेदशास्त्रींचा स्वानुभव ।
सद्गुरुमुखें ब्रह्मानुभव । संतसज्जनीं विस्तारिला ॥ ४८ ॥

समास ॥ ४ ॥ ॥ ५ ॥

---

॥ श्रीराम ॥

ब्रह्म निराकार संचलें । तें चि ह्मणती आकारलें ।
तूप थिजलें विघुरलें । ब्रह्म विघुरलें कैसेनि ॥ १ ॥
ब्रह्म निर्मळ निश्चळ । तें चि जालें ह्मणती चंचळ ।
सिंधुलहरी अवघे जळ । ब्रह्म चळलें कैसेनि ॥ २ ॥
ब्रह्म अखंड घनदाट । निखिळ निर्गुण गगन थाट ।
हेम अळंकारें बोभाट । ब्रह्म घडिलें कैसेनि ॥ ३ ॥
ब्रह्म केवळ निर्विकार । कधीं च नव्हे सविकार ।
दुग्ध दही हा विकार । ब्रह्म परिणामलें कैसेनि ॥ ४ ॥
परब्रह्म स्वप्रकाशघन । नित्य शाश्वत निरंजन ।
ब्रह्मासी म्हणती केवळ शून्य । परब्रह्म शून्य कैसेनि ॥ ५ ॥
ब्रह्म सत्य ज्ञान अनंत । स्वप्रकाश अद्वैत संत ।
द्वैतबुद्धि ह्मणती अंतवंत । ब्रह्म अनुमानिक कैसेनि ॥ ६ ॥
ब्रह्म निजबीज अपरांपर । अबीज अढळ अतुट सार ।
बीज चि जालें ह्मणती तरूवर । ब्रह्म विरुढलें कैसेनि ॥ ७ ॥
ब्रह्म परिपूर्ण सर्वा ठाईं । अणुमात्र ठाव रिता नाहीं ।
ब्रह्मरंध्रीं ब्रह्म ह्मणती कांहीं । ब्रह्म येकदेसी कैसेनि ॥ ८ ॥
ब्रह्म निष्कर्म शुद्ध निवांत । अलक्ष अगोचर केवळ शांत ।
कर्म ब्रह्म ह्मणती असंत । ब्रह्म प्राकृत कैसेनि ॥ ९ ॥
ब्रह्म क्षराअक्षराहून परतें । उत्तमपुरुष ब्रह्म निरुतें ।
ॐ मितिकाक्षर ह्मणती त्यातें । अक्षर ब्रह्म कैसेनि ॥ १० ॥

ब्रह्म व्यापक दृश्यमान नाहीं। विमळब्रह्म शुद्ध बुद्ध पाहीं।
सर्वब्रह्म ह्मणती कांहीं। ब्रह्म व्याप्य हें कैसेनि॥ ११॥
ब्रह्म सदसद्विलक्षण। सच्चिदानंदत्रिपुटि क्षीण।
जडचेतनि ह्मणती चेतन। ब्रह्म चैतन्य कैसेनि॥ १२॥
ब्रह्म निरावलंब निरंजन। येकरूप अरूप सनातन।
माया अवलंबें ह्मणती अधिष्ठान। ब्रह्म रज्जुशुक्तिक कैसेनि॥१३॥
परब्रह्मीं नाहीं दुसरी परी। नाना ब्रह्में बोलिलीं मतांतरीं।
गगनसदृश खंब्रह्म निर्धारीं। बृहदारण्यसिद्धांतीं॥ १४॥
नाना ग्रंथीं स्वानुभव बोलिले। नाना शास्त्रीं निश्चय केले।
शबल तत्पदार्थ संत अनुवादले। शुद्ध तत्पदार्थ परब्रह्म॥ १५॥
परब्रह्मीचा येक विचार। ब्रह्म अखंड मंडळाकार।
आकारशून्य निराकार। निर्विकार निरंजन॥ १६॥
स्वामि निर्गुण ब्रह्म निराकार। तें चि कांहीं जालें सविकार।
किंवा अनादिसिद्ध हा विकार। देवें निरूपावा॥ १७॥
ब्रह्म केवळ निर्विकारी। कदापि नव्हे दृश्य विकारी।
मायाविकारें सविकारी। अनादिसिद्ध सर्वेश्वरु॥ १८॥
परब्रह्म केवळ निर्गुण। तेथें चि कांहीं कर्तृत्व सगुण।
किंवा अनादिसिद्ध कर्ता आपण। देवें निरूपावा॥ १९॥
परब्रह्म केवळ अगुण। तेथें कैंचे कर्तेपण।
कर्ता पुरुष सर्वेश्वर आपण। अनादिसिद्ध मायावी॥ २०॥
पूर्ण ब्रह्म व्यापक आत्मा। त्याचा चि अंश अंतरात्मा।
किंवा अनादिसिद्ध चंचलात्मा। देवें निरूपावा॥ २१॥
निर्गुण आत्मा निर्मळ निश्चळ। अंतरात्मा देव चंचळ चपळ।
अनादिसिद्ध महद्भूत केवळ। नाना तत्वें चालवी॥ २२॥
ब्रह्म अखंड गगनांबर। तें चि गुणरंगें रंगलें अंबर।
किंवा शबलब्रह्म रंगला सर्वेश्वर। शुद्ध निर्धूत परब्रह्मीं॥ २३॥
ब्रह्मांवरी रंग लागेना। ब्रह्म कधीं च रंगेना।
बहुरूपी बहुरंग कल्पना। अनादिसिद्धीं सर्वेश्वरीं॥ २४॥

निर्गुण निराकार संचलें । कदापि नाहीं विकारलें ।
तरि हें येवढें उभारलें । कासयाचें सांगा जि ।
मूळ संकल्पीं अवघें आलें । त्या अवघ्याचें अवघें जालें ।
अष्टधाप्रकृतीचें बळावलें । सचराचर ॥ २६ ॥
मूळ संकल्प कोणासी उठिला । किंवा संकल्परूप संकल्प जाला ।
किं निर्गुण ब्रह्मासी संकल्प कल्पिला । किंवा संकल्प अनादि ॥२७॥
अनादिसिद्ध हरिसंकल्प । परब्रह्म केवळ निर्विकल्प ।
तेथें कैंचा संकल्पविकल्प । संकल्पविकल्प मायावी ॥ २८ ॥
ब्रह्म मायावछिन्न ह्मणती । ब्रह्म चैतन्य ऐसें कल्पिती ।
ब्रह्म बिंबप्रतिबिंब बोलती । ब्रह्म कैसें सांगावें ॥ २९ ॥
ब्रह्म आकाशासरिखें पाहीं । व्याप्यव्यापकभाव नाहीं ।
चेतना चैतन्यरूपें सर्व हि । कर्ता कर्तेपणें सर्वेश्वरू ॥ ३० ॥
पांचामुखें परमेश्वरु । ईश्वरी वाचा सत्य साचारु ।
सर्वां सर्वत्र कर्ता ईश्वरु । ब्रह्म कर्तें कोणि ह्मणेतिना ॥ ३१ ॥
देव करील तें होईल । ईश्वर करील तें होईल ।
परब्रह्म करील तें होईल । कोठें चि कोण्ही बोलेतिना ॥ ३२ ॥
प्रकृतिपुरुषाचेनि श्वास वेद । वेदरूप हे सर्वै शब्द ।
शब्दसृष्टि हे अगाध । ब्रह्मदेव कर्तार ॥ ३३ ॥
ब्रह्माविष्णुमहेश्वरु । चौदा आपण जगदीश्वरु ।
उत्पत्तिस्थितिसंहारु । त्रिगुणमाया सर्वेश्वरीं ॥ ३४ ॥
कर्ता सर्वेश्वर अनादिसिद्ध । परब्रह्म तें हि अनादिसिद्ध ।
मायादेवी अनादिसिद्ध । अस्ति नास्ति सर्वेश्वरीं ॥ ३५ ॥
ईश्वरब्रह्म अनादिसिद्ध ह्मणतां । मायादेवी अनादिसिद्ध सांगतां ।
येकापासूनि येक दिसती तत्वता । अनादिसिद्ध हीं कैसीं जि ॥३६॥
केवळ ब्रह्मीं ईश्वरत्व नाहीं । सहज चि ईश्वर अनादिसिद्ध पाहीं ।
ईश्वरीं माया मिथ्यत्वें सर्व हि । अनादि माया कल्पना ॥ ३७ ॥
मूळमाया जाणीवरूप । प्रकृति बोलती वायुरूप ।
रूप आणि अरूप । मायादेवी कैसी जि ॥ ३८ ॥

मूळप्रकृतिमाया जगजोतिरूपें । जडप्रकृतिमाया वायुरूपें ।
व्यक्त अव्यक्त मायेचीं दोनीं स्वरूपें । मायातीत निश्चळ ब्रह्म ॥३९॥
परब्रह्म निश्चळ संचलें । चंचळ ईश्वरत्व कैसें जालें ।
अहंस्फुरण कोणासी उठिलें । देवें निरूपावें ॥ ४० ॥
निश्चळ खंब्रह्म अलिप्त बिंबलें । चंचळ ईश्वरत्व मायामय कल्पिलें ।
अहंस्फुरण मायेसी उठिलें । जीवशिवमाया परब्रह्मीं ॥ ४१ ॥
परब्रह्म परिपूर्ण केवळ पाहीं । जीवदशा पावलें कोण जि देहीं ।
जीवासी ब्रह्मता आहे किं नाहीं । देवें निरूपावें ॥ ४२ ॥
परब्रह्म अद्वैत शिष्यराया । जीवदशा अहंकृति माईक माया ।
गगनीं आली अभ्रछाया । गगनब्रह्मीं ब्रह्मांश तूं ॥ ४३ ॥
गगनब्रह्मीं ब्रह्मांश मी । मज चि जीवपण आहे किं स्वामि ।
अहंकृति लागली किं परब्रह्मीं । देवें निरूपावें ॥ ४४ ॥
अखंडमंडळब्रह्म भास्कर । अद्वैत येकरूप गगनाकार ।
अहंकृति माया द्वैतांधकार । अंधासी वाटे गगन काळें ॥ ४५ ॥
स्वामि स्वप्रकाश मी विराजमान । मजला कैचें द्वैततमभान ।
बध्धता मुक्तता माया मन । मन मी नव्हे परब्रह्म मी ॥ ४६ ॥
परब्रह्म मी हि ह्मणों नये । ब्रह्मीं ब्रह्मांश ब्रह्म आहे ।
अभिन्न जीव ब्रह्मता लाहे । भिन्न जीव माया मनोरूपी ॥ ४७ ॥
परब्रह्मीं माया जाली । ऐसी माया चि बोले बोली ।
अहंब्रह्मकुंकुमें कांता मिरवली । मायानियंता सर्वेश्वरु ॥ ४८ ॥
त्रिविध आसनें मुळींचीं । परब्रह्मईश्वरमायेचीं ।
येकासी येकें कधीं चि । स्पर्शलीं नाहींत सच्छिष्या ॥ ४९ ॥
ईश्वरकृपें माया वोसरे । परब्रह्मीं ब्रह्मांश खरे ।
बद्ध मुक्त हें मानस विरे । मोक्ष न सरे स्वस्वरूपीं ॥ ५० ॥
मोक्षसायोज्य दिधलें कोणासी । मुक्त केलें बद्धमुमुक्षासी ।
साधकसिद्ध कैवल्यरासी । ब्रह्मीं ब्रह्मांश ब्रह्मत्वें ॥ ५१ ॥
आकाशब्रह्मास कोणें बांधिलें । आकाशब्रह्म कोणें सोडविलें ।
सद्गुरुनाथें आश्चिर्य केलें । संत सर्वज्ञ परब्रह्मीं ॥ ५२ ॥

शास्त्रें नाना सिध्धांत करिती । परब्रह्मीं कर्तुत्व लाविती ।
परब्रह्मासी कर्ता ह्मणती । निमित्तकारण सर्वेश्वर ॥ ५३ ॥
क्षर अक्षर पुरुष मान्य । दोनि पुरुष सत्तासामान्य ।
उत्तमपुरुष तो अन्य । अनादिसिद्ध संचला ॥ ५४ ॥
परब्रह्म सनातन । निखिळ निर्गुण निरंजन ।
तुरीय ईश्वर पदार्थज्ञान । विज्ञानब्रह्मीं हारपलें ॥ ५५ ॥
मनसाक्षी मनावेगळा । आत्मा साक्षत्वासी निराळा ।
उन्मनी अवस्थेचा जिव्हाळा । परब्रह्मीं हारपला ॥ ५६ ॥
आकाशायेवढें ब्रह्म भानुमंडळ । मरीचमृगांबासी नाही स्थळ ।
ज्ञान अज्ञान तम प्रकाश समूळ। विद्या अविद्या दिसेचि ना ॥५७॥
गगनायेवढा दर्पण मांडिला । दर्पण व्यापुनि पुरुष देखिला ।
शून्यसारुनि सनातन पाहिला । आदिपुरुष आत्माराम ॥ ५८ ॥
व्याप्य कांहीं दृष्टि देखिलें । ह्मणोनि व्यापक परब्रह्म बोलिलें ।
व्याप्य व्यापक ब्रह्मीं हारपलें । दृश्य द्रष्टा दर्शनांतीं ॥ ५९ ॥
परब्रह्म देवा आहे तरि कैसें । येकवेळ स्वामि सांगिजे ऐसें ।
दृश्यद्रष्टादर्शनपिसें । ब्रह्म म्यां कैसें जाणावें ॥ ६० ॥
ऐक शिष्या शिरोमणी । ब्रह्मखूण सांगेन निर्वाणीं ।
परब्रह्म आपण आपणेपणीं । येकांत सौरसें अद्वैत ॥ ६१ ॥
श्रीरामदास श्रीगुरुसमर्थस्वामी । सद्गुरुनाथ स्वानंदग्रामी ।
वेणीपरंपरा आत्मयारामी । गिरिधर ब्रह्मीं मिळाला ॥ ६२ ॥

इति श्री आत्मानुभव । वेदशास्त्रींचा स्वानुभव ।
सद्गुरुमुखें ब्रह्मानुभव । संतसज्जनीं विस्तारिला ॥ ६३ ॥
समास पंचम ॥ ५ ॥ ॥ ६ ॥

---

॥ श्रीराम ॥

निर्गुण निरंजन परब्रह्म । निर्विकल्प निराभास उत्तम ।
माया मृगजळ माईक कर्म । कार्य कारण कर्तुत्व हें ॥ १ ॥
केलें तें अवघें चि लटिकें । तरि कर्ता बोलणें हें फिकें ।
तरि हें स्वामि दृश्य इतुकें । कोणें केलें सांगा जि ॥ २ ॥

९८०९

लटिक्याचा कर्ता कोण । हें पुसणें चि अप्रमाण ।
ह्मणोनि हें चि प्रमाण । जें स्वभावें चि जालें ॥ ३ ॥
स्वभावाचें काय जि रूप । ब्रह्मरूप किं ईश्वररूप ।
किंवां माया स्वभावसंकल्परूप । आपुली आपण विस्तारली ॥४॥
माया आपण स्वतंत्र । ऐसा नाहीं हा विचार ।
मायेसी निर्मिता सर्वेश्वर । तो येक आहे मायावी ॥ ५ ॥
ईश्वराकरितां माया दिसे । सूर्याकरितां मृगजळ जैसें ।
गगनब्रह्मीं भान हें नसे । ईश्वर भानु निमित्त हा ॥ ६ ॥
ईश्वर भानु मरीचप्रभा । माया मृगजळ वाहे प्रतिभा ।
मनोमृग हे धांवति लाभा । आशातृष्णाशमनार्थ ॥ ७ ॥
मनोमृग हा आपुला आपण । किंवा आत्मयाचा अंश मन ।
किंवा मनरूप आत्मा जाण । मनश्चास्मिवाक्यार्थें ॥ ८ ॥
मनरूप आत्मा आत्मांश मन । शबल आत्मयाचें रूप जाण ।
शुद्ध आत्मा विलक्षण । निर्गुण निरंजन निजवस्तु ॥ ९ ॥
शुद्ध आत्मा उत्तम निर्गुणी । शबल आत्मा अवलक्षणी ।
बरी वाईट अवघी करणी । आत्मयाची कैसी जि ॥ १० ॥
शुद्ध आत्मा सच्चिदानंदघन । शबल आत्मा जगत्कारण ।
अंतरात्मा निरंजन । नामरूप हें समजावें ॥ ११ ॥
नामरूप मिथ्या ह्मणती । नामरूप योगी ध्याती ।
नामरूप सद्गुरुमूर्ति । देवें समजोनि घ्यावें ॥ १२ ॥
जगद्रूपें नामरूप मिथ्या । ब्रह्मरूपें नामरूप सत्य ।
तारकब्रह्मनामें हें नित्य । श्रीराम ध्यातसे गौरिहरु ॥ १३ ॥
रूपाची न धरितां सोय । नामाऐसें मंगळ नये ।
दशधा हरिनाम वर्तत आहे । हरिवायु हरि विष्णु ॥ १४ ॥
श्रीहरीचीं अनंत रूपें । अनंतरूपीं दोनि स्वरूपें ।
हरिसंकल्प ईश्वररूपें । परब्रह्म तें निजरूप ॥ १५ ॥
परब्रह्म मायेनें न देखिलें । ईश्वरतत्त्व मायेनें देखिलें ।
प्रकृतिपुरुषयोगें चालिलें । सर्व कांहीं चराचर ॥ १६ ॥

आत्मा माया विकार करी । आळ घालिती ब्रह्मावरी ।
वायोप्रकृति आत्मा हरी । प्रकृतिपुरुषें निर्धारें ॥ १७ ॥
गुणमायेचे पवाडे । निर्गुणीं हें कांहीं च न घडे ।
वायोकरितां घन मेहुडे । तैसीं मायेकरितां ब्रह्मांडें ॥ १८ ॥
अस्ति भाति प्रियरूप । तिन्हि मिळोनि ब्रह्मस्वरूप ।
प्रकृतिपुरुष नामरूप । नाना शास्त्रीं बोलिलें ॥ १९ ॥
अविद्यावछिन्न जीवभाव । मायावछिन्न ईश्वरभाव ।
प्रकृतिपुरुष रूप नाव । शबलब्रह्म सत्शास्त्रीं ॥ २० ॥
शबलब्रह्म शुद्धब्रह्म । वेदशास्त्रींचें मुख्यवर्म ।
ईश्वर बोलिजे मायाब्रह्म । विमळब्रह्म निजवस्तु ॥ २१ ॥
माया अधिष्ठान टाकून हरि । ब्रह्मीं ब्रह्म चि निर्विकारी ।
कैंचा सर्प मुळीं दोरी । येकीं अनेक भासलें ॥ २२ ॥
येकावरी भासलें अनेक । येकत्व सारूनि येक देख ।
परब्रह्मीं येक अनेक । रज्जु सर्प बोलों नये ॥ २३ ॥
रज्जु ब्रह्म शास्त्रीं बोलिलें । शबलब्रह्म हें निरोपिलें ।
शुद्धब्रह्म तें वेगळें । संत सर्वज्ञ जाणती ॥ २४ ॥
रज्जु परब्रह्म मतांतरथाया । थायारूपें हे दुरत्ययमाया ।
तरली न जाय सद्गुरुपाया । वेगें शरण रिघावें ॥ २५ ॥
सद्गुरुपदीं परब्रह्मीं । रज्जु सर्प नाहीं उर्मी ।
सदा सर्वदा स्वरूपधर्मी । ब्रह्मीं ब्रह्म चि निर्धारें ॥ २६ ॥
रज्जु ईश्वर सर्प माया । अधिष्ठानब्रह्मीं गेलें विलया ।
रज्जु परब्रह्म मतांतरथाया । सत्यीं असत्य वांया होईचना ॥ २७॥
सत्यब्रह्मीं असत्य नाहीं । तथापि कल्पिलें जरि हें कांहीं ।
तरि ब्रह्मीं माया शाश्वत पाहि । सत्यापासुनि सत्यत्वें ॥ २८ ॥
वेदशास्त्रीं माया असत्य । विमळब्रह्म येक सत्य ।
शबलब्रह्म केलें मिथ्य । मिथ्यीं मिथ्यत्व भासलें ॥ २९ ॥
आकारीं भासला आकार । निर्विकार तो निर्विकार ।
सद्गुरुपदींचा निर्धार । संत सर्वज्ञ जाणती ॥ ३० ॥

रज्जु पाहीं भुजंग नाहीं । ईश्वरभाव कल्पिला कांहीं ।
विमळब्रह्म शुद्ध बुद्ध पाहीं । निर्विकल्प निरंजन ॥ ३१ ॥
निर्विकल्प कल्पनातीत । जाणती योगि संत महंत ।
अंत चि नाहीं अनंत । वेदशास्त्रीं वाखाणिलें ॥ ३२ ॥
वेदशास्त्र विचार केला । संतसज्जना अनुभवा आला ।
श्रोतीं विमळ विवेक पाहिला । विमळब्रह्म अनुभवलें ॥ ३३ ॥
सर्व साभिमान सांडोनि जावें । विमळब्रह्म होऊनि राहावें ।
होणें जाणें नाहीं स्वभावें । विमळब्रह्म तुझा तूं ॥ ३४ ॥
तुझें तूंपण स्वरूपीं गेलें । ब्रह्मीं ब्रह्म चि ब्रह्मत्वें ठेलें ।
सद्गुरुनाथें ऐसें केलें । श्रीरामदासस्वामिसमर्थें ॥ ३५ ॥
श्रीरामसमर्थउपासना । श्रीराम जाली मनोभावना ।
भावें शरण संतसज्जना । सर्वसंदेहनिवृत्ति ॥ ३६ ॥
ऐसें चि राहो अनुसंधान । अखंड लागो श्रीगुरुध्यान ।
सद्गुरुकृपेचें प्रगट निशाण । गगनमंडळ झाकोनियां ॥ ३७ ॥
श्रीरामदासश्रीगुरुसमर्थस्वामी । सद्गुरुनाथ स्वानंदधामी ।
वेणीपरंपरा आत्मयारामी । गिरिधर स्वरूपीं स्वानंदें ॥ ३८ ॥
इति श्रीआत्मानुभव । वेदशास्त्रींचा स्वानुभव ।
सद्गुरुमुखें ब्रह्मानुभव । संतसज्जनीं विस्तारिला ॥ ३९ ॥
समास षष्ठम ॥ ६ ॥ ॥ छ ॥

---

॥ श्रीराम ॥

अंतरात्म्यासी लयो बोलिला । देहकाष्ठ दाहोनि अग्नि विझाला ।
शास्त्रविरुद्ध वाटे प्रत्यय आला । आत्मयास नाश कैसा जि ॥ १ ॥
शबल आत्मा नाशवंत । शुद्ध आत्मा अनाशवंत ।
जगत्कारणास आहे अंत । वेदशास्त्रें बोलती ॥ २ ॥
जगत्कारण ब्रह्म ह्मणती । ब्रह्मास नाश कैसा कल्पिती ।
वेदशास्त्रार्थें सद्गुरुमूर्ति । जगत्कारणीं सांगावें ॥ ३ ॥
कार्य नासे कारणास । कर्तुत्वहेतु प्रकृतिनिरास ।
कर्ता आधिपत्य ईश्वर आभास । निराभास परब्रह्म ॥ ४ ॥

अहीं ईश्वरत्व भ्रमरूप केलें। देवभक्तपण लया नेलें।
शून्यवादी ह्मणती जि फावलें। शून्यत्व ब्रह्म कैसें जि ॥ ५ ॥
निरसितां निरसितां शून्य सरलें। मायानिरालें ब्रह्म उरलें।
आत्मप्रत्ययें प्रत्यया आलें। निर्मळ निश्चळ परब्रह्म ॥ ६ ॥
परब्रह्मींचें पाहणें। पाहणार पाहणें आपण होणें।
सहजसमाधि अखंड राहाणें। मग साध्यसाधन कैसें जि ॥ ७ ॥
साध्यवस्तु परब्रह्म। साधनसंपत्ति मनोधर्म।
श्रवणमनन निजध्यासधर्म। साक्षात्कार सर्वेश्वरीं ॥ ८ ॥
सर्वेश्वरीं नाना भेद। सकाम निष्काम भेद अभेद।
भवस्वर्ग भोगें नानाविध। नाना देव उपासना ॥ ९ ॥
नाना देवाच्या नाना प्रतिमा। प्रतिमामूळ अवतारमहिमा।
अवतारमूळ अंतरात्मा। आत्मदर्शन कैसें जि ॥ १० ॥
गुप्तगंगेचें करणें स्नान। अंतरीं गुप्तेश्वराचें दर्शन।
पुढें निर्गुण निरंजन। वृत्तिशून्य योगेश्वर ॥ ११ ॥
निर्गुण निरंजन परब्रह्म। सगुण सर्वेश्वर ईश्वरधर्म।
कार्यकारणकर्तुत्वधर्म। कर्ता आधिपत्य मायावी ॥ १२ ॥
कर्ता कारण कार्य तिन्ही। आत्मारामी किं निरंजनीं।
सगुणी निर्गुणी किं निखिळनिर्गुणी। देवें निरोपावें ॥ १३ ॥
सगुण निर्गुण निखिळनिर्गुण। मुख्य अध्यात्मनिरूपण।
निर्गुण ह्मणिजे बहुगुणी सगुण। निखिळनिर्गुण निजवस्तु ॥१४॥
निखिळनिर्गुण निर्विकारी। सगुणनिर्गुणदेव विकारी।
देव कैसा जि सविकारी। देवें निरोपावा ॥ १५ ॥
देव चुंबक लोह प्रकृति। चेतना गुण सहजस्थिति।
चैतन्य चंचळ येणें रीति। करूनि अकर्ता सर्वेश्वर ॥ १६ ॥
मुळीं नाहीं कर्तव्यता। कोण करूनि अकर्ता।
करूनि अकर्ता त्याहूनि पर्ता। देवें निरोपावा ॥ १७ ॥
करूनि अकर्ता त्याहूनि पर। निखिळनिर्गुण परात्पर।
चंचळीं चंचळ चैतन्य ईश्वर। निश्चळीं निश्चळ निरंजन ॥ १८ ॥

निश्चळीं निश्चळ स्वरूप संचलें । चंचळीं चंचळ लीन केलें ।
चैतन्यीं चैतन्य काय निवेदिलें । देवें निरोपावें ॥ १९ ॥
चैतन्यीं चित्तनिवेदन । निश्चळीं निश्चळ देव आपण ।
ब्रह्मीं ब्रह्मांश ब्रह्म पूर्ण । जेथिले तेथें मायांश हे ॥ २० ॥
माया अविद्या स्थूळकाया । आठवा ज्ञानदेह मूळमाया ।
सर्वज्ञदेव तो स्वामिराया । मायारूप हा कैसा जि ॥ २१ ॥
अंतरात्मा मूळमाया । दोन्हि येक चि शिष्यराया ।
ईश्वरत्व शोधितां जाय विलया । परब्रह्मीं निर्धारें ॥ २२ ॥
सर्वेश्वरासी शोधूनि पाहिलें । तों चंचळाचें निश्चळ जालें ।
चंचळ कैसें निश्चळ जालें । देवें निरोपावें ॥ २३ ॥
चंचळ न होईजे निश्चळ । प्रचित जाणावी केवळ ।
निश्चळीं विरे चंचळ । निश्चयेंसीं ॥ २४ ॥
चंचळासी जो भजेल । तो सहज चि चळेल ।
चंचळ निश्चळ मूळ सकळ । देवें निरोपावें ॥ २५ ॥
देव सकळांचें मूळ । देवासी मूळ ना डाळ ।
देव चि दाखवी केवळ । निर्गुण ब्रह्म निरंजन ॥ २६ ॥
देवें निरंजन दाविलें वेगळें । भक्तांसी येकघातसें वाटलें ।
देवपद चि निरंजन केलें । पाहिजे स्वामी ॥ २७ ॥
जीवपणाचें करिसी निरशन । तरि देवपद चि निरंजन ।
मायेकरितां देवभक्तपण । येऱ्हवीं निरंजन विचारें ॥ २८ ॥
विचारें चि अनन्य जाला । पाहणाराविण प्रत्यय आला ।
निश्चळ चंचळ सांगणें मजला । देवभक्त मी आत्मा किं ॥ २९ ॥
आत्मा अनात्मा विवेक केला । आत्मा नित्यसा निवडिला ।
सारविचारें वृत्तितंतु गेला । देवभक्त तूं परब्रह्म ॥ ३० ॥
ब्रह्म आकाश निश्चळ जाती । आत्मा वायु चंचळ जाती ।
आत्मा निश्चळ शास्त्रें ह्मणती । शास्त्रार्थ देवें सांगावा ॥ ३१ ॥
निर्गुण आत्मा तो निश्चळ । जैसें आकाश अंतराळ ।
बहुगुणी सगुणदेव चंचळ । चंचळात्मा निर्धारें ॥ ३२ ॥

चंचळात्मा निश्चळात्मा । दोनिहि येक किं भिन्न आत्मा ।
भिन्नाभिन्न हा परमात्मा । देवें निरोपावा ॥ ३३ ॥
चंचळवायोमध्यें जो आत्मा । मायाचाळक चंचळात्मा ।
निश्चळगगनामध्यें जो आत्मा । निश्चळात्मा जाणिजे ॥ ३४ ॥
निश्चळात्मा ब्रह्मरूप । चंचळात्मा ईश्वरस्वरूप ।
ईश्वर ब्रह्म कां भेदरूप । देवें निरोपावें ॥ ३५ ॥
ईश्वरब्रह्मभेद मायागुणें । मायेची हें चंचळलक्षणें ।
चंचळवर्तविता चंचळ देव ह्मणणें । निश्चळीं निश्चळ परब्रह्म ॥३६॥
परब्रह्म असतां निश्चळ । तेथें संकल्प उठिला चंचळ ।
संकल्पाचें कोण मूळ । देवें निरोपावें ॥ ३७ ॥
मुळमायेचे सेवटीं । हरिसंकल्प मुळीं उठी ।
उपासनायोगें तेथें मिठी । घातली पाहिजे ॥ ३८ ॥
उपासनेचे शेवटीं । देवां भक्तां अखंडभेटि ।
अखंड परब्रह्मीं दृष्टि । उपासनेच्या प्रसादें ॥ ३९ ॥
उपासनेचें उत्तीर्ण व्हावें । भक्तें भजन वाढवावें ।
उपासनाध्यान करावें । कोणपरी सांगा जि ॥ ४० ॥
उपासनामूर्तिध्यान । अखंडध्यान दंडकध्यान ।
सगुणध्यान निर्गुणध्यान । आत्माराम निरंजनी ॥ ४१ ॥
आत्माराम अंतरदेव चुकती । धांवा घेऊनि तीर्था जाती ।
कोण्ही उपासनामार्ग उछेदिती । येक निश्चय सांगा जि ॥ ४२ ॥
सांडी सगुणभजनासी । तो ज्ञाता परि अपेशी ।
कर्मउपासना नावडे मूर्खासी । भावें रघुनाथासी भजावें ॥ ४३ ॥
कर्माविगळें न व्हावें । तरि देवासी कासया भजावें ।
कर्म करावें किं न करावें । सांगणें स्वामि ॥ ४४ ॥
कर्मउपासनाज्ञान । त्रिकांडदेव प्रमाण ।
देवगुरुब्राह्मणपूजन । नवविधभजन सत्कर्म ॥ ४५ ॥
कर्मामध्यें दोनि कर्म । शुद्ध शबल ऐक वर्म ।
निःकामकर्म स्वरूपधर्म । सकामकर्म स्वर्गादि ॥ ४६ ॥
नित्यनमित्यकर्म केलीं । हरईं फळाशा नाहीं धरिली ।
ब्रह्मार्पणें सर्व हि जालीं । याचीं फळें कैसीं जि ॥ ४७ ॥

निःकामभजनाचें फळ आगळें । सामर्थ्य चढे मर्यादेवेगळें ।
श्रीगुरुसर्वेश्वरासी भावें जोडिलें । ब्रह्मानंद भोगावया ॥ ४८ ॥
कर्मफळ केलें ब्रह्मार्पण । उपासनेचें काय जि लक्षण ।
सगुणनिर्गुण सांगिजे भजन । आत्मारामीं पावावया ॥ ४९ ॥
उपासना ज्ञानस्वरूप । ज्ञानी चौथा देह अरूप ।
विगतज्ञान विज्ञान ब्रह्मरूप । आत्माराम निरंजनी ॥ ५० ॥
ज्ञानकांडीं निरंजन कैसें । सांगा स्वामि असेल तैसें ।
सद्गुरुवचन धरीन विश्वासें । सद्गुरुब्रह्मीं पावावया ॥ ५१ ॥
ज्ञानकांड ऐकें गुरुमुखें कैसें । निर्गुण ब्रह्म तूं जैसें तैसें ।
शुद्धबुद्ध सदोदित ऐसें । अहंब्रह्मास्मिवाक्यार्थें ॥ ५२ ॥
आतां स्वामि निःसंदेह जालें । कांडत्रय हें अनुभवा आलें ।
सद्गुरुकृपें वैभव लाभलें । अनंतकल्पें चिरंजीवी ॥ ५३ ॥
श्रीरामदासश्रीगुरुसमर्थस्वामी । सद्गुरुनाथ स्वानंदधामी ।
वेणीपरंपरा आत्मयारामी । गिरिधर स्वरूपीं मिळाला ॥ ५४ ॥

इति श्रीआत्मानुभव । वेदशास्त्रांचा स्वानुभव ।
सद्गुरुमुखें ब्रह्मानुभव । संतसज्जनीं विस्तारिला ॥ ५५ ॥

समास सप्तम ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

---

॥ श्रीराम ॥

निश्चळ ब्रह्मीं चंचळ आत्मा । सर्वांपर जो परमात्मा ।
चैतन्य साक्षी ज्ञानात्मा । षड्गुणेश्वर कैसा जि ॥ १ ॥
चैतन्य साक्षि सर्वगुणाचा । मार्ग दाखवी निर्गुणाचा ।
पार पावनी मूळमायेचा । चंचळ चैतन्य सर्वेश्वरु ॥ २ ॥
चंचळपणें विकारलें । सगुण ऐसें बोलिलें ।
केवळ निर्गुण संचलें । गुणातीत तें कैसें जि ॥ ३ ॥
गुणातीत तें परब्रह्म । सगुण विकारलें ईश्वरधर्म ।
निर्गुणीं लावाल विकारधर्म । तरि हा अधर्म मायावी ॥ ४ ॥
मायेसी कवळलें ब्रह्म अंबर । तितुका कल्पितो सर्वेश्वर ।
निर्गुणब्रह्म तें अपरांपर । ब्रह्मीं ईश्वरत्व कैसें जि ॥ ५ ॥

परब्रह्मीं दुजें दिसेना । परब्रह्म येक जिनसाना ।
अनादिसिद्ध ईश्वर जाणा । ब्रह्माकार अंतरीं ॥ ६ ॥
अंतरात्मा माया अत्यंत चंचळ । परब्रह्म निर्मळ निश्चळ ।
आत्मत्वीं जन्ममरण केवळ । लागलें किंवा नाहीं जि ॥ ७ ॥
आत्मत्वीं जन्ममरण लागे । आत्मत्वीं जन्ममरण न भंगे ।
संभवामि युगे युगे । ऐसें वचन गीतार्थ ॥ ८ ॥
जीव येकदेशी नर । विचारें जाला विश्वंभर ।
विश्वंभरासी संसार । चुकला किंवा नाहीं जि ॥ ९ ॥
विश्वंभरासी संसार मायोपाधि । जीवासी संसार अविद्योपाधि ।
माया अविद्या निरसितां उपाधि । जीवशिवा संसार चुकला ॥१०॥
जीवशिवा प्रपंच बाह्यदृष्टि । जीवशिव ब्रह्म आत्मदृष्टि ।
सद्गुरुकृपेची कृपावृष्टि । जीवशिवा ऐक्य स्वानंदें ॥ ११ ॥
जीवशिवासी ऐक्य ब्रह्मीं । जीवशिव मायारूपें आह्मी ।
मायारूप परब्रह्मीं । ऐक्य कैसें पावलें ॥ १२ ॥
अहंमायास्फुरण गेलें । ब्रह्मीं ब्रह्मांश निवेदन जालें ।
गगनीं गगनाकार संचलें । चंचळ विरालें परब्रह्मीं ॥ १३ ॥
देवा येवढें चंचळ नाहीं । ब्रह्मा येवढें निश्चळ नाहीं ।
देव निश्चळ आहे किं नाहीं । देवें निरोपावें ॥ १४ ॥
निरोपाधि देव निश्चळ । मायोपाधि देव चंचळ ।
माया जाणीव वायोरूप केवळ । आत्मा निर्गुण निरंजन ॥ १५ ॥
आत्मा आणि निरंजन । येणें वाढतो अनुमान ।
आत्मा निरंजन लक्षण । देवें निरोपावें ॥ १६ ॥
आत्मा कर्तार माया साक्षी । निरंजन साक्षी ना असाक्षी ।
मायानिरासें अलक्षलक्षीं । मायातीत निरंजन ॥ १७ ॥
मायेसी निर्मिता सर्वेश्वर । परब्रह्मीचा भिन्न विचार ।
ईश्वरपरब्रह्मऐक्यनिर्धार । देवें निरोपावा ॥ १८ ॥
ईश्वरब्रह्म ब्रह्मत्वें आहे । माया निरास करूनि पाहें ।
मायोपाधि ब्रह्मीं न साहे । आपुलें आपण निरुपाधि ॥ १९ ॥
आपणाविण आपण तें तूं । तुर्याउन्मनीविलक्षण तूं ।
तूं तुज पाहातां ब्रह्म चि तूं । अहं ब्रह्म ब्रह्मास्मि ॥ २० ॥

अहंपणाचें करिसी निर्शन । तरि तुझें तुजला चि आत्मदर्शन ।
आत्मदर्शनीं समाधान । अहं ब्रह्म ब्रह्मेती ॥ २१ ॥

वृत्ति निवृत्तीचा साक्षी होसी । साक्षत्व सांडूनि ब्रह्म चि असती ।
सोहं हंसा तत्वमासि । येसि सोसि ब्रह्म चि तूं ॥ २२ ॥

ब्रह्मीं ब्रह्म चि ब्रह्मत्वें जालें । जीवशिवमायाभान निरसलें ।
जैसें तैसें स्वरूप संचलें । आतां सिद्धासी साधन बोलों नये॥२३

सिद्धासी पाहिजे अगत्य साधन। साधन न करितां सिद्धपणें बंधन।
भक्तिज्ञानवैराग्यलक्षण । अनन्यसाधन सिद्धाचें ॥ २४ ॥

भक्तिज्ञानवैराग्यस्थिति । अनन्याची कैसी गति ।
सद्गुरुस्वामि कृपामूर्ति । मज निरोपावें ॥ २५ ॥

भक्ति करितां देव चि आपण । ज्ञान विवरितां ब्रह्म संपूर्ण ।
वीतराग धरितां स्वस्वरूप पूर्ण । संग निःसंग निजवस्तु ॥ २६ ॥

संगनिःसंग वस्तु ज्ञानी । जनीं असोनि निरंजनी ।
कर्मउपासना गुरुदेवभजनीं । अनुसंधानीं सर्वदां ॥ २७ ॥

अनुसंधानीं अजपाजप । तरि गुरुमंत्राचा कां जि साक्षप ।
महेश्वर करितसे तप । तारकब्रह्म कां स्वामि ॥ २८ ॥

अजपाजप सोहंस्मरणवर्म । अहंसोहं द्वैताद्वैतधर्म ।
राम अद्वैत परब्रह्म । तारकब्रह्मउपासना ॥२९॥

ज्ञानाहूनि श्रेष्ठ असेना । तरि कां पाहिजे उपासना ।
उपासनेनें जना । काय प्राप्त सांगावें ॥ ३० ॥

उपासनेनें सर्व हि प्राप्त । पुरती भक्तमनोरथ ।
शंकर ध्यातसे सीताकांत । ज्ञानवैराग्यशिरोमणी ॥ ३१ ॥

हनुमान ज्ञानि श्रीरामसेवक । प्राणनाथ त्रैलोक्यव्यापक ।
हरिहरइंद्रब्रह्मादिक । आज्ञाधारक स्वामीचे ॥ ३२ ॥

सिद्धसाधुसंतमुनि । विरक्तयोगीअनुसंधानी ।
सदासर्वदा श्रीगुरुभजनीं । मोक्षमुक्ति सारूनियां ॥ ३३ ॥

वेदशास्त्र श्रुतिस्मृति । गीताभागवत नानाग्रंथीं ।
श्रीगुरुश्रीहरीची अनन्यभक्ति । प्राधान्य केली सर्वेश्वरें ॥ ३४ ॥

येक गुरु येक देव । कोठें तन्हि असावा भाव ।
भावार्थेंविण वाव । सर्व कांहीं बोलिलें ॥ ३५ ॥
देवपदें गुरुपदें । संत सज्जन सर्व हि पदें ।
ईश्वरपदें ब्रह्मपदें । आत्माराम सर्वत्र हि ॥ ३६ ॥
आत्मारामउपासना । तेणें पाठविलें निरंजना ।
निस्संदेह अनुमाना । ठाव चि नाहीं ॥ ३७ ॥
संदेह मानसीं उत्पन्न । निरंजनीं पाववी राम आपण ।
आत्माराम नव्हे किं निरंजन । देवें निरूपावें ॥ ३८ ॥
आत्माराम निरंजन पूर्ण । भक्तांसी करितसे परिपूर्ण ।
सेव्यसेवकभाव जाण । द्वैताद्वैत सर्वेश्वरीं ॥ ३९ ॥
द्वैताद्वैत उपदेशकाजा । आत्माराम निरंजन वोजा ।
निरंजनीं पाववी भक्तराजा । योगीराजा योगबळें ॥ ४० ॥
योगीराजीं वियोग नाहीं । भक्तराजीं विभक्ति नाहीं ।
राम केवळ परब्रह्म पाहीं । भक्त योगी मिनले स्वयें ॥ ४१ ॥
भक्त योगी मुनि ज्ञानी । ब्रह्मा विष्णु महेष तिन्हि ।
आत्मारामनिरंजनी । अनुसंधानी सर्वदां ॥ ४२ ॥
आत्माराम ज्ञानघन । पूर्ण ब्रह्म पुरातन ।
विश्वंभर विद्यमान । भाग्यें कळे गुरुभक्तां ॥ ४३ ॥
श्रीरामदास श्रीगुरुसमर्थस्वामी । सद्गुरुनाथ स्वानंदधामी ।
वेणीपरंपरा आत्मयारामी । गिरिधर श्रीपदीं स्वानंदे ॥ ४४ ॥

इति श्री आत्मानुभव । वेदशास्त्रींचा स्वानुभव ।
सद्गुरुमुखें ब्रह्मानुभव । संतसज्जनीं विस्तारिला ॥ ४५ ॥
समास आठवा ॥ ८ ॥ ॥ ७ ॥

---

॥ श्रीरामकर्ता ॥

ॐमितिकाक्षरें जपध्यान करिती । ॐमितिकाक्षरें औठमात्रा स्थिति
ॐमितिकाक्षर ब्रह्म कैसें ह्मणती । देवें निरूपावें ॥ १ ॥
ॐमिति काक्षर सगुण वाच्यब्रह्म । क्षराअक्षरावरतें अनिर्वाच्यब्रह्म ।
निर्मळ निश्चळ परब्रह्म । निर्गुण निर्विकार सदोदित ॥ २ ॥

निर्विकारी निर्गुण देव साचा । विकार प्रत्यक्ष गुणमायेचा ।
अंतरात्मा विकारी जाला कासयाचा । सांगा स्वामि निर्धारें ॥३॥
अंतरात्मा चुंबक सर्वेश्वर । मायागुणसंगें करी लोह विकार ।
निर्मळ निश्चळ निर्विकार । मायातीत निरंजन ॥ ४ ॥
माया अनेक विश्वरूप । माया विष्णूचें स्वरूप ।
विष्णुस्वरूप विश्वरूप । मायामय हें कैसें जि ॥ ५ ॥
मायामय ईश्वरत्व बोलिलें । मीतूंपण भ्रमरूप कल्पिलें ।
उपासकजनीं द्वैताद्वैत भाविलें । प्रकृतिपरतें परब्रह्म ॥ ६ ॥
कार्यकारणकर्तुत्व हेतु प्रकृति । सुखदुःखभोकृत्वीं पुरुष निश्चिति ।
सांख्यमतीं पुरुष अलिप्त ह्मणती । सुखदुःखभोक्ता कोण जि ॥७॥
सुखदुःखभोक्ता क्षरनाम पुरुष । अक्षर साक्षी कुटस्थ विशेष ।
सुखदुःखसाक्षित्वातीत उत्तमपुरुष । आदिपुरुष आत्माराम ॥ ८ ॥
आत्मारामें सीताशोक केला । सुखदुःखभोक्ता दिसोन आला ।
तिहि देवासी दुःखशोक लागला । उत्तमपुरुष हे कैसे जि ॥ ९ ॥
आत्मारामीं दुःखशोक नाहीं । माया नटरूप दाविलें कांहीं ।
हरीहरविधि निजरूपें सर्व हि । सच्चिदानंद परब्रह्म ॥ १० ॥
परब्रह्मीं हरिसंकल्प केवळ । अंतरात्मा देव अत्यंत चंचळ ।
आत्मा ज्ञानघन ह्मणती सकळ । चंचळत्व कैसें सांगावें ॥ ११ ॥
निमिषार्धें त्रिभुवन फिरे । स्वप्रकाशें अत्यंत पसरे ।
सत्ता चैतन्य साक्षित्वें विवरे । निर्गुणीं भरे अंतरात्मा ॥ १२ ॥
निर्गुणीं आत्मा कैसा भरला । सगुणभाग कैसा सरला ।
परब्रह्म निश्चळ कैसा थारला । देवें निरोपावा ॥ १३ ॥
निश्चळ खंब्रह्मीचा प्रतिबिंबला । आत्मा स्वयंप्रकाशें ब्रह्मीं मिनला ।
सगुणमायोपाधि मागें सरला । पंचप्रळयें परब्रह्मीं ॥ १४ ॥
परब्रह्मीं दुजेनविण ऐक्य जालें । घटावकाशें आकाश संचलें ।
संचितप्रारब्धक्रियमाण जीवासि लागलें ।
मुळीं जीवपण आलें कोठूनि जि ॥ १५ ॥
जीवपणशिवपण अनादिमाया । बद्धमुक्त मन हें शिष्यराया ।
संचितप्रारब्धक्रियमाण वायां । गुणकर्मविभागें अहंप्रकृति ॥१६॥

अहंप्रकृतीचा विकार जाला । कोण्हि आत्मा ह्मणती आकारला ।
अन्वयव्यतिरेकें ब्रह्म मजला । सर्व विमळ देवें निरोपावें ॥ १७ ॥
विमळब्रह्म व्यतिरेकें जाणावें । सर्वब्रह्म अन्वयें समजावें ।
शुद्धब्रह्मीं शबलब्रह्म स्वभावें । विवर्तरूप सर्वेश्वर ॥ १८ ॥
सर्वेश्वर शबलब्रह्म उपाधि । परब्रह्म केवळ निरुपाधि ।
शास्त्रीं षडास्माकमनादि । साहा अनादि कैशा जि ॥ १९ ॥
जीवईश विशुद्धब्रह्म । मुळप्रकृति अविद्या अविद्योपाधि ब्रह्म ।
साहा अनादि शोधितां वर्म । परब्रह्म आपण चि तूं ॥ २० ॥
परब्रह्मीं आत्मा ब्रह्म चि मी । अंतरात्मा भूत कैसें स्वामि ।
निश्चळीं चंचळत्वें आह्मी । महद्भूत कैसें जाणावें ॥ २१ ॥
आकाश उपाधींत सांपडलें । ह्मणोनि पांचवें भूत बोलिलें ।
तैसें परब्रह्म मायेंत प्रतिबिंबलें । त्यासी माया ह्मणे महद्भूत ॥ २२
मायोपाधि ईश्वरस्थिति । प्रकृतिपुरुष वेदांतमतीं ।
अनंतनामी जगदीश ह्मणती । अनंतनामें कैसीं जि ॥ २३ ॥
नानादेशभाषालिपिनामें । नाना त्रिगुणगुणें सृष्टिक्रमें ।
अंतरात्मा सर्वांतर्यामें । अनंतनामी जगदीश ॥ २४ ॥
अनंतनामी जगदीश देखिला । अनंतगुणकर्मीं वोळखिला ।
अजपाजप सांगितला । पाहिजे देवें ॥ २५ ॥
अनंतब्रह्मांडीं सोहंस्मरणधर्म । हंससोहं अजपावर्म ।
अनंत जप हा स्वात्मस्वधर्म । आत्माराम सोहंब्रह्म तूं चि तूं ॥२६
आत्माराम साधु ब्रह्मनिष्ठ । सर्व साक्षित्वें वरिष्ठ ।
ब्रह्मनिष्ठांसी साक्षित्व श्रेष्ठ । वृत्तिरूप हें कैस जि ॥ २७ ॥
सर्वधीसाक्षिभूत गुरुसंतमूर्ति । गगनसदृशं ब्रह्म अमुर्ति ।
तुर्या उन्मनी अवस्थातीत राहती । आकाश ब्रह्म सनातन हें ॥२८॥
आकाश शून्य चतुर्विधा पैकिलें ।
अधोर्ध्वमध्यशून्य चतुशून्य बोलिलें ।
शून्याहूनि आकाशरूप कांहीं वेगळें । आहे किं हें सांगा जि ॥ २९ ॥
शून्यावकाश केवळ शून्यरूप । भूतावकाश केवळ भूतरूप ।
आत्मावकाश केवळ आत्मस्वरूप । ब्रह्मावकाश केवळ परब्रह्म ॥३०

परब्रह्मीचें अखंडध्यान । वाधिकीं कैसें राहील अनुसंधान ।
शरीरयोगें मंदबुद्धि होतसे जाण । आत्मबुद्धि कैसी राहेल जि ॥३१॥

पूर्वीं दृढ अभ्यास अध्यात्मश्रवणीं । साधुसंत अखंडस्मरणीं ।
देहबुद्धि जीवबुद्धिविवरणी आत्मबुद्धि ।
मंदबुद्धि कोठून येईल हें ॥ ३२ ॥

नानाबुद्धीसी कर्मशरीर कारण । संत साधु केवळ माहाकारण ।
माहाकारण हि करिती विस्मरण ।
तरि नामस्मण केवि करितातीं ॥ ३३ ॥

नामस्मरण हें ब्रह्मरूप । राम ब्रह्म हें चि सत्यस्वरूप ।
ब्रह्मीं व्यापक अक्षर रामरूप । बृहत्त्वात् ब्रह्म आत्माराम ॥ ३४ ॥

आत्मा ब्रह्मस्वरूप निश्चितीं । आत्मा जीव नव्हे संत सर्वज्ञ ह्मणती ।
तरि जीवासी मोक्ष कैसा सद्गति । देवें निरोपावा ॥ ३५ ॥

अहं जीव कारणदेह अज्ञान । आज्ञानरूप मन संकल्पें बंधन ।
माहाकारणीं पावे मुक्तिस्थान । बंधमोक्ष परब्रह्मीं नाहीं ॥ ३६ ॥

परब्रह्मीं ऐक्य आत्मा ब्रह्मांश । बध्ध मुक्त जीव मनोभास ।
मनोभासासी केवि नाश । देवें निरोपावा ॥ ३७ ॥

मनाहूनि विलक्षण । मनोनाशें आत्मसमाधिलक्षण ।
जहदाजहल्लक्षण । येक घ्यावें येक सांडावें ॥ ३८ ॥

येक सांडावें काय आह्मी । येक घ्यावें काय स्वामि ।
परब्रह्मीं ऐक्य केलें तुह्मी । सांडणें मांडणें निरोपावें ॥ ३९ ॥

अद्वैत परब्रह्म अखंड आहे । संतीं दृश्यजात खंडिलें पाहे ।
उपदेशक्रममात्र बोलून राहे । अनिर्वाच्य तें परब्रह्म ॥ ४० ॥

परब्रह्मीं ज्ञानियाचे अवर्ण भंग जाले ।
ह्मणती विक्षप घेऊनी ब्रह्मलोकीं बैसले ।
पूर्वपक्ष किं हे सिद्धांत बोलिले । देवें निरोपावें ॥ ४१ ॥

ब्रह्मविद् ब्रह्मैव ब्रह्मज्ञानी । विक्षेप मायातीत निर्वाणी ।
त्यांसि बद्ध मुक्त ह्मणती पूर्वपक्षीं अज्ञानी ।
गजपुच्छीं गुंतले सुदृती ॥ ४२ ॥

ब्रह्मणा सह मुच्यंते ह्मणती । उत्क्रामंते जीवासी ऊर्ध्वगति ।
आत्मज्ञाननिर्यांचे लय येथें चि होती ।
ब्रह्मीं ब्रह्मांश हें कैसें जि ॥ ४३ ॥
गगनाकार परब्रह्म । ब्रह्मीं ब्रह्मांश साधु ब्रह्म ।
सप्तभूमिकातीत विमळ ब्रह्म । परब्रह्मीं निमग्न हें ॥ ४४ ॥
ब्रह्मसायोज्य विष्णुसायोज्य । शिवसायोज्य ईश्वरसायोज्य ।
निर्मळनिश्चळब्रह्मसायोज्य । सद्गुरुदेवें सांगावें ॥ ४५ ॥
नाना मतांतरें सायोज्यें । विक्षेप आवर्णरूपें समजे ।
मायाअविद्यातीत वेदांतबीजें । मोक्ष कैवल्य परब्रह्म ॥ ४६ ॥
मोक्ष कैवल्य येक किं काय । जीवाशिवासी कोण विश्रांतिठाय ।
अस्ति भाति प्रिय अन्वय । सच्चिदानंद सांगावें ॥ ४७ ॥
जीवशिवास ईश्वरीं मोक्ष जाला । ईश्वर परब्रह्मस्थिति आला ।
अस्ति भाति प्रिय बोलिला । सच्चिदानंद अनुक्रमें ॥ ४८ ॥
अस्ति भाति प्रिय । सच्चिदानंदपदत्रय ।
त्रिपुटि ग्रासूनि ब्रह्म अद्वय । सद्गुरुनाथें सांगावें ॥ ४९ ॥
सद्नामें आस्त ब्रह्म । चिद्नामें भाति ब्रह्म ।
प्रियनामें आनंदब्रह्म । नामरूपातीत जाणावें ॥ ५० ॥
श्रीरामदास श्रीगुरुसमर्थस्वामी । सद्गुरुनाथ स्वानंदधामी ।
वेणीपरंपरा आत्मयारामी । गिरिधर ब्रह्मीं ब्रह्मरूप ॥ ५१ ॥
इति श्रीआत्मानुभव । वेदशास्त्रींचा स्वानुभव ।
सद्गुरुमुखें ब्रह्मानुभव । संतसज्जनीं विस्तारिला ॥ ५२ ॥
समास नवम ॥ ९ ॥ ॥ ५ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

परब्रह्म चि जालें जग । सुवर्ण चि जालें नग ।
जालें तें गेलें मग । परब्रह्म गेलें कैसें जि ॥ १ ॥
परब्रह्म जग नग जालें चि नाहीं । सुवर्णपणें तूं सुवर्ण चि पाहीं ।
कर्ता कारण कार्य कांहीं । परब्रह्मीं बोलों नये ॥ २ ॥
ब्रह्म चि जालें तंतु पट । ब्रह्म चि जालें मृत्तिका घट ।
ब्रह्म चि सिंधुलहरी सुभट । ब्रह्म जालें गेलें कैसें जि ॥ ३ ॥

परब्रह्म जालें गेलें नाहीं । मृत्तिका घट पट तंतु चि पाहीं ।
स्वानंदजळीं चंचळत्व कांहीं । मायातरंग लक्षूं नये ॥ ४ ॥

ब्रह्म चि दुग्ध जालें दही । तूप थिजलें विघुरलें मही ।
ब्रह्मीं विरक्षण सीतोष्ण कहि । कासयाचें लागलें ॥ ५ ॥

परब्रह्मीं कांहीं च लागेना । माया माईक शबल ब्रह्म कल्पना ।
कर्ताकारणकार्य नाना । विमळब्रह्मीं बोलों नये ॥ ६ ॥

परब्रह्म बीज चि जालें तरू । याचा स्वामि कैसा विचारु ।
बीज फुटोनि निघे अंकुरु । मग बीजत्व कोठें राहिलें ॥ ७ ॥

बीज तरु माया शबलब्रह्म । कार्यकारणकर्तुत्वधर्म ।
कर्ता आधिपत्य ईश्वरवर्म । निजबीज परब्रह्म विरुढेना ॥ ८ ॥

नाना दृष्टांत माहापुरुष बोलिले । जगदाकारें दृष्टांत ब्रह्मीं वर्तविले
ऐक्यभावें दृष्टांत पाहिजेती घेतले । परब्रह्मदृष्टी करूनियां ॥ ९ ॥

परब्रह्मीं पावल्यां दृष्टि । कैंची कोठें जीवसृष्टि ।
जीवशिवसृष्टीची गोष्टी । निराकारीं बोलों चि नये ॥ १० ॥

निराकार चि जालें आकार । याचा स्वामि कैसा विचार ।
आकाराचा होय संव्हार । निराकार कैसें संव्हारलें ॥ ११ ॥

मायाकल्पित नाना आकार । अनाकार तो परमाकार ।
निराकार तो निराकार । आकाशब्रह्म सनातन ॥ १२ ॥

आकाशअंबरीं चित्रलेपलेखन । अंबरमणिकीर्णीं रोहिणिजीवन ।
रज्जुसर्प मायाभास निरूपण । सर्वज्ञदेवें सांगावें ॥ १३ ॥

रज्जुसर्प मायाब्रह्म । सूर्यमृगजळ मायाब्रह्म ।
अंबरचित्र मायाब्रह्म । अधिष्ठान सर्वेश्वर ॥ १४ ॥

अधिष्ठान ब्रह्म किं सर्वेश्वर । जेथूनि मायेचा विस्तार ।
ईश्वर परब्रह्म विचार । सर्वज्ञदेवें सांगावा ॥ १५ ॥

ईश्वर मायेचें अधिष्ठान । ब्रह्मप्रळईं होय निदान ।
ईश्वर मायोपाधि जाण । निरोपाधि सद्वस्तु ॥ १६ ॥

असदाकारितां सद् । जडाकारितां चिद् ।
असुखाकारितां आनंद । सच्चिदानंद ब्रह्म कैसें जि ॥ १७ ॥

सदसद्विलक्षण ब्रह्म । जडचिद्विलक्षण ब्रह्म ।
असुखसुखविलक्षणब्रह्म । सच्चिदानंद ब्रह्म ऐक्यत्वें ॥ १८ ॥
क्षरअक्षरउतमपुरुष येक । किं त्रिविध वेगळाले देख ।
किं कार्य कारण व्याप्य व्यापक । सर्वज्ञरायें सांगावें ॥ १९ ॥
क्षरनाम पुरुषअविद्योपाधि । अक्षरनाम पुरुष विद्योपाधि ।
उत्तमपुरुष तो निरोपाधि । कार्यकारण व्यापूनियां ॥ २० ॥
द्वासुपर्णा दोनि पक्षी असती । जीवशिवपणें विराजती ।
जीव तो शिव ऐसें ह्मणती । तरि येक भोक्ता अभोक्ता कां देवा ॥२१
ब्रह्मीं जीवशिव जेव्हां ऐक्य होय ।
तेव्हां भोग्य भोग भोक्तृत्व जाय ।
येऱ्हवीं जीव अविद्यैक पाहे । भोगिताहे कर्मफळें ॥ २२ ॥
हरिर्दाता हरिर्भोक्ता । तरि जीवशिवासी जाली समता ।
जीवशिव करूनि अकर्ता । सुखदुःखवार्ता कैसी जी ॥ २३ ॥
कर्ता भोक्ता देव अकर्तेपणें । सच्चिदानंद सर्वज्ञपणें ।
किंचितज्ञ जीव अहंपणें । समानकोटि येईना सर्वेश्वरीं ॥ २४ ॥
कर्मसमुच्चय तत्वमाळा । मायादेवी घालोनियां गळां ।
जीवमात्रासी दावी सुखदुःखसोहळा । परब्रह्मग्राम विसरवी ॥२५
बद्धमुक्तविनोद करवी । भवस्वर्ग दाऊनि हरवी ।
सद्गुरुपदीं भिन्नत्व नुरवी । ब्रह्मयोगिणी गुरुकृपा ॥ २६ ॥
प्रपंचबागुल ह्मणे आला । प्रपंचबागुल म्हणे गेला ।
किंचितभयें माता अर्भकाला । दाऊनि करी निवारणें ॥ २७ ॥
अर्भक बवें वाढवावें । अर्भका देखतां आपण जावें ।
मूळमायेचें चिन्ह हे स्वभावें । गुरुकृपें घालावे परब्रह्मीं ॥ २८ ॥
एवं परब्रह्मीं स्थिति संचली । जगदाकारतत्वें माइकें कल्पिलीं ।
सांख्यतत्वें ब्रह्मीं निरसिलीं । तत्वनिरशन मिथ्यत्वें ॥ २९ ॥
ब्रह्म चि विस्तारलें म्हणती सत्यत्वें । वस्तुचीं च जालीं सर्व तत्वें ।
तरि तत्वनिरशन कैसें केलें वस्तुत्वें । सर्वज्ञदेवें सांगावें ॥ ३० ॥
मुख्य नवऱ्याची च मुद केली । नवऱ्यावरूनि वोवाळिली ।
नवऱ्यासगट कुरवंडिली । ऐलें अप्रमाण बोलों नये ॥ ३१ ॥

अनादि ब्रह्म शाश्वत निर्गुणी । अनादि मायातत्वें सगुणी ।
अनादिब्रह्मावरूनि केली वोवाळणी । अनादिमाया माहाप्रळइ ॥३२

स्वामि अनादिमायेचे प्रळय बोलिले । ईश्वरब्रह्मीं सलग्न ठेले ।
मागुति मायोद्भव कोठूनि जाले । सद्गुरुरायें सांगावें ॥ ३३ ॥

अनादिमाया संव्हारली । नास्तिपणें कारण उरली ।
अस्तिपणें पुन्हा चालिली । ईश्वरभर्ता भाऊनिया ॥ ३४ ॥

कर्ता सर्वेश्वर अधिष्ठानी । अस्तिब्रह्मीचा अनुसंधानी ।
नास्तिमायेचा जन्मप्रदानी । कार्यकारणकर्तुत्वें ॥ ३५ ॥

कार्यकारणकर्तुत्व मिथ्या । आहे नाहीं अवघें मिथ्या ।
पराचीं खबुतरें मिथ्या । पर हि मिथ्या परब्रह्मीं ॥ ३६ ॥

वंध्या उदंड लेंकुरें व्याली । वंध्या लेंकुरें भक्षूनि ठेली ।
वंध्या मागुति लेंकुरें प्रसवली । अनिर्वचनिया गुणमाया ॥ ३७ ॥

मायाउद्भव ब्रह्मीं जाले । हेरंबनंदनें डोळां देखिले ।
हनुमंतनंदनें संपूर्ण मोजिले । भीष्मनंदन साक्षिसी ॥ ३८ ॥

नारदनंदनाची माता । भार्गवनंदनाची कांता ।
कार्तिकनंदनाची दुहिता । निरावलंबी माया अवलंबली ॥ ३९ ॥

नरनारायणाचे नंदन । सनकादिकाचे लाविती लग्न ।
गौरिहरि ईश्वरीं माया सलग्न । अस्ति नास्ति मंडपीं विराजे ॥४०

अस्ति माया नास्ति माया । विद्या माया अविद्या माया ।
गौण माया भौक्तिक माया । दुरत्यय माया वैष्णवी ॥ ४१ ॥

व्यापकविष्णूसी शरण येती । वैष्णवी माया गुरुकृपें तरती ।
गगनसदृश परब्रह्म लक्षिती । मायामृगजळ मिथ्यत्वें ॥ ४२ ॥

एवं निर्मळ निश्चळ परब्रह्म संचलें । आकाशशून्य जेथें वोसरलें ।
निरावलंबीं बोहुलें मांडिलें । असंगसंगलग्नासी ॥ ४३ ॥

ब्रह्मीं वाग्शून्य वाग्भट ज्योतिषी । ॐपुण्यालग्न लावी माया ब्रह्मासी ।
मग ॐकार पुत्र जाला तयासी । अर्धनारीनटेश्वर ॥ ४४ ॥

तया सर्वेश्वरासी तीन पुत्र । कार्यकर्ते जाले स्वतंत्र ।
दों दों नेत्रीं देखती विश्व सर्वत्र । तृतीयनेत्रीं विरूपाक्ष ॥ ४५ ॥

अनंतविरूपाक्ष संतसाधु । ब्रह्मचर्यें करिती निर्वाण बोधु ।
बोधापासूनि बोध प्रबोधु । सृष्टिमध्यें विस्तारले ॥ ४६ ॥
कितेक जोडे निर्माण जाले । प्रकृतिपुरुष दिसोनि आले ।
कितेक ब्रह्मचारि राहिले । भीष्म भार्गव सनकादिक ॥ ४७ ॥
हनुमंत नारद हरिहरावतारी । अनंत संत देवावतारी ।
ब्रह्मानुभवें ब्रह्मचारि । परब्रह्म सनातन ॥ ४८ ॥
आदिमध्यअवसान । निर्मळवस्तु समसमान ।
पूर्णब्रह्म पुरातन । संतसाधु सुखमूर्ति ॥ ४९ ॥
संतसाधूचे भक्तिप्रेमविलास । जैसे ईश्वरीचे चिद्विलास ।
किंबहुना तारकब्रह्मविलास । संतसज्जनी स्वानंदघनी ॥ ५० ॥
संत दयाळ सर्वांवरी । ईश्वर बरें वाईट जगीं करी ।
संतसाधु जगदोध्धारी । कर्मानुसारी सर्वेश्वर ॥ ५१ ॥
संत अद्वैतअनुसंधानी । ईश्वर द्वैताद्वैतअभिमानी ।
संत सदैव ब्रह्मनिर्गुणी । गुणागुणी सर्वेश्वर ॥ ५२ ॥
संतीं निरसिली सर्व माया । ईश्वरअंगसंगें नित्य माया ।
ईश्वर न भेटे नाना उपाया । संत भेटती स्वानंदें ॥ ५३ ॥
संतमुखें नामकीर्तन होय । ईश्वरासी नामकीर्तन करितां नये ।
संताचा ईश्वर अंकित पाहे । तिष्ठत राहे कथेमध्यें ॥ ५४ ॥
संताचा ईश्वर मिणधा । मागें पुढें राहे सदा ।
संतासी नाहीं जन्मबाधा । ईश्वरासी जन्म अवतार ॥ ५५ ॥
संत मायातीत ब्रह्म निर्गुणी । ईश्वर मूळमायारूपें बहुगुणी ।
संतासी ईश्वर पहुडवी निरंजनीं । आपण जागृत जगदात्मा ॥५६॥
संतासी ईश्वर देतसे परंधामें । आपण राहातसे माया अनुक्रमें ।
संत साधूसी निःकामकर्मे । ईश्वर सकामें यज्ञमूर्ति ॥ ५७ ॥
संत निर्द्वंद्व देवदैत्यांघरीं । ईश्वर दैत्यातें संव्हारी ।
संत विश्वरूपें देखती श्रीहरि । ईश्वर निजरूपें लपताहे ॥ ५८ ॥
संत साधु केवळ ब्रह्मभोळे । ईश्वर मायानटरूप खेळे ।
संतीं ईश्वर व्यापक देखिले । ईश्वरें भ्रमविले नाना जीव ॥ ५९ ॥

संतासी ईश्वर कर्म लावी । कर्म उपासना ज्ञान मिरवी ।
संताकरितां ईश्वरपदवी । येऱ्हवीं ईश्वर कोण ह्मणे ॥ ६० ॥
संतीं सर्व हि नामरूप केलें । संतीं अनंतासी जन्मा घातलें ।
संतीं ईश्वरासी ब्रह्मत्व दिधलें । जीवशिवास नेलें परब्रह्मीं ॥ ६१ ॥
संत साधु परब्रह्ममूर्ति । मूर्ति पाहतां मूर्ति अमूर्ति ।
पुण्यपावन पवित्रकीर्ति । आत्माराम जगद्गुरू ॥ ६२ ॥
श्रीरामदास श्रीगुरुसमर्थस्वामी । सद्गुरुनाथ स्वानंदधामी ।
वेणीपरंपरा आत्मयारामी । गिरिधर स्वरूपीं निर्धारें ॥ ६३ ॥

इति श्रीआत्मानुभव । वेदशास्त्रांचा स्वानुभव ।
सद्गुरुमुखें ब्रह्मानुभव । संतसज्जनीं विस्तारिला ॥ ६४ ॥
समास दाहवा ॥ १० ॥ ॥ ॐ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

दैवी माया निवारी कोण । माया चि माया निवारी आपण ।
ब्रह्मत्वें चि ब्रह्म परिपूर्ण । अंगें चि आलिंगन अंगालि ॥ १ ॥
ब्रह्मैवाहं साधुसंत ह्मणती । अहमाकार माया आली वृत्ती ।
अंतीं मति ते चि हे गति । आत्मगति केली जि ॥ २ ॥
ब्रह्मैवाहं ब्रह्माकारस्थिति । अहमाकार गेली वृत्ती ।
अंतीं मति ते चि ते गति । गति अवगति विलक्षण तूं ॥ ३ ॥
अंतकाळीं हरिस्मरणें । कळिवर मुक्त जन्ममरणें ।
द्रव्यदारादिकें संसरणें । पदार्थनिरसन केलें जि ॥ ४ ॥
पदार्थवस्तु नाशवंत । सर्वांतर्याम श्रीभगवंत ।
सर्वत्रांसि मानूनि अंत । अंत अनंत लक्षावा ॥ ५ ॥
अंत अनंत पूर्वीं च लक्षिला । सारासारविचार पाहिला ।
आत्मारामीं ध्यास लागला । निजध्यास स्वस्वरूपीं ॥ ६ ॥
अजन्म केला जो अभ्यास । तो चि अंतीं निजध्यास ।
रामरामस्मरण सावकाश । नाहीं अवकाश विस्मरणीं ॥ ७ ॥
कंठमर्याद जेऊनि निजेला । तो काय निजतृप्ति विसरला ।
आत्मतृप्ति संतृप्त ठेला । तो काय विसरला आत्माराम ॥ ८ ॥

सद्गुरुकृपेचा निवाडा । स्मरणाविस्मरणातीत धडा ।
गुरुकृपेचा तूं ज्ञानी निधडा । आत्मारामीं आराम तूं ॥ ९ ॥
बहुश्रवण बहुशंका । बहुचर्चा बहुआशंका ।
बहुशास्त्र मतिपंका । माजि आकाशब्रह्म अलिप्त तूं ॥ १० ॥
येकांत राम तूं निर्धारीं । येकपणासी तूं अंत करीं ।
येकांतीं गलबल मनोवृत्ति विवरी । मनसाक्षी आत्मा तूं बापा ॥ ११
स्वामि मज रंका अर्भकातें । वारंवार बापा बापा समर्थें बोलिजेतें
याचा भावगर्भ न कळे मातें । श्रीगुरुदेवें सांगावा ॥ १२ ॥
बापा तुझिया सद्भावगर्भी निजरूप आपुलें ।
सद्गुरुस्वरूप भावातीत संचलें ।
ह्मणउनि बापा बापा अनुवादलें । वारंवार आह्मी ग्रंथार्थीं ॥ १३ ॥
स्वामि मी हि श्रीगुरु ताता ताता । अनुवाद करितसें सर्वथा ।
तत्त्वमसि तत्वार्थ तुह्मी देतां । अततीति आत्मा ताता जि ॥ १४॥
समर्थासी मी योगनिद्रा लागों देइना ।
आशंका आक्षेप प्रश्न करितसे नाना ।
संत ह्मणताती किती करिसी वागवल्गना । अनिर्वाच्यस्वामीपुढें ॥
ऐक बापा शिष्या सुभद्रा । तुझें बोलणें माझि योगनिद्रा ।
बोलण्यामाजि अबोलणी अगोचरी मुद्रा ।
तुजसहित पहुडें मी निरंजनीं ॥ १६ ॥
स्वामि अंतर्भावीं बोलिला निश्चितार्थ । श्रीमुखावरी खासी यथार्थ ।
याचा श्रीमुखें गुरुवाक्यभावार्थ । समर्थदेवें सांगावा ॥ १७ ॥
बापा श्रीमुखवरें तूं खंब्रह्म असशी । श्रीमुखावर खासी निश्चयेंसिं ।
श्रीगुरुवाक्यार्थ सांगितला तुजसीं । तूं अखंड मजसीं अभिन्न ॥१८
स्वामीनें जा परतें अज्ञानाऐसें बोलिलें ।
जा परतें भूताऐसें अनुवादलें ।
आशिर्वचन किं गाळिप्रदान दिधलें । समर्थदेवें सांगावें ॥ १९ ॥
बापा खंशून्य अज्ञानापरब्रह्म तूं । जा परतें भूताभूताहूनि वर तूं ।
गाळिप्रदानी परब्रह्म चि तूं । अनिर्वचनी आशिर्वचन ॥ २० ॥

अहंतानिशीं गाळिप्रदान । गाळिप्रदानीं ब्रह्मपददान ।
मंत्रमूळ गुरुवाक्य यथार्थ जाण । अन्यथाभाषण गुरुमुखीं नाहीं ॥२१
स्वामी अनादिमायाकुतर्क मूळ हरावें । स्वस्वरूपीं मीपण नुरावें ।
आदेश शून्य माझें करावें । गुरुदेवें उरावें सनातन ॥ २२ ॥
अनादिमायाकुतर्क तुज कळले । तेव्हां चि तुजहूनि वेगळे गेले ।
नानामायाविकार महद्भूतें ग्रासिले । महद्भुतापरतें परब्रह्म तूं ॥२३॥
स्वामि भूत ह्मणतां मनुष्यातें । विषाद वाटतो सर्वांतें ।
मा तो जगजनक परमात्मा त्यातें । महद्भूत कैसें ह्मणावें जि ॥२४
बापा महद्भूत अवश्य म्हणावें । प्रकृतिपुरुषरूप जाणावें ।
खुणेनें खुणेसी बाणावें । निर्मळ निश्चळ परब्रह्मीं ॥ २५ ॥
स्वामि माया कारण शास्त्रीं परब्रह्म । लटिके वंध्येचें जन्मकर्म ।
कार्यकारणकर्तृत्वधर्म । मायेचे किं ब्रह्मीचे ॥ २६ ॥
बापा परब्रह्म निर्मळ निश्चळ । अनादि ईश्वर माया कारण केवळ ।
कार्यकारणाचा विवेक सकळ । भूतापरता नाहीं रे ॥ २७ ॥
पंचभूतापरतें परब्रह्म येक । चहुभूतां वडिल महद्भूत देख ।
त्रिगुणगुणाचें अधिष्ठान सम्यक । चंचळ कर्ता सर्वेश्वर ॥ २८ ॥
स्वामि असंग ब्रह्मासी जडविती संग । आकाशीं उमटविती तरंग ।
अभंगासी भंगविती बाह्यरंग । निश्चळीं चंचळतरंग कैसे जि ॥२९
बापा केवळ शुद्धब्रह्म चंचळत्वा आलें ।
ऐसें कदापि संतीं नाहीं बोलिलें ।
शबळब्रह्मीं संतीं चंचळत्व कल्पिलें । जगदाकारें तरंगवत ॥३०॥
स्वामि ऐसें कोणाच सामर्थ्य आहे ।
गगन ब्रह्मडोहीं तरंग उठवील पाहे ।
नास्ति शून्य गगनासी वायु हालऊं न लाहे ।
मा अस्ति ब्रह्मासी माया डहुळील कैसी ॥ ३१ ॥
बापा धन्य तुझी गुरुकृपेची दृष्टि । आस्ति भाति प्रिय परब्रह्म वोष्टि ।
कैंची कोठें ब्रह्मीं सिंधुलहरीतरंगसृष्टि । मायामय हे कल्पना ॥ ३२
स्वामि गगनब्रह्मीं तंतु कल्पिले । ओतप्रोत आडवे उभे गुंफिले ।
गगन गमनशून्य संत अनुभवले । ओतप्रोत बोलिले कैसे जि ॥३३

वोतप्रोत माया माईक भ्रांति । परब्रह्मीं पावे मूळमाया शांति ।
पूर्वपक्ष संत निरोपिती दृष्टांतीं । सोनें अळंकार जगदाकारें ॥३४॥
स्वामि जगनगजायमानअवयव । गगनब्रह्म अस्ति भाति निरावयव।
थिजलें विघुरलें तूप सावयव । परिणाम ब्रह्मीं कैसे जि ॥ ३५ ॥
बापा किती पुससी खोदखोदुनि । पूर्वपक्ष माया शोधशोधुनि ।
परब्रह्म होई बोधबोधुनि । नाना हेतु दृष्टांत सारूनया ॥ ३६ ॥
स्वामि दृष्टांतनौकेंत बुडणें तरणें ।
मज आत्मकासेसी लाऊनि हातीं धरणें ।
मायाजर्जरनौका मज न माने । श्रीगुरुनमनें नमिन मी आत्मा ॥३७॥
श्रीगुरुनमनें नमन तूं आत्मा । परंतु ह्मणे नको तूं मी आत्मा ।
हंस सोहं ह्मणतां तो मी आत्मा । अहंकृति तुर्या उपजेल ॥ ३८ ॥
स्वामि अहंभावाचें होयना निर्शन । मजला पाहिजे गुरुदेवदर्शन ।
श्रवण कीर्तन नवविधाभजन । संतसज्जनसमागम ॥ ३९ ॥
बापा संतसमागमाचा विचार करिजे ।
आगमनिगमार्थ सिद्धांत ज्ञाणिजे ।
जेथीलतेथें तत्व निवेदिजे । तत्वातीत होईजे तत्वता वस्तु ॥४०॥
स्वामि तत्वता वस्तु मजला न कळे । पुसणें सांगणें जाणणें निवळे ।
जाणीव देवा माझी न गळे । साधनसंपति मज व्हावी ॥ ४१ ॥
साधनसंपति आजन्म असो । विद्या अविद्या ब्रह्मीं निरसो ।
पंचीकरण तुजला सानकुळ वसो । महावाक्यप्रवेशनीं ॥ ४२ ॥
स्वामी पंचिकर्णें मज आजन्में पुरवलीं ।
माहावाक्यें माझीं श्रीगुरुपाउलीं ।
अहं ब्रह्मास्मिबोधें सद्गुरुनाथमाउली ।
भिन्न किं अभिन्न मी सांगावें ॥ ४३ ॥
बापा उपदेशक्रमीं तूं ब्रह्म मी ब्रह्म । ऐक्यभावीं केवळ ऐक्य ब्रह्म ।
निर्मळ निश्चळ परब्रह्म । ब्रह्मीं ब्रह्मपण बोलों नये ॥ ४४ ॥
स्वामि बोलणें चालणें अखंड लागलें ।
पुसणें सांगणें हितगुज आतुलें ।
बोलण्यामाजि अबोलणें केलें । पाहिजे मजला गुरुदेवें ॥ ४५ ॥

अनिर्वाच्य ब्रह्मीं बोलणें नाहीं। अनिर्वाच्य ब्रह्म तूं चि तूं पाहीं।
ब्रह्मेव ईश्वरीं ध्यास मात्र कांहीं। ईश्वर विलयो परब्रह्मीं ॥ ४६ ॥
ईश्वरें अधिष्ठान ब्रह्मीं टाकिलें। मागुती ईश्वरत्व कैसें जि आलें।
ईश्वरब्रह्मीं पुन्हा मायाभान उभें राहिलें। किंवा नाहीं सांगावें ॥४७
ईश्वर परब्रह्मीं योगनिद्रा पावला। स ईक्षत माया जागृति आला।
परि अखंड जयाचा येकांत ब्रह्मीं मोडला। नाहीं च कदा ॥ ४८ ॥
ईश्वर ब्रह्मीं मायाइक्षण कांहीं। तरि भक्त मुक्त देवें केले किं नाहीं।
देवभक्त पुन्हा पुनरावृत्ति पावले देहीं। जन्ममरण भोगावया ॥४९
बापा जन्ममरणाची वार्ता। देवासी लागेना सर्वथा।
देव अमर ज्याची सत्ता। त्यासी जन्ममृत्यु कैसेनि ॥ ५० ॥
जुनाटपुरुष बहुता काळाचा। अंत न लगे अनंत आयुष्याचा।
तेथें भक्त मुक्त आलपायुर्ष्य साचा। ईश्वरब्रह्मीं निमग्न ॥५१॥
ईश्वरब्रह्मीं सदैव येकांत। भक्तासी दिधल्या येकपणा अंत।
निर्मळ निश्चळ ठेविले नितांत। निरंजना हि पैलिकडे ॥ ५२ ॥
ईश्वरीं मायाभान मिथ्यत्वें कांहीं। यामा माया निषेध वाक्य पाहीं।
मरीचमृगजळ असोनि नाहीं। सच्चिद्भानु सर्वेश्वरीं ॥ ५३ ॥
ईश्वरभानुआंगीं सद्गुरुराया। मरीचमृगांब आहे किं माया।
ईश्वरीं माया न जाय किं विलया। सद्गुरुनाथें सांगावें ॥ ५४ ॥
आदित्यसर्वेश्वरीं ऐक्यब्रह्म व्हावें।
मग मायामृगजळ आहे नाहीं पुसावें।
उरवर भूमीस मृगजळ दिसावें। पशुबुद्धीसी जीवबुद्धि ॥ ५५ ॥
पूर्वपक्षाचें निरूपण। सिद्धांतीं कैसें होय प्रमाण।
सर्वप्रमाणातीत पूर्ण। ब्रह्म परिपूर्ण सच्छिष्या ॥ ५६ ॥
अविद्या विद्यमान मानिती अविचारें।
परब्रह्मीं मायाभान अरोपिती खरें।
लटिकें वांजेचीं लाहानथोरें लेकुरें। साच दिगंबरें खेळविलीं ॥५७
मिथ्या रज्जूचा केला भयानक सर्प। कल्पांसी नाहीं त्याचा दर्प।
ईश्वरीं माया काम कंदर्प। हिमालय ब्रह्मीं भस्मला ॥ ५८ ॥

ह्मणोनि सर्वेश्वरीं शरण जावें । सद्गुरुपदीं अनन्य व्हावें ।
योसि सोसि ब्रह्म तूं स्वभावें । श्रीगुरुबोधें अखंडित ॥ ५९ ॥
सद्गुरुस्वरूप सनातन जैसें तैसें । माहावाक्यविवरणें कळे आपैसें ।
कैंचें कोठें पंचीकरणपिसें । आत्माराम निरंजनी ॥ ६० ॥
श्रीरामदास श्रीगुरुसमर्थस्वामी । सद्गुरुनाथस्वानंदधामी ।
वेणीपरंपरा आत्मयारामीं । गिरिधर स्वरूपीं निमग्न ॥ ६१ ॥

इति श्रीआत्मानुभव । वेदशास्त्रींचा स्वानुभव ।
सद्गुरुमुखें ब्रह्मानुभव । संतसज्जनीं विस्तारिला ॥ ६२ ॥
समास अकरावा ॥ ११ ॥ ॥ ७ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

ब्रह्मज्ञानेवीण उपदेश । तो ह्मणों नये विशेष ।
सर्वां सर्वत्र मंत्रोपदेश । ब्रह्मोपदेश कैसा जि ॥ १ ॥
तारकब्रह्म मंत्रोपदेश । मंत्रार्थ पाहतां ब्रह्मोपदेश ।
राम तारकब्रह्म विशेष । श्रुति गर्जती वाक्यार्थें ॥ २ ॥
स्वामि श्रौतस्मार्तांचा कैसा विचार । आश्रमधर्म पुत्रव्यवहार ।
सन्यासग्रहण निर्धार । गुरुसंप्रदायें सांगिजे ॥ ३ ॥
श्रद्धापत्नीसी ब्रह्मचर्यें असणें । प्राणाग्निहोत्र ज्ञानयज्ञिं विवरणें ।
येकांतसेवनीं वानप्रस्थ धरणें । आत्मसन्यास करणें विचारें ॥ ४ ॥
आधीं लक्ष द्रव्यसंग्रह स्वतंत्र । शुद्धत्रिगुणवेवहारीं सत्पुत्र ।
सद्बुद्धिकांता परमपवित्र । ज्ञानाग्निहोत्र सर्वदां ॥ ५ ॥
साधुसंतवसंतमासीं संपूर्ण । दर्शपूर्णमास्यें दर्शनें पूर्ण ।
नानापशुमालभ जीव परिपूर्ण । ब्रह्मसंतर्पण ब्रह्मानंदें ॥ ६ ॥
योगदीक्षें दीक्षित राहावें । यज्ञमंडपीं विन्मुख न व्हावें ।
अवभृतस्नान त्रिवेणी करावें । जगदोद्धारणीं संपूर्ण ॥ ७ ॥
भवस्वर्गीं उदास होणें । आत्मसन्यास सुखें घेणें ।
कर्मसन्यास सदां विवरणें । कर्मत्यागें फळत्यागें ॥ ८ ॥
स्नानसंध्या जपध्यान देवार्चन । विध्योक्तभोजन ग्रंथलेखनशोधन ।
श्रवणकीर्तन निर्विकल्पशयन । निःकामभजन गुरुकृपा ॥ ९ ॥

सद्गुरुकृपें ब्रह्मसपन्न जाले । मग सन्यासग्रहणीं कां जि प्रवर्तले ।
आदिगुरु कां जि उपेक्षिले । श्रीपादगुरु लक्षूनियां ॥ १० ॥
आदिगुरुसी कोण्हि विन्मुख जाले । बहिरंग कोण्हि संपादिले ।
किंचित भोग प्रारब्धयोगें घडले । आश्रमधर्मे करूनियां ॥ ११ ॥
धर्मस्थापनेचे नर । केवळ विष्णूचे अवतार ।
विष्णूसी येणें वारंवार । साधूसी येणें जाणें कैसें जि ॥ १२ ॥
साधूसी येणें जाणें नाहीं । मायामय हें निरसिलें पाहीं ।
जेथीलें तेथें निवेदिलें सर्व हि । ब्रह्मीं ब्रह्म चि साधुजन ॥ १३ ॥
स्वामि ब्रह्मीचें कैसें अनुसंधान । कैसें समाधिसमाधान ।
कर्मउपासना मूर्तिध्यान । नित्यनैमित्य लागलें ॥ १४ ॥
नाना देशकाळवर्तमान । सुखदुःखभोग मानापमान ।
लाभालाभीं समसमान । ब्रह्मानुसंधान कैसें जि ॥ १५ ॥
नानादुर्जनसंग अवचिता होतां । सज्ञनसमाधिसुख हारपे तत्वता ।
सत्संग निरंतर धरूं जातां । विध्योक्तकर्मै करविती ॥ १६ ॥
बापा कर्म उपासना ज्ञान विवरणें ।
मनाच्या माथां सर्वस्व धर्माचरणें ।
आपण मनातीत सर्वदां राहणें । आत्माराम निरंजनी अनुसंधानी ॥
आपण वस्तु स्वतसिद्ध देख । क्षणक्षणा पाहाणें आत्मविवेक ।
फळाचें फळ स्वयें कोण्हियेक । अनुसंधान ब्रह्मींचें सांगितिलें ॥
निर्विकल्पतरूचें फळ । मजला द्यावें जि ब्रह्म रसाळ ।
परब्रह्मीचा विचार सकळ । देवें प्रांजळ सांगावा ॥ १९ ॥
सद्गुरुनाथें बोलिलें केवळ । अचंचळब्रह्मीं भासलें चंचळ ।
प्रकृतिपुरुषनामें सकळ । स्त्रीलिंग पुल्लिंग वाखाणिलीं ॥ २० ॥
नाना नपुंसकें चंचळें नामें । त्रिविध बोलिलीं सृष्टिक्रमें ।
निश्चळब्रह्मीं चंचळवर्मै । मूळपुरुष मूळप्रकृति ॥ २१ ॥
आदिपुरुष आत्माराम । निर्मळ निश्चळ परब्रह्म ।
प्रकृतिपुरुष चंचळवर्म । निश्चळ ब्रह्मीं कैसें जि ॥ २२ ॥
प्रकृतिपुरुषाचा संयोग ब्रह्मीं ।
किंवा अनादिप्रकृतिपुरुषें गुणनामकर्मीं ।
नामरूप धरूनि सृष्टिधर्मीं । ब्रह्मावेगळीं च वर्तती ॥ २३ ॥

बापा बरें पुसिलें निर्मळ निश्चळ ।
तेथें प्रकृतिपुरुषाचा संयोग केवळ ।
प्रकृतिकरितां नामरूप सकळ । पुरुषनाम पडलें परब्रह्मीं ॥ २४
परब्रह्मीं नाहीं जाणणें नेणणें । ईश्वर कर्तार सर्वज्ञपणें ।
सत्ताचैतन्यसाक्षी बोलणें । अनादिमायागुणधर्में ॥ २५ ॥
आदिपुरुष येक परब्रह्म । प्रकृतिपुरुषईश्वरधर्म ।
आदि अनादि मुख्यवर्म । कळलें पाहिजे ॥ २६ ॥
नानामहेंद्रधनुष्यीं अगुणी । गडगर्जना दिसे गगनीं ।
तैसें परब्रह्म निर्गुणी । प्रकृति सगुणी गर्जतसे ॥ २७ ॥
करूनि अकर्ता पुरुष निश्चिती । कार्यकारणकर्तुत्व हेतु प्रकृति ।
कर्ता भोक्ता ईश्वरस्थिति । करणें भोगणें प्रकृतिगुणें ॥ २८ ॥
निरोधवायु गगनीं अभिन्न । प्रकृतिपुरुषें तैसीं अभिन्न ।
लिप्त अलिप्त भिन्नाभिन्न । वायु जाणीव मूळमाया ॥ २९ ॥
स्वामि वायोप्रकृति जाणीव ईश्वर । शास्त्रीं बोलिला हा विचार ।
येथें माया जाणीव केला निर्धार । सर्वज्ञ ईश्वर काय जाला॥३०॥
बापा सर्वज्ञ ईश्वर आहे खरें । जाणीव माया यकदेशी निर्धारें ।
तुर्यातुर्यु सर्वेश्वरविचारें । ज्ञानविज्ञानदाता परमगुरु ॥ ३१ ॥
स्वामि गुरुगीतार्थें गुरुपदब्रह्म । क्षराक्षरातीत परब्रह्म ।
उत्तमपुरुष विमळब्रह्म । सर्वसाक्षित्व कैसें सर्वेश्वरीं ॥ ३२ ॥
सर्वेश्वरीं दोनि भेद । निजरूप पाहतां ब्रह्म अभेद ।
मायानिर्शनीं सद्गुरुब्रह्मपद । मायादर्शनीं सर्वेश्वरु ॥ ३३ ॥
ईश्वर माया लपवी दाखवी । नानानाटकमाया लाघवी ।
नाना अवतार धरूनि मानवी । दैवी संपत्ति रक्षितसे ॥ ३४ ॥
दैवी संपतीचे दोनि भेद । येक स्वर्गकाम पुण्यक्षय प्रसिद्ध ।
येक अजरामर ब्रह्म विशद । मोक्षकैवल्य परब्रह्म ॥ ३५ ॥
परब्रह्म स्वामि मी होईन कैसा । देह मी जीव मी भास ऐसा ।
मनमाया आभास तैसा । मृगजळें जैसा देखतसे ॥ ३६ ॥
बापा अनादिमाया अभ्रछाया । सूर्य मयंक गगनीं लोपुनि वायां ।
निश्चळ ब्रह्मीं चंचळ थाया । पुरुषनाम माया ठेवितसे ॥ ३७ ॥

स्वामि घटोदकीं गगनचंद्रभानु । लिप्त किं अलिप्त काय मानूं ।
कस्तुरीकेसरगोमयस्नानु । सुगंधदुर्गंध लागला कोणासी ॥३८॥
बापा सुगंधदुर्गंध कालवला उदकासी ।
सुखदुःखभोग लागला जीवासी । मुख्य बिंबासी ना प्रतिबिंबासी।
आत्मयासी ना आत्मयारामी ॥ ३९ ॥
स्वामि सुखदुःख जाणता जीव । तैसा चि निरोपिला सदाशिव ।
संभवामि युगे युगे बोलिला देव । सुखदुःख देवा लागलें किं ॥४०
बापा मायामय हें देवें बोलिलें । वैष्णवी मायारूप निरूपिलें ।
मम माया दुरत्यया अनुवादलें । मायातीत केलें शरण येतां ॥४१॥
मी जीव मज बंधन । मज आहे जन्ममरण ।
केल्या कर्माचें फळ आपण । भोगीन जीवाचा संकल्प ॥ ४२ ॥
संकल्पविकल्प जीवरूप मन । मनमाया यथार्थ जाण ।
मनरूप तुर्या विलक्षण । समाधिलक्षण परब्रह्मीं ॥ ४३ ॥
मन तो विष्णु सांगितला स्वामि । मनरूप उपासना ऐकिली आह्मी।
मनमाया जेव्हां निरोपिली तुह्मी ।
तेव्हां उपासना कैसि मायारूपें ॥ ४४ ॥
बापा कर्मउपासनाज्ञान । द्वैतअद्वैतनिरूपण ।
मायायोगें देवभक्तपण । हरिसंकल्प उपासना ॥ ४५ ॥
सर्वज्ञ देवे देवांश मन । येकदेशी जालें क्षीण ।
मन पावतां उन्मन । अवस्थानिरासें शुद्धात्मा ॥ ४६ ॥
शबल माया विद्या अविद्या तत्वता । निश्चळब्रह्मीं नाहीं वार्ता ।
बिंबीं प्रतिबिंबीं ग्रहणकथा । किं विश्वचक्षूसी हें विचारिजे ॥४७॥
अध्यात्मज्ञान बरें जाणिजे ।
अध्यारोप अपवाद स्थूळसूक्ष्म विवरिजे ।
आदिअनादिरूप समजिजे । तत्वातीत होईजे तत्वताब्रह्म ॥ ४८ ॥
विद्या अविद्या आरिसे दोन्हि । मळिन सोज्वळ मुख देखणि ।
पाहतें पाहणें सारूनि निजात्मदर्शनीं ।
जें आहे तें आहे स्वतःसिद्ध ॥ ४९ ॥
मुळीं आत्माराम तूं शुद्धबुद्ध । निर्मळ निश्चळ सदोदित शुद्ध ।
भेदाभेद विवरूनि अभेद । योसि सोसि ब्रह्म चि तूं ॥ ५० ॥

जरि तुज नोहे ब्रह्मानुभव । तरि पाहिला चि पाहे आत्मानुभव ।
सद्गुरुकृपें शुद्ध स्वानुभव । अध्यात्मश्रवणीं पावसी ॥ ५१ ॥
नाना धन संपत्ति लक्ष्मी दीप । मावळतां बैसे धनि सर्प ।
ज्ञानसंपत्ति न पाहतां आप । अहंतादर्पे पावसी ॥ ५२ ॥
श्रीपादस्वयें नारायण । अखंड करी वेदांतश्रवण ।
विचारवंत सन्यासी तूं हि आपण । गुरुकृपा पूर्ण विचारी बा ॥
त्रिविधप्रचीति संविति भानु । येक चि आत्माराम सच्चिदानंदघनु ।
जैसा त्रिसंधे सविता सुभानु । येके चि गगनीं खंब्रह्मीं ॥ ५४ ॥
स्वामि ॐकार ॐनामें देवें सिकविलें ।
बावनमात्राफाळोले संपविले ।
आतां येकीं येक अकरा अंक सांगितले । पाहिजे देवें ॥ ५५ ॥
ऐक येक परब्रह्म दुसरी माया । तीन गुण चतुष्टय काया ।
पंचतत्वें शिष्यराया । षड्गुणसंपन्न सर्वेश्वर ॥ ५६ ॥
सप्तभूमिका साधनधर्मी । अष्टदेह सारूनि उर्मी ।
नवविधाभक्ति स्वधर्मी । येकावरुतें शून्य हें ॥ ५७ ॥
येकीं येक ऐक्य ब्रह्म । गुरुशिष्य दोन्हि परब्रह्म ।
येकादश हें अंकवर्म । सहजसमाधि सांगितलें ॥ ५८ ॥
स्वामि मज असंप्रज्ञातसमाधि नाहीं । संप्रज्ञात मी भक्तियुक्त पाहीं ।
नवविधाभक्तियोग आचरे कांहीं । मुक्तदशा मजला कैसि जि ॥
बापा जीवन्मुक्त तूं जगदोद्धारी । सचेतन तूं परोपकारी ।
अचेतन साधु निर्विकारी । विदेह मुक्त श्रीमंत ते ॥ ६० ॥
नित्यमुक्त ते योगेश्वर । पाहतां केवळ सर्वेश्वर ।
लोकानुग्रही परमेश्वर । लीलाविग्रही श्रीराम ॥ ६१ ॥
आदिनारायण आदिपुरुष । हरिहरविधि पूर्ण ब्रह्मांश ।
ब्रह्मीं ब्रह्मांश ते विपुळांश । स्वसंवेद्य जगद्गुरु ॥ ६२ ॥
आदिगुरूसी कोणाचें गुरुत्व नाहीं ।
स्वस्वरूपीं विस्मरण न पडे कांहीं ।
परब्रह्मीं ब्रह्मरूप पांहीं । अखंडयोगें स्वातंत्र तें ॥ ६३ ॥

स्वामी मज परतंत्राची चिंता । निरंतर असो द्यावी जि भगवंता ।
जीवन्मुक्त मी श्री अनंता । परब्रह्म कई होईन जि ॥ ६४ ॥
जीवशिवउपाधि ज्ञानें सरली । तेव्हां च अखंडता तुज ब्रह्मीं जाली ।
घटमठमहद् चिद् माया गेली । आकाशब्रह्मीं ब्रह्म चि तूं ॥ ६५ ॥
काया काशी आत्मा विश्वेश्वर । तारकब्रह्म गुरुसर्वेश्वर ।
जीवदशेसी मरण आलें सुंदर । अंतकर्णीं मनकर्णीं ॥ ६६ ॥
त्रिवेणीस्नान पूर्वीं च जालें । पूर्वजदेहीं गयावर्जन केलें ।
कैवल्यदेह मुक्तपुरीसी आलें । आलें गेलें निरसोनियां ॥ ६७ ॥
मागें परति कांहीं च नाहीं । यद्गत्वा हें स्मृतिवाक्य पाहीं ।
षोडशवाक्यीं वाक्यार्थीं राहीं । षोडशकळीं येक चि प्रभा ॥६८॥
आत्मसंन्यासी विचारवंत । तद्रूपत्वें श्रीभगवंत ।
नरनारायण हे श्रीमंत । मोक्षश्रिया विराजती ॥ ६९ ॥
मोक्षमुक्ति द्वारीं तिष्ठती । भवस्वर्ग गुरुपदीं कुरवंडिती ।
संतसज्जन स्वानंदें तोषती । आगमनिगमगुह्यार्थें ॥ ७० ॥
श्रीरामदास श्रीगुरुसमर्थस्वामी । सद्गुरुनाथ स्वानंदधामी ।
वेणीपरंपरा आत्मयारामी । गिरिधर ब्रह्मीं ब्रह्मानंदें ॥ ७१ ॥

इति श्री आत्मानुभव । वेदशास्त्रींचा स्वानुभव ।
सद्गुरुमुखें ब्रह्मानुभव । संतसज्जनीं विस्तारिला ॥ ७२ ॥
समास बारावा ॥ १२ ॥ ॥ ७४ ॥

---

॥ श्रीराम ॥

येक परब्रह्म सद्गुरु स्वामि । ईश्वरत्व कोठून परब्रह्मीं ।
ईश्वरमायोपाधि ब्रह्मीं । वेदशास्त्रीं निर्धारिलें ॥ १ ॥
परब्रह्म निरुपाधि । परब्रह्मीं ईश्वरउपाधि ।
ईश्वरापासूनि दोनि उपाधि । माया अविद्या निर्धारें ॥ २ ॥
माया अविद्या मिथ्यामय । ईश्वरत्व मिथ्या ह्मणतां नये ।
शाश्वत ब्रह्म दावी स्वयें । कर्ता भर्ता प्रभु साक्षी ॥ ३ ॥
कर्ता भर्ता प्रभु साक्षी । अनंत नामें पूर्वपक्षीं ।
परब्रह्म सिद्धांत लक्षी । केवळ निर्गुण निरंजन ॥ ४ ॥

निर्गुण निरंजन जाले ईश्वर । किंवा अनादि सिद्ध हा सर्वेश्वर
कर्ताकर्तेपण परमेश्वर । स्वतंत्रपणें अनादि ॥ ५ ॥
अनादिसिद्ध परब्रह्म । अनादिमाया भास भ्रम ।
अनादिईश्वरआभाससंभ्रम । सम्यकभ्रम सर्वेश्वर ॥ ६ ॥
सम्यकभ्रम सर्वेश्वरु । सर्वज्ञ ज्ञानघन कर्ता ईश्वरु ।
आदिपुरुष श्रीपरमेश्वरु । नामरूपधर्ता हा ॥ ७ ॥
नामरूपधर्ताभर्ता । सर्वेश्वरु स्थितिलयकर्ता ।
परब्रह्मीं स्थितिलयवार्ता । बोलों नये मायावी ॥ ८ ॥
माया अविद्या अनादि यंत्र । उत्पतिस्थितिलयकाळतंत्र ।
स्वतंत्र कैंचें काळसूत्र । ईश्वराधीन सर्व हें ॥ ९ ॥
ईश्वरमाये आंगीं त्रिगुण । मूळमायेपासूनि जनन ।
चुंबकसंगें लोह चळण । ईश्वरसंगें चराचर ॥ १० ॥
चुंबक परब्रह्म किं ईश्वर । जेणें चळतें चराचर ।
ईश्वर चुंबक प्रभाकर । प्रभा सत्ता चाळक हें ॥ ११ ॥
सूर्यदीप्ती सूर्या आंगीं । ईश्वरमाया ईश्वरसंगीं ।
ईश्वरी सत्ता सर्वांगीं । परब्रह्म केवळ निस्संग ॥ १२ ॥
निःसंगासी लाविती संग । ब्रह्मीं कल्पिती माया अंग ।
परब्रह्म केवळ असंग । माया आरंग सर्वेश्वरु ॥ १३ ॥
सर्वेश्वर तो रमाकांत । सर्वेश्वर तो उमाकांत ।
रमाकांत उमाकांत । भिन्नाभिन्न निर्धारें ॥ १४ ॥
भिन्नाभिन्न त्रिगुणाकारें । भेद अभेद धरणें ईश्वरें ।
मुळीं पाहतां निर्धारें । अभिन्न येक हरिहर ॥ १५ ॥
हरिहर गुणांत सांपडले । हरिहर मुळपुरुष बोलिले ।
मुळपुरुष चि गुणासी आले । गुणमई माया भर्तारु ॥ १६ ॥
गुणमई माया विकारी । नाना विकार उठवी मतांतरीं ।
शिवपाषांड विष्णुपाषांड निर्धारीं । मुळपुरुषासि विन्मुख हे ॥१७
मूळपुरुषीं पडल्या दृष्टि । भेद उडे सर्व हि सृष्टि ।
अभेद हरिहर सारांत गोष्टि । परब्रह्मीं ब्रह्म चि हे ॥ १८ ॥
ब्रह्मीं ब्रह्म चि विष्णु जैसे । ब्रह्मीं ब्रह्म चि शिव तैसे ।
ब्रह्मीं ब्रह्मांश जीव ऐसे । सद्गुरुकृपें निर्धारें ॥ १९ ॥

गुरुपदीं निरसे मायाभ्रम । पूर्ण अपूर्ण मायासंभ्रम ।
पूर्णा अपूर्णातीत मुख्य वर्म । परब्रह्म जाणावें ॥ २० ॥
परब्रह्मीं ब्रह्मांश आह्मी । तरि का संदेह धरितो स्वामि ।
विषयभावना विषयउर्मी । परब्रह्मीं कैशा जि ॥ २१ ॥
परब्रह्मीं कैंच्या उर्मी । विषयउर्मी प्राणधर्मी ।
मुख्यप्राणनाथ स्वधर्मी । संसारउर्मी बाधितना ॥ २२ ॥
ज्ञानियासी बाधिती विषयविकार । नाना कामक्रोधमदमच्छर ।
नानाकुतर्कनिशाचर । प्राणनाथें संव्हारिले ॥ २३ ॥
प्राणनाथें शत्रु संव्हारिले । पुनःपुना रक्तबीज उठत चालिले ।
अहिमहि हे निर्मूळ केले । रुद्रावतारें सर्वेश्वरें ॥ २४ ॥
सर्वेश्वरें सर्व हि केलें । जीवपण स्वरूपिं लया नेलें ।
पतितपावन नाम धरिलें । सद्गुरुनाथसमर्थें ॥ २५ ॥
सद्गुरुनाथ तारकब्रह्म स्वामि । तरि कां भवपुरीं बुडतों आह्मी ।
कलिकल्मश पातकें भूमि । विषयबुद्धिपरायणें ॥ २६ ॥
सत्शास्त्र करिजे पारायणें । दया करिजेल नारायणें ।
हरिकथापुराणश्रवणें । श्रवणमननें उद्धारु ॥ २७ ॥
श्रवणमनननिजध्यास । साक्षात्कारें दृढ विश्वास ।
सद्गुरुकृपें भवस्वर्गभास । निराभास परब्रह्मीं ॥ २८ ॥
अद्वैतब्रह्मीं मनोभास । निरसोनि जाती सावकाश ।
केवळ ब्रह्म सद्गुरुदास । आत्माराम प्राणांतीं ॥ २९ ॥
देह असतां स्वरूपीं राहती । देह पडतां स्वरूपीं जाती ।
कैंचे जाती कैंचे राहती । जेथील तेथें ब्रह्मांश हे ॥ ३० ॥
जेथील तेथें ब्रह्मांश खरें । कल्पनेचे सरलें काविरें ।
संकल्पविकल्पाचें भुररें । हरिसंकल्पें वारलें ॥ ३१ ॥
कल्पनेचा साक्षी आत्मा । साक्षित्व सांडोनि अंतरात्मा ।
जेथिल तेथें पूर्ण आत्मा । निर्गुण आत्मा निवेदनी ॥ ३२ ॥
निर्गुण आत्मा निवेदन । अखंड करिजे श्रवणमनन ।
कर्मउपासना गुरुदेवभजन । अखंडयोगें संयोगी ॥ ३३ ॥

अखंडयोग देवें करावा । ऐसा चि योग घडोनि यावा ।
दुष्टसंग स्वामि न व्हावा । सत्संग द्यावा निरंतर ॥ ३४ ॥
सत्संग शोधितां सर्वत्र नाहीं । दुष्ट संग निरंतर पाहीं ।
सद्गुरुसंगें सर्व कांहीं । भजनभाग्यें साम्राज्यें ॥ ३५ ॥
साम्राज्यपदवीचे संत । असंत दिसती अंतवंत ।
महंतलोकीं केवळ हंत । विषयविकारी संसारी ॥ ३६ ॥
संसारी तो जनक विदेही । निर्विकारी नित्य पाहीं ।
सीताशक्ति कन्यावैदेही । समाधिसुमेधा कांता हे ॥ ३७ ॥
सुमेधाकांता सद्बुद्धि । निश्चयात्मक आत्मबुद्धि ।
आत्मारामीं ब्रह्मसमाधि । ब्रह्मीं ब्रह्मांश निरंतर ॥ ३८ ॥
ब्रह्मीं ब्रह्मांश निरंतर । सगुणभजनीं नित्य अंतर ।
निर्गुणीं निर्गुण गगनांतर । निरंजनीं निरंजन ॥ ३९ ॥
नवविधभजनें प्रेमरंगें । सर्वकाळ साधुसंगें ।
दया करिजेल जानकीरंगें । सद्गुरुवचनें अभयंकरें ॥ ४० ॥
सद्गुरुस्वामीचें महिमान । जगदोद्धारक विमळज्ञान ।
विश्वंभर विद्यमान । प्रगटनिशाण देवाचें ॥ ४१ ॥
भक्तें धर्मध्वज धरिलें करीं । परि रक्षणें देवरायासी निर्धारीं ।
कामक्रोधादि कुतर्कवैरी । असुरापहारी योगींद्र ॥ ४२ ॥
श्रीगुरुराजराजेंद्र । भक्तभूपति भूदेव महींद्र ।
चरणीं लागती देवदेवेंद्र । राजराजेंद्र जगद्गुरु ॥ ४३ ॥
राजयोगी भक्तियोगी । कर्मयोगी ज्ञानयोगी ।
अष्टांगयोगी नानायोगी । सद्गुरुपदीं मिळाले ॥ ४४ ॥
सद्गुरुपदींचा निर्धारु । गुरुदेवें करिजे अंगिकारु ।
ज्ञानाग्नीचा पूर्ण विचारु । अग्निकाष्ठकारु हा ॥ ४५ ॥
अग्निकाष्ठ देह जालें । काष्ठपणासी पाहातां मुकलें ।
वस्त्र केवळ जळालें । पुन्हा नये चि प्रावर्णा ॥ ४६ ॥
कर्दळीपासूनि कर्पूर जाला । कर्पूरदीप देवासी उजळिला ।
पुन्हा कर्दळीपोटीं जन्मला । हें तों न घडे कल्पांतीं ॥ ४७ ॥

बीज भाजलें उगवेना । भर्जितवासना जन्म घेना ।
मनोभावना उपासना । रामीं मिनली रामरूपें ॥ ४८ ॥
गुरुकृपेचा निर्धार । वेदशास्त्र पूर्णविचार ।
चतुष्टदेह विलक्षण सार । आत्माराम निरंजन ॥ ४९ ॥
सद्गुरुकृपेचें महिमान । सद्गुरुस्वामीसी साभिमान ।
अनन्य आत्मनिवेदन । माझें मीपण वोवाळणी ॥ ५० ॥
संतसज्जन सर्व मिळाले । हरिहरब्रह्मादिक आले ।
सद्गुरुनाथासी अर्चिते जाले । अनंत अपार स्वरूपासी ॥ ५१ ॥
अहं आत्मेति गुरुदेव आसन । अहंब्रह्मेति गुरुदेव अर्चन ।
विमळब्रह्मेति संतर्पण । निरंजनेति स्वरूपशैया ॥ ५२ ॥
गगनीं संपूर्ण सुमनवृष्टि । कोंदाटली स्वानंदसृष्टि ।
क्षणीं लागो बाह्यदृष्टि । सद्गुरुनाथसमर्था ॥ ५३ ॥
त्रयोदशवर्णमात्रा । तांबुलप्रसाद शिष्यसत्पात्रा ।
कर्णीं आकर्णुनि दिव्यवग्त्रा । मुख रंगलें श्रीरंगें ॥ ५४ ॥
श्रीरंगरंगें मुख रंगलें । भक्तभूमंडळ रंगोन गेलें ।
पीकपात्र सन्मुख वोढविलें । सुरंग रेखिलें श्रीरंगें ॥ ५५ ॥
श्रीरामसमर्थ जानकीरंग । सद्गुरुकृपें रंग सुरंग ।
अत्माराम निजात्मरंग । भक्तिरंगें रंगलों ॥ ५६ ॥
ध्यानमूळ गुरुमूर्ति । पूजामूळ गुरुपदस्थिति ।
मंत्रमूळ गुरुवाक्यगति । मोक्षमूळ गुरुकृपा ॥ ५७ ॥
गुरुकृपा गुरुवाक्यग्रंथ । आकाशमार्गीं गुप्तपंथ ।
ऐकती योगीसंतमहंत । गगनगर्भ निरंजन ॥ ५८ ॥
गगनसदृशं ध्यान स्वामीचें । तें चि परब्रह्म आमुचें ।
आतां काम नाहीं वचनाचें । नेति नेति जगद्गुरु ॥ ५९ ॥
गुरुपदीं आतां मौनमुद्रा । नित्य गाऊं श्रीरामचंद्रा ।
सद्गुरुरामा राजेंद्रा । गुरुदेवदेवेंद्रा नमो नमो ॥ ६० ॥
आत्मानुभवग्रंथ पूर्ण । आत्मानुभवदेव संपूर्ण ।
आत्माराम हा परिपूर्ण । संत सज्जन बोलिले ॥ ६१ ॥

आत्मानुभवें शिष्यें प्रश्न केले। स्वात्मानुभवें गुरुदेवें प्रश्न फेडिले
ब्रह्मानुभवें श्रोतेवक्ते तन्मय जाले। ब्रह्मानंदें स्वानंदें ॥ ६२ ॥
सत्शिष्यें सद्गुरूसी पुसिलेंचि पुसिलें।
गुरुदेवें सेवकासी पुन्हःपुन्हा कथिलें।
मुमुक्षुलोकांसी उपयोगा आलें। साधकांसी साध्य केलें निरंजन ॥
येक परब्रह्म पावावया। अनेक प्रश्न केले गुरुदेवराया।
येकीं येकपण हि निरसावया। येक चि व्हावया परब्रह्म ॥ ६४ ।
परब्रह्ममायाईश्वरेंविण कांहीं। अध्यात्मग्रंथीं प्रश्नोतरीं ठाव नाहीं ॥
श्रोते वक्ते परब्रह्मीं पाहीं। आत्मानुभवीं निमग्न हे ॥ ६५ ॥
आत्मानुभव त्रयोदश समास। समर्थ सद्गुरु बोलिले उदास।
संतसभेसी सद्गुरुदास। सद्गुरुकृपें अनुवादले ॥ ६६ ॥
वेदशास्त्रगर्भीचे प्रश्न केले। वेदशास्त्रगर्भें प्रश्न फेडिले।
श्रवणमननें प्रत्यया आले। संत सर्वज्ञ जाणती ॥ ६७ ॥
येकांत वनीं उपवनीं। येकांतभुवनीं ब्रह्मभुवनीं।
गुरुदेवसदनीं परमात्मसदनीं। अध्यात्मग्रंथ पाहावे ॥ ६८ ॥
नाना सुमनवाटिका आरामें। देवदेवालयें येकांतधामें।
श्रवणमननें पूर्णकामें। अध्यात्मग्रंथ वाचावे ॥ ६९ ॥
नाना परोपकाराकारणें। सद्गुरुनाथें केलें धांवणें।
वेदशास्त्रसंमतवचनें। अध्यात्मग्रंथ विवरावे ॥ ७० ॥
श्रीरामदास श्रीगुरुसमर्थस्वामी। सद्गुरुनाथ स्वानंदधामी।
वेणीपरंपरा आत्मयारामी। गिरिधर श्रीपदीं स्वानंदें ॥ ७१ ॥

इति श्री आत्मानुभव। वेदशास्त्रींचा स्वानुभव।
सद्गुरुमुखें ब्रह्मानुभव। संतसज्जनीं विस्तारिला ॥ ७२ ॥
समास त्रयोदश संपूर्णमस्तु। श्रीपदभक्तिरस्तु ॥ १३ ॥
॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

REFBK-0001801

REFBK-0001801

१९२८

म. ग्रं. सं. ठाणें

विषय ग्र०५

सं. क्र. ५२२

REFBK-0001801

ग्र. सं. ठाण

सत्कार्योत्तेजक सभा, धुळें

श्री

रामदास आणि रामदासी

ग्रन्थमाला

भाग विसावा

# श्रीमत् दासबोधाची किल्ली



किंमत आठ आणे